



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : 0१३ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# चार उमेदवारांना प्रत्येकी २० लाख देऊन फोडलं

## युगेंद्र पवारांचा बारामतीत आरोप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बारामती नगरपालिका निवडणुकीत आमच्या उमेदवारांवर दबाव टाकण्यात येत आहे, चार उमेदवारांना प्रत्येकी 20 लाख रुपये देऊन फोडण्यात आल्याचा आरोप आरोप शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते युगेंद्र पवार यांनी केला. जे लोकसभेला झालं, विधानसभेला झालं तेच आता नगरपालिका निवडणुकीतही होत आहे असंही युगेंद्र पवार म्हणाले. तसेच आमच्याविरोधात मोठी शक्ती आहे असं म्हणत युगेंद्र पवारांनी अजित पवारांकडे बोट दाखवलं. बारामती नगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रचाराचा शुभारंभ युगेंद्र पवारांच्या हस्ते झाला. या ठिकाणी अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आठ उमेदवार हे बिनविरोध निवडून आले आहेत. त्यापैकी चार ठिकाणी आपल्या उमेदवारांना प्रत्येकी 20 लाख रुपये देऊन फोडण्यात आल्याचं युगेंद्र पवार म्हणाले.

युगेंद्र पवार म्हणाले की, "अजित पवार गटाचे आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्या आठ पैकी साधारण चार जागांवर आमचे उमेदवार होते आणि त्या चार जणांना विरोधी गटाने प्रत्येकी 20 लाख रुपये दिल्याची लोकांमध्ये चर्चा आहे. आमचे उमेदवार सर्वसामान्य घरातील आहेत, कष्ट करणारे आहेत. पुढचे दहा वर्षे जरी त्यांनी कष्ट केलं तरी त्यांना वीस लाख रुपये कमवता येणार नाहीत. त्यापैकी दोन उमेदवार नवीनच आपल्याकडे आलेले होते, ते कुठल्याही पक्षामध्ये नव्हते. जर आम्हाला संधी दिली तर आम्ही चांगलं काम करून दाखवू असं ते म्हणाले होते. आम्हीही त्यांच्यावर विश्वास ठेवला. पण ते फुटले. बरेच लोक हे मुद्दाम करण्यासाठी येतात."



युगेंद्र पवार पुढे म्हणाले की, "आमचे उमेदवार हे सर्व छोटे व्यवसायिक आहेत. उच्च शिक्षित आणि उच्च प्रतिमा असलेले तरुण उमेदवार आपण दिलेले आहेत. त्यांच्यावरही दबाव आणला जात आहे. आमच्या समोर खूप मोठी शक्ती आहे. आज त्यांच्याकडे सत्ता आहे, पैसा आहे, संस्था आहेत. हे सगळे तिथे काम करत असतात, त्यांच्यावर दबाव आणला जात असेल तर मग दोन-तीन लोक जाणार हे साहजिक आहे. लोकसभेला आणि विधानसभेला ही दहशत आपल्याला पाहायला मिळाली होती. आता नगरपालिकेच्या निवडणुकीत देखील तेच पाहायला मिळत आहे."

या वेळेला तुम्ही सामान्य घरातील लोकांना एखदा संधी देऊन बघा. जर लोकशाही जिवंत ठेवायची असेल, चांगला मजबूत विरोधी पक्ष जिवंत ठेवायचा असेल तर मग राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवाराला निवडून द्या असं आवाहन युगेंद्र पवार यांनी केलं.

# महाराष्ट्राची तिजोरी लुटण्याचा अधिकार संविधानाने दिलाय का?

- जनतेचे नोकर आहात, मालकासारखं बोलू नका; नाना पटोले अजित पवारांवर भडकले

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

माझ्या हातात राज्य सरकारची तिजोरी आहे. त्यामुळं माझ्या घड्याळाच्या पाठीशी उभा राहिलात, तर बारामतीसारखं काम तुमच्याकडे करु शकतो, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी नळदुर्ग नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रचारसभेत केले. यावर काँग्रेस नेते नाना पटोलेंनी अजित पवारांसह भाजपवर सडकून टीका केली आहे. संविधानाने तुम्हाला तिजोरी लुटण्याचा अधिकार दिलाय का? सत्ताधाऱ्यांनी तिजोरीचे तुकडे केलेत का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केलाय. विकासाच्या नावावर मतदान मागा भ्रष्टाचाराला खतपाणी घालू नका. तुम्ही जनतेचे नोकर आहात, पाच वर्षासाठी सत्ता तुमच्या हातात आहे. मालकासारखं बोलू नका. महाराष्ट्राची जनताचं तुमचा गर्व चूर करेल, अशी टीका देखील नाना पटोले यांनी अजित पवार यांच्यासह सत्ताधाऱ्यांवर केली आहे.

नाना पटोले म्हणाले की, अर्थमंत्री असलं म्हणजे काय झालं? राज्याची सगळी तिजोरी तेच लुटून नेऊ शकतात आणि त्यांनाच सगळे अधिकार संविधानानं दिले असे नाही.

# बाळराजे पाटीलला फाशीची शिक्षा झाली पाहिजे

- उमेश पाटलांचा हल्लाबोल

**मोहोळ : (समर्थ गांवकरी)**

मोहोळमध्ये पंडित देशमुख यांची संतोष देशमुख यांच्यापेक्षाही निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटीलयांनी केले. त्यात माजी आमदार राजन पाटील यांचे पुत्र बाळराजे पाटील हा मुख्य तर इतर एकूण 13 आरोपींना निर्दोष सोडण्यात आले होते. पोलिसात ज्या साक्षीदारांनी साक्ष दिली ते कोर्टात फुटले होते. त्यातील साक्षीदारांना कारखान्यात नोकरी, टेंडर, सोलापुरात गाळे देण्यात आले आहेत, त्याचा तपास झाला पाहिजे असे उमेश पाटील म्हणाले. दहशत आणि गुंडागर्दी संपवण्यासाठी बाळराजे पाटील याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असी मागणी देखील उमेश पाटलांनी केली.



सरकारी पक्षाने हायकोर्टात दाखल केलेले अपील 20 वर्षात कोर्टाच्या बोर्डावार आले नाही. त्यामुळं यामध्ये नेमकं सरकारी यंत्रणेतील कोण मॅनेज झालंय का? हे तपासावं असेही उमेश पाटील म्हणाले. चुकीला माफी नाही, याचा बदला घेतला जाईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितल्याचे उमेश पाटील म्हणाले.

एकनाथ शिंदे यांच्या विधानाचे मी स्वागत करतो. तसेच आमची एकट्याची नव्हे तर संपूर्ण मोहोळ तालुक्याची मागणी आहे की, दहशत आणि गुंडागर्दी संपवण्यासाठी बाळराजे पाटील याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. सरकारी पक्षातर्फे हरिष साळवी ही केस लढवतील ही जबाबदारी एकनाथ शिंदे यांनी घेतल्याचे मत उमेश पाटील यांनी व्यक्त केले. पंडित देशमुख यांच्या हत्येचा न्यायालयीन मार्गाने बदला घेतल्यानंतर मोहोळ तालुक्याला न्याय मिळेल असेही उमेश पाटील म्हणाले.

राष्ट्रवादीचे काँग्रेसचे प्रवक्ते आणि जिल्हाध्यक्ष उमेश पाटील पंडित देशमुख हत्या प्रकरणावरुन आक्रमक झाले आहेत. पंडित देशमुख यांचा मर्डर या बाळराजे पाटलानं केल्याचे उमेश पाटील म्हणाले. यामध्ये 13 आरोपी होते. त्यावेळी गृहमंत्री आर. आर. पाटील होते. ते राष्ट्रवादीचेच होते. आर आर आबांच्या पाया पडून माझ्या पोराला वाचवा म्हणत पाटीलकी गुंडाळून घरी ठेवत गेले होते. हाच तो बाळराजे आहे, मर्डर करणारा बाळराजे पाटील होता.

## थोडक्यात...

### जुन्या वादातून कुटुंबाला मारहाण

थेऊर (समर्थ गांवकरी) : तु काल आमच्या विरुध्द पोलीसात तक्रार का दिली, तुम्हाला आम्ही आता जिवंत सोडणार नाही, असे म्हणून जुन्या वादाचा राग मनात धरुन एका कुटुंबाला लोखंडी गज,लोखंडी हत्यार व दगडाने बेदम मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना थेऊर ग्रामपंचायत हद्दीतील चव्हाण वस्ती परिसरात शनिवारी घडली आहे. या मारहाणीत एकाच कुटुंबातील 5 जण जखमी झाले आहे तर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात 3 जणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयनाबाई दिलीप चव्हाण (वय 55) त्यांचे पती दिलीप चव्हाण, मुलगा शेखर चव्हाण,सून पुजा चव्हाण व मुलगी उज्ज्वला सावंत अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. तर अरुण छबू चव्हाण,पुनम राजू धांदे व अर्जुन अरूण चव्हाण (सर्व रा.चव्हाण वस्ती, थेऊर ता. हवेली जि. पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. फिर्यादी आयनाबाई चव्हाण व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत.या दोन्ही कुटुंबामध्ये प्रेमविवाह झाल्यामुळे काही दिवसांपासून वादविवाद सुरु होते.याप्रकरणी फिर्यादी यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती परंतु,काही दिवसांनी त्या दोन्ही कुटुंबीयात समेट झाला होता.दरम्यान, शुक्रवारी (ता.21) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास आशा चव्हाण फिर्यादी यांच्या कुटुंबाला जुन्या भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करत होत्या.

### अपघातात एक युवक ठार, अन्य जखमी

कोरेगाव (समर्थ गांवकरी) : सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्गादरम्यान मुगाव फाट्याजवळ (ता. कोरेगाव) स्विफ्ट कार व मोटरसायकल यांच्यात झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार युवक जागेवर ठार झाला असून, मोटरसायकलवर पाठीमागच्या सीटवर बसलेला युवक गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सातारा येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताबाबत घटनास्थळावरुन मिळालेल्या माहितीनुसार आज दुपारी 12 वाजून 40 मिनिटाच्या सुमारास सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्गादरम्यान मुगाव फाट्याच्या पुढे सातारा बाजूकडे एका काळ्या रंगाच्या हिरो होंडा मोटरसायकलवरुन (क्रमांक एम. एच. 11- बी. सी. 4450) वैष्णव शंकर काटकर (वय 25, रा. ललगूण, ता. खटाव) व गौरव सुनिल यादव (वय 21, रा. शिरंबे, ता. कोरेगाव) हे दोघे कोरेगाव बाजूकडून साताऱ्याकडे निघाले होते. साताऱ्याकडून स्विफ्ट कार (क्रमांक एम. एच.02 सी. पी.8790) येत असताना या दोन्ही वाहनांत झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलस्वार वैष्णव काटकर हा जागीच ठार झाला, तर मोटरसायकलवर पाठीमागे बसलेला गौरव यादव हा गंभीर जखमी झाला.



## थोडक्यात बातम्या...



### नामांकित उद्योजक चंद्रकांत डफळ यांचा ‘समर्थ गांवकरी’ समूहा तर्फे सत्कार!

पुणे (स. गांवकरी) : पुणे जिल्ह्यातील नामांकित उद्योजक तसेच नारायणपूर दत्तगुरुचे भाविक भक्त चंद्रकांत डफळ यांनी दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांच्या भेटीप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि जिल्हा प्रसिद्ध प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व हरिपाठ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नामवंत उद्योजक राहुल हासे यांची विशेष उपस्थिती होती. सदिच्छा भेटीत सामाजिक आणि पत्रकारितेच्या विविध उपक्रमांवर परस्पर चर्चा करण्यात आली. चंद्रकांत डफळ यांनी समर्थ गांवकरीच्या कार्याची प्रशंसा करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गहिनीनाथ नगर येथे गरजू विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

- डॉ. विश्वासराव आरोटे यांचा उपक्रम प्रशंसनीय!

अकोले (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गहिनीनाथ नगर येथे आज गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पेन, हरिपाठाची पुस्तके तसेच सोलापुरी चादरींचे वितरण करण्यात आले. तसेच शाळेला भिंतीवरील एक घड्याळ भेट देण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अकोले तालुकाध्यक्ष दत्ता जाधव, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय शेळके, अंगणवाडी सेविका संगीता शेळके, अशोक दादा शेळके यांसह पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका मीनल चासकर यांनी केले. यावेळी भाऊसाहेब चासकर आणि डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शेवटी वैशाली पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानत कार्यक्रमाचा समारोप केला. हा सामाजिक उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

# सी. पी. गोयेन्का स्कूलचा भव्य सांस्कृतिक महोत्सव संपन्न

**“सांस्कृतिकता, कला आणि मूल्यशिक्षण हीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी” – नानजीभाई ठक्कर**

मुंबई : (समर्थ गांवकरी)

सी. पी. गोयेन्का स्कूलतर्फे आयोजित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला माननीय प्रमुख पाहुणे श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठानावाला, श्रीमती शर्मिला मादीवाले, श्रीमती जयश्री कुमार, श्रीमती दीपा कुलभूषण यांच्यासह आदरणीय शिक्षकवर्ग, मोठ्या संख्येने पालकवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



आपल्या मनोगतामध्ये प्रमुख पाहुणे श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले, “सी. पी. गोयेन्का स्कूलच्या या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होताना मला अपार आनंद होत आहे. मुलांच्या प्रतिभेला व्यासपीठ देणारे असे कार्यक्रम ही शाळेची खरी ओळख असते. सांस्कृतिकता, कला आणि मूल्यशिक्षण हीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी आहे.”

त्यांनी पुढे सांगितले की, “भारतीय संस्कृतीची खरी शान म्हणजे विद्या, कला आणि संस्कार. फक्त पाठ्यपुस्तकातील ज्ञान पुरेसे नसून जीवनासाठी आवश्यक मूल्ये, कर्तव्यभावना, सहकार्य, आदर, शिस्त आणि सर्जनशीलता — या सर्व गोष्टी अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवल्या जातात.”

“शिक्षण म्हणजे केवळ परीक्षेत मिळालेले गुण नव्हेत; शिक्षण म्हणजे प्रत्येक मुलामध्ये दडलेल्या व्यक्तिमत्त्वाचे सुंदर घडवणे होय. मुलांच्या कलेचा, आत्मविश्वासाचा आणि स्वप्नांचा सन्मान करणे हीच खरी शिक्षणसंस्कृती आहे,” असेही ठक्कर यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कलाविष्कारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन आणि शिक्षकवर्गाचे सर्वांनी कौतुक केले.

# सिंहगडावर ‘आपला मावळा’ची स्वच्छता मोहीम

**खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकाराने शेकडो शिवभक्तांचा सहभाग**



### खासदार लंके यांचा संदेश

“गड म्हणजे दगडांचा ढिगारा नाही, तर स्वराज्याचा आत्मा आहे. भविष्यातील पिढ्यांना इतिहास सुस्थितीत पोहोचावा, यासाठी आम्ही या मोहिमेचा संकल्प केला आहे,” असे खासदार लंके यांनी सांगितले.

### सिंहगड – इतिहासाचा जिवंत साक्षीदार

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि नरवीर तानाजी मालुसरे यांच्या शौर्याची साक्ष देणाऱ्या सिंहगडावर पार पडलेली ही मोहीम गडसंवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. शेकडो शिवभक्तांच्या सहभागामुळे ‘आपला गड आपली जबाबदारी’ हा संदेश अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचला.

पुणे : (समर्थ गांवकरी)

सिंहगड किल्ल्यावर ‘आपला गड, आपली जबाबदारी’ या उपक्रमांतर्गत भव्य स्वच्छता आणि संवर्धन मोहीम राबवण्यात आली. खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकारातून आयोजित या मोहिमेत राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो शिवभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. “गड-किल्ल्यांचे संवर्धन ही आपली जबाबदारी आहे. मी खासदार म्हणून नव्हे, तर शिवरायांचा मावळा म्हणून या मोहिमेत सहभागी आहे,” असे खासदार लंके यांनी यावेळी सांगितले.

सकाळी नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे समाधीस्थळावर जिजाऊ वंदना आणि संवर्धन प्रतिज्ञेनंतर मोहिमेला सुरुवात झाली. त्यानंतर गडावरील २१ पथकांनी एकाच वेळी विविध ठिकाणांची स्वच्छता केली.

कल्याण दरवाजा, पुणे दरवाजा, पुरुष बालेकिल्ला, राजाराम महाराज समाधी परिसर, तानाजी मालुसरे समाधी परिसर अशा प्रमुख ठिकाणी प्लास्टिक, काच, कागद, काटेरी झुडपे, वाळलेले गवत काढण्यात आले. पायवाटा खुल्या करण्यात आल्या.

या मोहिमेत माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अनिताताई इंगळे , सुरेखाताई दमिष्टे , इतिहास संशोधक डॉ. नंदकिशोर मते, पंचायत समितीचे माजी सदस्य दत्ता जोरकर, पद्माकर लायगुडे निलेश द मिस्टेक दीपक खिरीड अनिकेत चव्हाण वरीष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली पाटील, वनपरिमंडळ अधिकारी समाधान पाटील, वनरक्षक बळीराम वायकर , सामाजिक कार्यकर्ते तात्यासाहेब इंगळे,‘आपला मावळा’ संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, यांसह नगर, सातारा, सांगली आणि पुण्यातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वयंसेवक व सहभागींची संपूर्ण व्यवस्था धारेश्वर विद्या आणि क्रीडा प्रतिष्ठानचे कार्यकारी अध्यक्ष अनिकेत चव्हाण यांनी केली.

भोजनाची व्यवस्था दीपक खिरीड यांनी गोरे बुद्रुक येथील धर्माजी बाबा मंदिर परिसरात केली.

आपला मावळा संघटनेच्या माध्यमातून गेल्या काही महिन्यांपासून दर महिन्याच्या एका रविवारी विविध किल्ल्यांवर स्वच्छता आणि संवर्धन मोहिमा राबवण्यात येत आहेत. शिवनेरी, रायरेश्वर, भुदरगड, धर्मवीर गड, तिकोना, येथेही यापूर्वी अशीच मोहीम पार पडली आहे.



# सरपंचाच्या प्रयत्नातुन सीसी रस्त्याचे काम पुर्ण

- गांवकरी व भक्तांकडून बांधकामाबद्दल साधानी व्यक्त केली

नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)

बिलोली तालुक्यातील कोंडलापूर, नागापूर, सुलतानपूर गट ग्रामपंचायत अंतर्गत मौ. सुलतानपूर येथे सरपंच कुंकनोर यांच्या प्रयत्नाने खासदार निधीसह इतर निधीच्या माध्यमातून बिलोली, कुंडलवाडी प्रमुख रस्त्यापासून ते श्री साईबाबा मंदिरापर्यंत सीसी रस्त्याचे उत्कृष्ट दर्जाचे काम पुर्ण केले आहे.यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या भाविक भक्तांच्या अडचणी दूर झाल्या आहेत.

तालुक्यातील मौ. सुलतानपूर येथील जयरामजी अंबेकर विद्यालया शेजारी माळटेकडीवर काही वर्षाखाली श्री सत्य साईबाबा मंदिराची स्थापना करण्यात आली आहे. हे मंदिर माळ टेकडीवर निसर्गरम्य वातावरणात असल्याने येथे मोठया प्रमाणात साईबाबा भक्तांची ये जा असते परंतु मंदिरापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत जाणारा २५० मिटरचा रस्ता पूर्णपणे माळरान व टेकडीचा असल्यामुळे भक्तांना सकाळी व संध्याकाळी पायीपायी जाने कठीण झाले होते. पण कोंडलापूर, नागापूर, सुलतानपूर गट ग्रामपंचायतचे महिला सरपंच सौं. सागरबाई वैजनाथ कुंकनोर व त्यांचे पती सरपंच प्रतिनिधी वैजनाथ कुंकनोर यांच्या प्रयत्नाने राज्य सभेचे खासदार अजित गोपछडे यांचा खासदार निधी आणि इतर निधीच्या माध्यमातून २५० मिटर रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून उत्कृष्ट दर्जाचे सीसी रस्त्याचे बांधकाम पुर्ण केले आहे. यामुळे या कामाबद्दल गांवकरी व साई भक्तांकडून समाधानी व्यक्त करण्यात येत आहे.

# स्वकर्तुत्वाने उभे राहिलेले नेतृत्व.!



मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. माझ्या निष्ठेची दखल घेत माझ्यावर जी विखे कुटुंबाने जबाबदारी दिली आहे. ती मी सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नक्कीच पुर्ण करेल. येथील आरोग्य, शिक्षण, रोजगार, गरिबांना घरे, पुनर्वसन, गाव तेथे पक्षाचा विचार व घर तेथे कार्यकर्ता अशी अनेक अजेंड्यावरील कामे मी करणार आहे. २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करणार आहे. खरंतर, जनता हीच ईश्वर आणि कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो. तो कणा ताठ व स्वाभिमानी राहण्यासाठी संगमनेर तालुक्यात अगदी वाडी वस्तीपर्यंत जाऊन मी काम करणार आहे. मी माझ्या जबाबदारीवर ठाम राहून ती कर्तुत्वातून सार्थ ठरवून दाखवेल.

**- राजन शिंदे**

राजन शिंदे युवा मंचच्या माध्यमातून हजारो तरुण जोडले गेले. सामाजिक कामातून राजन शिंदे यांनी तालुक्यात आपला ठसा उमटवला. हे काम अजुन प्रभावी करण्यासाठी पाठीवर कोणी तरी हात ठेऊन लढण्यासाठी बळ देणारा लागतो. तो निस्वार्थी भावनेने सुजय दादा यांनी ठेवला आहे. म्हणुन तर सुजय दादा विखे पाटील ज्या ज्या वेळी संगमनेरात राजन दादा युवा मंच आयोजीत कार्यक्रमाला आले. तेव्हा त्यांनी कौतुकाचा हात पाठीवर ठेवत राजन हा मला छोट्या भावा सारखा आहे. त्याच्या प्रत्येक अडीअडचणीला विखे पाटील कुटुंब त्याच्या पाठीशी उभे आहे. तो जे निर्मळ भावनेने समाजात काम करतो. त्याचे नेहमी कौतुक करावेसे वाटते. असे सुजय दादा विखे पाटील हे वेळोवेळी बोले आहे. त्यामुळे, राजन शिंदे यांनी देखील "सुजय दादा पर्व" या संकल्पनेतुन सुजय दादा विखे पाटील चषक, होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा, तरुणांसाठी स्पर्धापेपरचे आयोजन असे वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले आहे. सुजय दादा विखे पाटील हे माझे मार्गदर्शक आहे. त्यांच्या सानिध्यात राहुन यापुढे जनतेचे काम करणार आहे. जनसेवा मंडळातून हजारो नागरिकांचा प्रश्न सुटला जातो. त्यामुळे, जिल्ह्यात विखे पाटलांची बांधिलकी जनतेशी आहे. यापुढे मला देखील जनतेची सेवा करण्यासाठी अधिक उत्साह आहे. ही सेवा निरंतर पुढे चालत राहणार. मात्र, जो सुजय दादांनी माझ्यावर विश्वास टाकला आहे. त्याला कधी ही तडा जाऊ देणार नाही. जो पर्यंत श्वासात श्वास आहे. तोपर्यंत सुजय दादांसोबत एकनिष्टेने काम करणार.!



(समर्थ गांवकरी)

स्वामी विवेकानंद म्हणत असे, मला सिंहाच्या निधड्या छातीचे शंभर तरुण द्या, मी सबंध भारत देश घडवून दाखवितो. अर्थातच देशातील तरुणांमध्ये किती शक्ती आहे. हे त्यांनी जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला होता. आज आम्हाला देखील त्या वाक्याची फार प्रकर्षाने आठवण होते आहे. कारण, त्या शंभरपैकी एक म्हणजे आमचा निधड्या छातीचा तरुण राजन शिंदे आहे. स्वकर्तुत्वाने सामाजिक कामाचा वसा घेतला. तालुक्यात गोरगरिबांचा आधार बनला. त्यामुळे, संगमनेर तालुक्यात असे गाव नाही जिथे राजन शिंदेचे नाव नाही. आता या नावाने विखे पाटलांची निष्ठा जोडली आहे. त्यामुळे, विखे पाटील म्हटलं की, संघर्षमय शुन्याला देखील क्षणात लाखाची किंमत प्राप्त करुण देणारे कुटुंब अशी विखे पाटील यांची ओळख आहे. म्हणून तर राधाकृष्ण विखे पाटील या खुल्या आकाशाखाली अनेकांना राजकीय आश्रय मिळाले आहेत. जो लोभ ठेऊन काम करतो, त्याचे वलय फार काळ टिकत नाही. मात्र, जो निर्मळ वृत्तीने एकनिष्ठ राहतो. त्याला लोणीच्या कोठ्यातून अचानक एखादे पत्र येते. आणि आजवर कसलेल्या आयुष्याचे चिज होऊन जाते. अशा एका संघर्षशिल तरुणाची कहाणी आम्ही आपल्यासमोर मांडणार आहोत. ते म्हणजे राजन शिंदे होय.!

संगमनेर तालुक्यात असे गाव नसेल तिथे राजन शिंचे नाव निघत नसेल. कारण, गावा-गावातील वाडीवस्ती पर्यंत जाऊन सर्वसामान्य माणसांना प्रांजळ भावनेतुन मदत राजन दादा युवा मंचच्या माध्यमातून केली आहे. शेतकऱ्यांना पेरणीवेळी आसमानी संकटाला सामोरे जावा लागले. त्यांच्यावर दुबार पेरणीची वेळ आली होती. तेव्हा शेतकऱ्यांसाठी "एक हात मदतीचा" या संकल्पनेतुन शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी धाऊन आले ते राजन शिंदे. ज्या शेतकऱ्यांना आता पेरणी शक्यच नाही अशा शेतकऱ्यांची यादी बनवली. त्यांना बियाणे मका, बाजरी, सोयाबीन असे वाटले. शेतीतील सुरवातीची मशागत करण्यासाठी साधने उपलब्ध करून दिली. त्यामुळे, हे सर्व वाटप करत असताना काही शेतकऱ्यांच्या डोळ्यात आनंद अश्रू देखील पाहायला मिळाले. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी मदत करताना निस्वार्थी भावनेने केली. तालुक्यातील काही भागात दुष्काळ होता. तिथे डोंगर भागात राहणाऱ्या जनतेला भीषण पाण्याची टंचाई जाणवत होती. आशावेळी तीन टँकर जनतेसाठी उपलब्ध करून चोवीस तास सेवा उपलब्ध करून दिली. त्यामुळे, सर्वसामान्य जनतेला ऐन दुष्काळात दिलासा मिळाला.

काही गावातील जिल्हा परिषद शाळांना स्वखर्चाने मदत केली. आधुनिक ब्लॅकबोर्ड, संगणक, टेबल,लहान मुलींना सायकल उपलब्ध करून दिली. आजचा विद्यार्थी उद्या घडला पाहिजे. तो उच्चशिक्षीत होऊन स्वतःच्या पायावर उभा राहावा हीच यामागची प्रांजळ भावना आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांच्या प्रती त्यांनी पुढे येऊन मदत केली आहे. अनेक गावातील धर्मिक स्थळांना मदत केली. तर गावा-गावातील सप्ताहना सहभाग नोंदवून गावातील सप्ताह अजुन मोठा करता कसा करता येईल यासाठी प्रयत्न केला आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले. लाखो रुपयांचे आकर्षीत बक्षीसे ठेवले. हजारो तरुणांनी या स्पर्धेत भाग घेतला. यातूनच तरुणांमध्ये राजन शिंदे नावाची क्रेझ नेहमी दिसुन येते. जिल्ह्यातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत ठेवली. सर्व बैलगाडी रसिकांनी या शर्यतीचा आनंद लुटला. यासर्व गोष्टींसाठी राजन शिंदे यांनी पदरमोड केली आहे. आजकाल नेते व्हाइट शर्ट घालताना दिसतात. मोठं मोठ्या गप्पा मारतात. निव्वळ मदतीची वलग्ना करतात. मात्र, जो शब्द राजन शिंदे यांनी जनतेला दिला. तो कधीही खाली पडु दिला नाही. त्यामुळे, आता जनताच म्हणते हे नेतृत्व स्वकर्तुत्वाने उभे राहिले आहे.!

महिला गृहिणी म्हणुन घरात काम करतात. त्यांना बाहेर पडुन एकत्र येण्याची संधी फार कमी असते. शहरात होम मिनिस्टरचे कार्यक्रम घेतले जातात. सर्व महिला एकत्र येतात. मात्र, ग्रामीण भागात हे कार्यक्रम फार क्वचित दिसतात. परंतु राजन शिंदे यांनी ग्रामीन भागातला सर्वात मोठा कार्यक्रम कुबेर लॉन्स येथे घेतला. यामध्ये लाखो रुपयांचे बक्षिसे ठेवली. या कार्यक्रमासाठी दहा हजारांपेक्षा जास्त महिलांनी सहभाग नोंदवला. मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे माजी खा. सुजय सुजय विखे व संगमनेरचे आ. अमोल खताळ व सौ. निलम खताळ यांनी तोंड भरून कौतुक केले. खरंतर, महिला या देशाचा कणा आहे. त्या कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी महत्वपुर्ण योगदान देत असतात. त्यामुळे, मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे. आपला कर्तृत्वाचा ठसा समाजात उमठावला पाहिजे. त्यामुळे, मुलींना शिक्षणासाठी अडचण येऊ नये म्हणुन राजन शिंदे हे नेहमी प्रयत्नशील असतात. ग्रामीण भागातील लहान-लहान वाडी वस्तीवर जाण्यासाठी पायपीट करतात. हिवाळ्यात सूर्य लवकर मावळला जातो. सायंकाळी शाळा सुटल्याने अनेक शाळकरी मुलींवर बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना संगमनेरात घडल्या आहेत. वेळप्रसंगी जीव देखील घेतला आहे. ज्या मुली शाळेपासुन लांब अंतरावर राहतात. त्यांना राजन शिंदे युवामंचच्या वतीने सायकल घेऊन दिल्या आहेत. आशा तालुक्यातील शेकडो मुलींना सायकल उपलब्ध करून दिल्या आहेत. काही गोर गरीब महिला आहेत. त्यांना मुलींचे शिक्षण घेणे शक्य नाही. अशा मुलींचे पालकत्व स्वीकारून या मुलींना उच्चशिक्षीत करण्यासाठी शिकवत आहे. वयोवृद्ध महिलांना आरोग्याच्या समस्या असेल तर ते सोडवण्याचे काम केले आहे. अनेक महिलांचे डोळ्याच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्यासाठी मदत केली. त्यांना आर्थिक सहाय्य करून मोठा आधार दिला. काही वयोवृद्ध महिला एकट्या राहतात. त्यांची परिस्थिती अतिशय हलाखीची आहे. आशा काही महिलांना घरासाठी मोठी मदत तयार करून त्यांना घर बांधुन दिले. असे दातृत्व कधी कोणी करताना पाहायला मिळत नाही. त्यामुळे, महिलांची काळजी घेणारा, मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणारा, महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत करून महिलांचा सन्मान ठेवणारा, वयोवृद्ध महिलांना आधार देणारा. हाच खरा लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ "राजन शिंदे" असल्याचे महिला आता बोलतात.

राजन शिंदे यांनी चार वर्षे सातत्याने जनतेची सेवा केली आहे. तालुक्यातील गावा-गावात त्यांचे नाव आहे. स्वखर्चाने जेष्टांपासून ते युवक, महिला, युवती यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे, त्यांची नाळ सर्वसामान्य जनतेसोबत जोडली गेली आहे. त्यांच्या इतका दांडगा जनसंपर्क असणारा युवानेता तुलनात्मक पाहिला देखील मिळत नाही. राजन शिंदे युवा मंचच्या माध्यमातून युवकांचे मोठे संघटन असल्याने यावेळी त्यांना संधी उपलब्ध करून दिली. तर ते संधीचे सोने करून दाखवतील यात तिळमात्र शंका नाही. कारण, जनतेत असणारा आणि काम करणारा असल्यामुळे त्यांच्या इतका तुल्यबळ उमेदवार विरोधकांना देखील भेटू शकत नाही. माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील यांनी हे वेळीच ओळखुन कोळशाच्या खाणीतून या भागात हिरा सापडवला आहे. त्यामुळे, डॉ. सुजय विखे पाटील हे नेहमी राजन शिंदे यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना बळ देताना दिसले आहे. एक नव्या दमाचा व व्हिजन असलेला नेता या भागाला मिळणार असल्याने तरुणांनी आनंद व्यक्त केला आहे. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजन शिंदे आता या तालुक्यात काम करत आहे. त्यांनी पायाला भिंगरी लावून संपूर्ण गट पिंजून काढला आहे. आ. अमोल खताळ पाटील यांच्या विकासकामांचा देखील मोठा फायदा होणार असल्याने त्यांच्या उमेदवारीने महायुतीचे पारडे जड होऊ शकते. त्यामुळे, संधी मिळाली तर सोने करून दाखवील असा जनतेचा सुर आहे.

# सुजय विखे पाटील हे राज्य व केंद्रातील भाजपच्या गळ्यातील ताईत का झालेत?

5 जुलै 2019 ला सुजय विखे पाटलांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईतील वानखेडे स्टेडिअममधील गरवारे क्लबमध्ये त्यांच्या पक्षप्रवेशाचा सोहळा पार पडला. नगर जिल्ह्यातून गेलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी 'एकच वादा सुजय दादां'च्या घोषणा देत स्टेडिअम दणाणून गेले होते. आता या घटनेला फक्त सात वर्षे झालीत. पण याच सात वर्षांत 'भाजपचा सर्वात यशस्वी व विश्वासू युवा नेता' ही बिरुदावली त्यांनी मिळवली. राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे असो किंवा थेट देशपातळीवरील मोदी-शहा असो... सुजय दादा हे भाजपातील प्रत्येक नेत्यासाठी एक विश्वासू चेहरा बनलतेत. भाजपचा विश्वास संपादन करणं सोप्प नव्हतं. परंतु दादांनी फक्त वयाच्या चाळीशीत हे सार्थ करुन दाखवलं. भाजपचा दादांवरील विश्वास वाढण्याच्या काही घटना पाहिल्या तर दादांमधील नेतृत्वगुण, परिपक्वता स्पष्ट दिसते.

नगर जिल्हा, हा खरंतर कॉंग्रेस किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला समजला जायचा. नगरकरांच्या विकासाचा विचार न करता फक्त भुलथापांवर कॉंग्रेस व राष्ट्रवादीचे नेते त्यावेळी राजकारण करायचे. कॉंग्रेसी विचारांचा मोठा पगडा येथे कित्येक वर्षे राहिला. कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे कित्येक बडे नेते नगरला आपला बालेकिल्ला समजायचे. अशा वातावरणात सुजय विखेंनी भाजपमध्ये प्रवेश केला. आपल्या आयुष्यातील पहिलीच निवडणूक नगर दक्षिण लोकसभेच्या माध्यमातून त्यांनी भाजपकडून लढवली. विखेंच्या सहकाराचं जाळं हे नगर उत्तरेत आहे. मंत्री राधाकृष्ण विखेंचा मतदारसंघ असलेला राहाता तालुकाही नगर उत्तरेत येतो. परंतु तरीही सुजय विखे पाटलांनी दक्षिणेत जाऊन उमेदवारी केल्याने, त्यांच्या विजयाबाबत त्यावेळी अनेकांना शंका होती. नगर दक्षिणेत भाजप व युतीची ताकद विजय मिळविण्याएतकी नसूनही सुजय विखे पाटलांनी त्यावेळी दक्षिणेतून दणदणीत विजय मिळवला. तीन-साडेतीन लाख मतांनी विजयी होणारे सुजय विखे त्यावेळी भाजपच्या नेत्यांच्या चर्चेत येऊ लागले.

२०१९ च्या विजयानंतर विखेंच्या लोकप्रियतेचा आलेख कायम चढता राहिला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या चुकीच्या प्रचाराने राज्यभर महायुतीला फटका बसला. भाजप संविधान बदलणार, भाजप हिंदूराष्ट्र करणार, भाजप शेतकऱ्यांच्या जिवावर उठणार, अदानी-अंबानीच्या घशात राज्य घालणार... अशा एक ना अनेक खोट्या मुद्यांचे भांडवल केले गेले. चुकीचे नॅरेटीव्ह पसरविले गेले. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला. सुजय विखेंचाही अगदी थोडक्या मतांनी पराभव झाला. परंतु या पराभवानंतर



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून
संपादक दैनिक समर्थ गांवकरी
राज्य सरचिटणीस महाराष्ट्र
राज्य पत्रकार संघ मुंबई

सुजय विखे जास्त परिपक्व राजकारणी झाले. म्हणतात ना, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं... अगदी तसं सुजय विखेंच्या बाबतीत झालं. या पराभवानंतर सुजय विखेंना अशा अनेक संधी आल्या ज्याचं त्यांनी सोनं केलं. शिवाय भाजपच्या गळ्यातील ताईत बनले.

लोकसभेत फटका बसलेल्या भाजपने, त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीची नगर जिल्ह्याची जबाबदारी सुजय विखेंवर दिली. खरंतर, सुजय विखेंनी ही जबाबदारी स्वतः फडणवीसांकडून हट्टाने घेतली. खोटे मुद्दे पसरवून आपल्या पराभवास कारणीभूत ठरलेल्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी त्यांनी ही जबाबदारी घेतल्याचे त्यावेळी सांगितले गेले. नगर जिल्ह्याची ही जबाबदारी सोप्पी नव्हती. विखे विरोधाचा एक टेम्पो त्यावेळी जिल्ह्यात तयार करण्यात आला होता. सुजय विखेंच्या लोकसभेतील पराभवनंतर स्वतः मंत्री राधाकृष्ण विखेंचाही राहाता विधानसभेला पराभव होईल, अशा चर्चा सुरु झाल्या होत्या. पक्षातील व पक्षाच्या बाहेरील विरोधकांची मोट बांधली गेली होती. काहींनी आतून, तर काहींनी उघडउघड विखे विरोधात बोलणे सुरु केले होते. विखे हे भाजपचे जिल्ह्यातील सर्वात मोठे नेते असल्याने सहाजिकच विखेंची कोंडी ही भाजपची कोंडी होती. परंतु सुजय विखेंना स्वतःवर व स्वतःच्या निस्वार्थी कार्यकर्त्यांवर पूर्ण विश्वास होता. या कठीण प्रसंगात सुजय विखेंनी भाजपकडून विधानसभेतील नगरच्या १२ मतदारसंघाची जबाबदारी स्वतःकडे घेतली.

या दोन-तीन महिन्यांत, विखेंनी पायाला भिंगरी बांधून जिल्हाभर भाजपचे संघटन केले. नाराजांची नाराजी काढली. विरोधकांच्या डावांवर प्रतिडाव टाकले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला आणि नगरमध्ये महायुतीचे १२ पैकी १० आमदार निवडून आले. श्रीरमपूर व कर्जत-जामखेड या दोन विधानसभेची जागा थोडक्यातून हाताची गेली. महाविकास आघाडीतील ठाकरे गटाच्या हाती भोपळा लागला. तर शरद पवार गट व कॉंग्रेसला फक्त एक जागा मिळवून थोडीशी लाज वाचवता आली. विशेष म्हणजे, संगमनेर, नेवासा, पारनेर, राहुरी, शिर्डी, श्रीगोंदा आणि शेवगाव-पाथर्डी, या सात मतदारसंघात विखेंनी जास्त कष्ट घेतले. या सातही ठिकाणी महायुतीचे उमेदवार त्यांनी विजयी केले. सर्वात मोठा धक्का दिला तो मविआचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार असणाऱ्या बाळासाहेब थोरातांना, जिल्ह्याचे बॉंस होऊ पाहणाऱ्या खा. निलेश लंकेंना आणि माजीमंत्री असणाऱ्या तनपुरे-गडाखांना.... लोकसभेत ज्या नेत्यांनी लोकसभेला विरोधात काम केले होते, त्या सर्वांचा सुजय विखेंनी ओळीने पराभव करुन दाखवला. थोरातांची ४० वर्षांची एकहाती सत्ताही विखेंच्या त्सुनामीपुढे टिकली नाही. शिवाय ज्या पारनेरने खा. निलेश लंकेंना डोक्यावर घेतले होते, त्याच पारनेरमध्ये खासदारपत्नी राणी लंकेंचा पराभव त्यांनी करुन दाखवला.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा विश्वास त्यामुळे दुप्पटीने वाढला. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांच्या या कामाचे कौतूक केले. त्यानंतर भाजपचे शिर्डीतील अधिवेशन, पंडीत प्रदीप मिश्रांचा शिवमहापुराण कथेचा कार्यक्रम, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचा नगर दौरा, इतर पक्षांतील स्थानिक नेत्यांचा भाजप प्रवेश अशा अनेक कार्यक्रमात विखेंमधले नेतृत्त्वगुण, संघटनकौशल्य, बुद्धीचातुर्य आणि सर्वसमावेशकता दिसली. त्यांच्या याच गुणांमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी असो किंवा थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा असो... सुजय विखेना थेट दिल्लीतील कोणत्याही वरिष्ठांच्या कार्यालयात थेट एन्ट्री मिळू लागली. हक्काने जबाबादारी देता येणारा युवा नेता, अशी त्यांची भाजपच्या दरबारी ओळख झाली. सुजय विखेंवरील भाजपचा विश्वास दिवसेंदिवस वाढतच चाललाय. त्यांच्यातील परिपक्व राजकारणी दिवसेंदिवस वाढतच चाललाय.

अशा या अष्टपैलू भाजप नेत्याला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.



# माणूस हा धर्म व माणूसपण हे कर्म जाणणारा नेता सुजय दादा विखे पाटील

दादा बिनधास्त बोलतात. म्हणजे ते फटकळ आहेत, असा त्याचा अर्थ होत नाही. चुकीच्या मार्गाने चालणाऱ्याला टोकणं म्हणजे फटकळपणा नसतो. तो नव्या पिढीसाठी मौलिक संदेश असतो. मार्गदर्शन असते. सुजय दादाही असेच आहेत. चुकीच्या रुढी, परंपरा, व्यवस्था अगदी चालिरीतीही त्यांना मान्य नाहीत. त्यांच्यावर ते ताशेरे ओढतात आणि मग विरोधक त्यांना 'फटकळ' असा शिक्का मारुन मोकळे होतात. ज्यांना सुजय विखे समजले ना, त्यांना त्यांच्या स्वभावही समजतो. ज्यांना त्यांचा स्वभाव समजतो त्यांना ते खरे वाटतात, मोकळे-ढाकळे वाटतात. त्यांच्या या सडेतोड बोलण्यानेच अनेकदा समज-गैरसमज पसरवले जातात आणि त्यातून राजकीय पोळी भाजली जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या याच स्वभावाबद्दल आज आपण बोलूयात...

ऑक्टोबर महिन्यांत राहाता-अस्तगाव शिवारात पाच दिवसांची शिवमहापुराण कथा झाली. कथेसाठी आलेल्या पंडीत प्रदीप मिश्रा यांनी विखेंच्या नियोजनाचे व संपूर्ण विखे कुटुंबाचे तोंड भरुन कौतूक केले. आपल्या आत्तापर्यंतच्या कथा इतिहासात एवढा नियोजनबद्ध व भव्य-दिव्य सोहळा कधीच झाला नाही, असं सिहोरवाल्या बाबांनी सांगून टाकलं. याच बातमीनं विखे परिवार व स्वतः सुजय विखे काय आहेत, हे राज्याला कळालं. फक्त राजकीय कार्यक्रमच नाही तर लाखोंच्या भाविकांचा आध्यात्मिक कार्यक्रमही विखे परिवार यशस्वी करु शकतो, हे जगानं पाहिलं. जो विखे पाटील परिवाराच्या जवळ गेला त्याला विखे पाटील परिवाराचा व स्वतः सुजय दादांचा स्वभाव कळतो. खऱ्या खरं व खोट्याला खोटं म्हणणं म्हणजे फटकळपणा नसतो. खरंतर योग्य वेळी योग्य व्यक्तीला समज दिली तर त्याचा त्या व्यक्तीला व समजालाही फायदा होणार असतो. हेच दादा करतात.

आता



**चुकीच्या प्रकारांवर बोलणं, हा दादांचा स्वभाव आहे. त्यामुळेच चुकीच्या माणसांना तो आवडत नाही. तीन वर्षांपूर्वी आदर्श शिक्षक पुरस्कारतही दादांनी असंच सडेतोड विधान करुन एका चुकीच्या प्रकारावर नाराजी व्यक्त केली होती. ते म्हणाले होते की, "अनेक गावांत कोटींची मंदीरे आहेत. परंतु शाळा मोडकळीस आल्या आहेत. मंदीरे बांधा. सप्ताह करा. पण ज्ञानमंदीरांकडेही लक्ष द्या. आपल्याकडे जो काम घेऊन येतो तो फक्त मुरमीकरण आणि बंधारे मागतो. जिल्हा परिषदेच्या शाळा सुसज्ज करा, असं कुणी म्हणत नाही. खरं तर बंधारे व मुरमीकरण हे फक्त कार्यकर्त्यांना पोसण्याचे उद्योग आहेत." दादांचं हे वाक्य त्यावेळी टाळ्या घेऊन गेलं, परंतु अनेक ठेकेदार कार्यकर्त्यांना ते आवडलं नाही.**

शिर्डीतल्या अन्नछत्राबाबत सुजयदादांनी केलेल्या विधानाचंच उदाहरण घ्या ना... फेब्रुवारी महिन्यात सुजय दादांनी शिर्डीतील अन्नछत्राबाबत एक वक्तव्य केलं होतं. तेथील मोफत व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. दोन वेळेला मोफत जेवण मिळत असल्याने भारतभरातील कुख्यात विचारांची लोक येथे आसरा घेतात, असं त्यांचं म्हणणं होतं. त्यामुळे साई भोजनालयाने काही रक्कम घेऊन जेवण द्यावं, असं त्यांनी सुचवलं. झालं... या वाक्याचा अनर्थ काढला गेला आणि त्यांना कोंडीत पकडण्याचाही प्रयत्न झाला. परंतु कितीही कॉंन्ट्रव्हर्सी झाली तरी सुजय दादा आपल्या वक्तव्यावर ठाम राहिले. आता सुजय दादांनी हे वक्तव्य का केलं होतं व त्यामागचा मतितार्थ काय होता, हे हळूहळू समोर आलं. खरंतर, दादांनी हे विधान केलं त्यापूर्वी शिर्डीत दुहेरी हत्याकांड झालं होतं. साई संस्थानच्या तीन कर्मचाऱ्यांवर हल्ला झाला होता. त्यात दोघांचा मृत्यू झाला. पोलिस तपासांत हे रॅंडम मर्डर असल्याचं समोर आलं. शिवाय नशेत ते केल्याचंही उघड झालं. शिर्डी उडता पंजाबच्या मार्गावर चाललंय का? हा प्रश्न उपस्थित झाला. शिर्डीत बाहेरून आलेले भिकारी व मोफत जेवणामुळे आलेले गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांमुळे शिर्डी काही वर्षांपासून अशांत झाली होती. त्यात हे दोन मर्डर नशेबाजाने केले होते. त्यामुळे हे रोखण्यासाठी सर्वात मोठा उपाय म्हणून मोफत अन्नछत्र बंद करावं, असं दादांनी सुचवलं होतं. अखेर शिर्डीत जेवणासाठी मोफत पास सुरु झाले आणि शिर्डी हळूहळू शांत झाली. दादांचं ते विधान किती खरं होतं, हे आत्ता समजलं. परंतु ज्यावेळी दादांनी हे विधान केलं होतं, त्यावेळी भयंकर ट्रोलिंग झाली.

दादांचा हाच स्पष्ट स्वभाव अनेकदा त्यांच्या कार्यकर्त्यांनाही आवडत नाही. विरोधक नेमकं त्यांच गोष्टींचं भांडवल करतात. परंतु काही असलं तरी, दादांच्या याच स्वभावामुळे त्यांच्यावर सामान्यांचा मात्र प्रचंड विश्वास आहे. "मी राजकारणात पैसा कमविण्यासाठी आलेलो नाही. मी फक्त समाजसेवा करण्यासाठी आलोय. पैसे माझ्याकडे भरपूर आहे. पैसाच कमावचा असता तर मी राजकारणात कशाला आलो असतो. मी डॉक्टर आहे. हॉस्पिटल उघडून लागेल तेवढा पैसा कमवला असता..." हे दादा त्यामुळेच सांगतात. दादांच्या हाच स्वभाव, हजारो सामान्यांना आशेचा नवा किरण वाटतो.

सध्याचं राजकारण पाहता, भ्रष्टाचाराचा एकही आरोप नसलेला महाराष्ट्रातील एकमेव युवा नेता म्हणजे सुजय विखे पाटील. राजकारणापूर्वी समाजकारण करावं लागतं, हे बाळकडू त्यांनी त्यांचे आजोबा स्व. बाळासाहेब विखे पाटलांकडून घेतलंय. त्यामुळेत चुकीच्या गोष्टींना दादा कसलीही भिडभाड न ठेवता, थेट विरोध करतात. जे आहे ते आहे... हे तेच सांगतात. विशेष म्हणजे दादा, फक्त राजकारण किंवा समाजकारणच करतात, असंही नाही. विखे कुटुंबातील प्रत्येक गुण त्यांच्यात आलाय. दादांमध्ये समाजसुधारक गुण असले तरी, आध्यात्मिक क्षेत्रातही ते तेवढेच कार्यरत असतात. नगर जिल्ह्यातील शेकडो मंदीरांचा केलेला जिर्णोद्धार, लाखो भाविकांच्या आग्रहास्तव नगर जिल्ह्यात केलेली पंडीत प्रदीप मिश्रा यांची शिवमहापुराण कथा, शिर्डीतील साईचरित्राची केलेली शेकडो पारायणे, मंदिरांभोवतीचे वॉलकंपाऊंड, सभामंडप, भक्तनिवास आदी कोट्यवधींच्या केलेल्या सुविधा, हे सगळं त्यांच्यातील हिंदूत्व दाखवतात. फक्त एकाच धर्मासाठी नाही, तर सुजयदादाचा परमार्थ हा सर्वसमावेशक असतो. सर्वसमभावावर ते जास्त विश्वास ठेवतात. 'माणूस' आणि 'माणूसपण' या दोन गोष्टींना ते जास्त महत्त्व देतात. त्यामुळेच सर्वांना आपला, आपल्या घरातील वाटणारा नेता ते झाले आहेत. उत्तरेत राहून दक्षिणेत खासदारकी मिळवणं किंवा संपूर्ण जिल्हातील कार्यकर्त्यांच्या गळ्यातील ताईत होणं, सोप्प नाही. पण हेच दिव्य दादांनी पार करुन दाखवलं. भाजपच्या राज्य पातळीवरच्या नेत्यांनाही या युवा नेत्यावर विश्वास असल्याने पक्षातील अनेक मोठ्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविल्या गेल्या. त्या त्यांनी तेवढ्याच विश्वासाने सार्थही करुन दाखवल्या.



**मा. आ. वैभवराव पिचड**
संचालक आदिवासी विकास महामंडळ.
चेअरमन अमृतसागर दूध संघ.

# शब्दप्रपंचात न मावणारं सामाजिक नाव म्हणजे सुजय विखे पाटील



(समर्थ गांवकरी)

सहकाराची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या विखे कुटुंबाची चौथी पिढी म्हणजे डॉ. सुजय विखे-पाटील. सुजयदादांना राजकारणात येऊन आता एक तप झालंय.

वैद्यकीय शाखेत न्यूरोसर्जन म्हणून शिक्षण घेतल्यानंतर 2013 सालापासून ते राजकारणात आहेत. शिर्डीत युवक कॉंग्रेस अध्यक्ष म्हणून त्यांच्या राजकारणाचा श्रीगणेशा झाला. कॉंग्रेस नंतर भाजप असा राजकीय प्रवास करत त्यांनी आज जिल्ह्यात, राज्यातच नव्हे तर थेट देशपातळीवर, स्वतःच्या नावाची महिमा स्वतःच्या हिमतीवर तयार केलीय. मंत्री असलेले राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पितृछायेत डॉ. सुजय विखे पाटील वाढले. आजोबा स्व. बाळासाहेब विखे पाटलांकडूनही त्यांनी समाजकारण व राजकारणाचे बाळकडू घेतले होते. वडीलांसह सुरुवातीला ते कॉंग्रेसमध्ये होते. 2019 च्या अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेसकडून त्यांनी उमेदवारी मागितली होती. मात्र, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधामुळे त्यांना ती मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी अखेर भाजपमध्ये प्रवेश केला. उमेदवारीही मिळविली. स्वत:ची यंत्रणा आणि भाजपची यंत्रणा यांच्या मदतीने त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार संग्राम जगताप यांचा सुमारे दीड लाख मतांनी पराभव केला. पहिल्यांदा लोकसभेत पोहोचले. सुजय विखेंनी त्यानंतर गेल्या पाच-सात वर्षांत नगरचा चेहरामोहरा बदलला. राजकीय विकासकामांसोबतच त्यांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. 2010 साली त्यांनी सामाजिक आदर्शाची स्वतःपासून सुरुवात केली. विखे पाटील परिवारातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या सामुदायिक विवाह सोहळ्यात त्यांनी धनश्री कुंजीर यांच्याशी विवाह केला. त्याही उच्च शिक्षित आहेत. त्या मूळच्या औरंगाबादच्या असून त्यांचे वडील बांधकाम व्यावयासिक आहेत. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आता धनश्री आपल्या पतीसोबत राजकारणात सक्रीय आहेत. राजकारणविरहीत कुटुंबाशी व अगदी साधेपणाने विवाह करुन त्यांनी समाजासमोर एक आदर्श घालून दिला. स्वतःच्या लग्नानंतर अर्थाने त्यांनी त्यांनी समाजिक कार्यात स्वतः झोकून दिले. ज्याची जी गरज असेल, ती पूर्ण करण्यावर त्यांचा भर राहिला. विखे फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांगांसाठी कित्येक शिबिरे भरवली. त्यात हजारो रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करुन लाखोंच्या साहित्यांचे वाटप केले. गरिबांना हक्काचा निवारा मिळवून दिला. सावळीविहीर परिसरात शेकडो घरकुले बांधून दिली. स्वतःच्या संस्थेत हजारो बेरोजगारांच्या हाताला काम मिळवून दिले. अन्न, वस्त्र व निवारा या तिन्हींच्या बाबतीत जिल्ह्यातील कोणतेच कुटुंब वंचित राहू नये म्हणून त्यांनी सतत काम केलं. ते काम आजही अव्याहतपणे सुरु आहे.

महिला सक्षमिकरण झालं तरच कुटुंब सुधारतं, हे सुजयदादांना माहित आहे. त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले. लघु उद्योगासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व उद्योजकता विकास कार्यक्रम हाती घेतला. हजारो महिलांना व्यवसायाचं प्रशिक्षण देऊन त्यांनी अनेक कुटुंबे स्वतःच्या पायावर उभी केली. जनसेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून दोनशेपेक्षा जास्त आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दत्तक घेवून या कुटुंबातील मुलांचे शिक्षण, मुलींचे विवाह आणि आरोग्य सेवेची जवाबदारी स्वतः घेतली. याशिवाय सामान्य नागरिकांना अत्यावश्क असलेले शासकीय दाखले, रेशन कार्ड, डोल प्रकरणे, घरकुलांचे प्रस्ताव घरपोहच दिले. जिल्हाभर सामुदायिक विवाह सोहळे घेत विवाह लावून दिले.

सुजय दादांचं सामाजिक कार्य छोट्या लेखप्रपंचात न मावणारं आहे. रोज राजकीय व्यापातही ते अव्याहतपणे सुरुच असतं. विळद घाट, पीएमटी यासारख्या हॉस्पिटलमध्ये रोज कित्येक रुग्णांवर मोफत उपचार सुरुच असतात. सुजय विखे पाटील हे शब्दप्रपंचात न मावणारं नाव आहे, हे तितकंच खरं.



**शब्दांकन**
विकास वाकचौरे
निष्ठांवत विखे पाटील समर्थक.
सुगांव, तालुका अकोले
जिल्हा अहिल्यानगर




भारतीय जनता पक्षाचे युवा नेते

# मा.खासदार सुजय दादा विखे पा.

आपणास वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा





शुभेच्छूक



## मा.श्री.वैभवराव मधुकरराव पिचड

मा.विधानसभा सदस्य

संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.

कार्यकारी विश्वस्त : अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले

चेअरमन : अमृतसागर दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या; अकोले



## मा.खासदार सुजय दादा विखे पा.

आपणास वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-

**श्री.बाळासाहेब आरोटे**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मोबा.९६२३२५८५३५




**श्री.धनराज बाळासाहेब आरोटे**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मोबा.८७६७८०७७२४

**श्री.सत्यजित बाळासाहेब आरोटे**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर

### मेसर्स स्वाती राणी

इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर

मु.पो.चितळवेढे, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

## अभिष्टचिंतन

**मा.खासदार**
**सुजय दादा**
**विखे पा.**

आपणास
वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
**समर्थ गांवकरी**

**AVP NEWS Channel**

**संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे**

राज्य सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ
तज्ज्ञ संचालक: सह्याद्री ग्रा.बि.शेती सह.पतसंस्था मर्या; अकोले
संचालक: अकोले ग्रा.बि.शेती सह.पतसंस्था मर्या; अकोले
सल्लागार: मुक्ताई मजुर सोसायटी
मा.चेअरमन: अकोले तालुका कर्मचारी व कारागिर पतसंस्था मर्या; अकोले

पत्ता : दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय
भिंगारे गोडाऊन समोर, मु.पो.ता.अकोले, जि.अहमदनगर
मोबा.९४२३३८८५०८ / ९४२३४६७२७२





## मा.खासदार सुजय दादा विखे पा.

आपणास वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-




**श्री.विकासराव वाकचौरे**
सामाजिक कार्यकर्ते

**सौ.मनिषा विकासराव वाकचौरे**
सामाजिक कार्यकर्त्या

मु.पो.सुगाव बु।।, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# कुंभमेळ्याच्या नावाखाली झाडांची कत्तल; सयाजी शिंदे संतापले !

■ "१०० जणांचं बलिदान देऊ पण नाशिकमध्ये एकही झाड तोडू देणार नाही!"

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

आगामी कुंभमेळ्याच्या तयारीच्या नावाखाली नाशिक शहरातील झाडांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली कत्तल पर्यावरणप्रेमींसाठी गंभीर चिंता निर्माण करणारी ठरत आहे. याच संदर्भात ज्येष्ठ अभिनेते व पर्यावरण कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून त्यांच्या संतप्त विधानांची सोशल




मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे.

शिंदे म्हणाले, "१०० जणांचं बलिदान देऊ पण नाशिकमध्ये एकही झाड तोडू देणार नाही. माणसं पेटून उठतील, मी फक्त निमित्त असेन. कुंभमेळ्यासाठी झाडं तोडणे दुर्दैवी आहे; खूप विरोध करावा लागेल. '१ झाड तोडून १० झाडं लावू' हे विधान फालतू आहे. सरकार आपलं असूनही बेजबाबदारपणे वागत आहे. खरं तर माझ्या तोंडात शिव्या येतायत."

कुंभमेळा ही जगभरातून भाविक येणारी भव्य धार्मिक परंपरा असली तरी तिच्या तयारीत पर्यावरणाचे होणारे नुकसान हा वादाचा मुद्दा ठरत आहे. शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवरील प्रौढ वृक्ष तोडण्यात येत असल्याची माहिती पुढे येत असून अनेक स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शिंदे यांच्या आक्रोशानंतर पर्यावरण रक्षणासाठी आवाज आणखी जोर धरताना दिसत आहे. "विकासाच्या नावाखाली पर्यावरणाच्या छाताडावर घाव करू नका," असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे. नाशिकमध्ये पुढील काही दिवसांमध्ये पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून मोठा जनआंदोलन उभा राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शहरात विकास आणि पर्यावरण संरक्षण यात समतोल साधण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.




ठाणे : दिव्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कल्याण ग्रामीण विधानसभा संघटिका योगिता नाईक यांच्यावतीने दातीवलीगाव येथे मोफत मेडिकल कॅम्प आयोजित करण्यात आला होता. सदर शिबिरास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. प्रसंगी ठाकरे शिवसेनेचे अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्येकर्ते यांनी आपली उपस्थिती लावली. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### महामार्ग पोलिसांना वाहनं नसल्याने माळशेज घाटात पोलिस बंदोबस्त बंद!

ठाणे (स. गांवकरी) : गेल्या काही दिवसांपासून महामार्ग पोलिस यांच्याकडे सरकारी वाहनं नसल्याने माळशेज घाटात पोलिस बंदोबस्तासाठी जात नसल्याचे चित्र बघायला मिळत आहेत . काही दिवसांपूर्वी माळशेज घाटातील आवळेची वाडी येथे अपघात झाला होता यात जमावाने दगडफेक करून महामार्ग पोलिस यांच्या गाड्या फोडून टाकल्या असल्याने त्यांना माळशेज घाटात जाण्यासाठी वाहनं नसल्याने ते उमरोली चेक नाक्यावर विनाकारण बसून स्थानिक लोकांना त्रास देण्याचा काम करत आहेत तरी पोलिसांच्या या वाहनांचा लवकरच बंदोबस्त करण्याची मागणी पोलिस मित्र मानधिकार संघटना ठाणे जिल्हा अध्यक्ष राजेश भांगे यांनी केली आहे.

### दिव्यात श्री अनिरुद्ध पथक यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर संपन्न

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : देशात दर दोन सेकंदामागे एका व्यक्तीला रक्तपुरवठ्याची गरज भासते. आपल्यातील तीन जणांपैकी दोघांना आयुष्यात एकदा तरी रक्ताची आवश्यकता निर्माण होते कारण विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी मानवी रक्ताला अजूनही पर्याय मिळालेला नाही म्हणूनच रक्तदानाचा अर्थ जीवनदान असा होतो. आपल्या देशाच्या लोकसंख्या पैकी ६० टक्के रक्तदान करण्यासाठी सक्षम असतात पण वर्षाकाठी यातले एक टक्का इतकेच रक्तदानासाठी पुढे येतात त्यामुळे आपल्या देशाला दरवर्षी सुमारे 30 लाख युनिट्स इतकी रक्ताची कमतरता भासते याच कारणामुळे रक्तदान हा आपल्या कर्तव्याचा भाग ठरतो. गेली दोन दशकांहून अधिक काळ श्री अनिरुद्ध आदेश पथक, दिलासा मेडिकल ट्रस्ट अँड रिहॅबिलिटेशन सेंटर, अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट, अनिरुद्ध समर्पण पथक या संस्था रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे. डॉ. अनिरुद्ध जोशी एमडी मेडिसिन, (सदगुरु श्री अनिरुद्ध बापू) यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने स्थापन झालेल्या या संस्थांनी 1999 सालापासून रक्तदान शिबिरांचे आयोजन करून आत्तापर्यंत 1.65 लाख युनिट इतके रक्तदान संकलित केले आहे. परमात्म्यास नऊ प्रकारचे थेंब अत्यंत आवडतात, ज्यात एका श्रद्धावानाने दुसऱ्या श्रद्धावानांसाठी निरपेक्ष भावनेने केलेल्या रक्तदानाचे थेंबही महत्त्वाचे आहेत', असे सदगुरु श्री अनिरुद्धांनी श्रीमद्पुरुषार्थ ग्रंथराजाच्या 'आनन्दसाधना' या तृतीय खंडात सांगितले आहे याच पंक्ती नुसार आज दिवा शहरात श्री अनिरुद्ध आदेश पथक यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते यात शेकडो नागरिक व भक्त यात सहभाग घेऊन रक्तदान केले आहे.

### संजय लोखंडे याची खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी निवड



पाथर्डी (स. गांवकरी) : नोव्हेंबर २०२५ या कालावधीत बिकानेर, राजस्थान येथे होणाऱ्या ५ व्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स, वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा विद्यार्थी संजय लोखंडे याची ६५ किलो वजन गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात निवड झाली आहे. लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, जालंधर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रत्येक वजन गटात पहिल्या आठ क्रमांकाच्या खेळाडूंची या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी निवड करण्यात आली आहे. या पूर्वी संजय लोखंडे याने ४ वेळेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वेटलिफ्टिंग संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

# महाविकास आघाडीचा विचित्र खेळ, 'ये रिश्ता क्या कहलाता है'ची आठवण!

**किनवट :** (समर्थ गांवकरी)

किनवट शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये राजकीय समीकरणांचा अनोखा मेळ दिसून येत असून मतदारांमध्येही चांगलाच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रभागात नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यात थेट सामना रंगणार आहे. प्रभागातील दोन जागांपैकी (७-अ) अनुसूचित जाती महिला राखीव असून (७-ब) जागा खुल्या प्रवर्गासाठी राखीव आहे.

प्रभाग ७-अ मध्ये तिघीही महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा मुकाबला

प्रभाग क्रमांक ७ (अ) या अनुसूचित जाती महिला राखीव जागेवर तिन्ही महिलांचा मुकाबला होणार आहे. विशेष म्हणजे, या तिघीही उमेदवार 'महाविकास आघाडी'तील विविध घटक पक्षांमधून आहेत.

* शिवसेना उ.बा.ठा तर्फे – *दैवशाला भालेराव
* राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) तर्फे – सलोनी स्वामी नुतपेल्लीवार
* अपक्ष – ललिताबाई मारोती मुनेश्वर

अशा प्रकारे महाविकास आघाडीतीलच तिघी उमेदवार एकमेकाच्या विरुद्ध आल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तर भाजपा तर्फे प्रभाग क्रमांक 7 (अ) ज्योती नगराळे तर 7(ब) श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

येथे खुल्या प्रवर्गातील उमेदवार श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार हे स्वतः उमेदवारी लढवत असताना प्रभाग ७-अ मधील अपक्ष उमेदवार ललिताबाई मुनेश्वर यांना सोबत घेऊन प्रचारात सक्रिय दिसत आहेत. तर आणखी एक ट्विस्ट म्हणजे या प्रभागातील भाजपाचे उमेदवार श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार असून महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार हे आहेत तरी "ये रिश्ता क्या कहलाता है" मालिकेला साजेशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. तर मतदान करताना मतदारांना आपल्या बुद्धीचा अचूक उपयोग ही करावा लागणार आहे.

निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीला शहरात युती-आघाडीचे कोणतेही स्पष्ट स्वरूप दिसत नव्हते. मात्र नामांकनाची शेवटची तारीख जवळ येताच गोंधळ वाढला आणि सर्व पक्षांनी वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या उमेदवारी अंतिम केल्या. शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले की, भाजपा, शिवसेना (उ.बा.ठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांची आघाडी झाली असून काँग्रेसने नगराध्यक्ष आणि १२ सदस्य असे स्वतंत्र उमेदवार देत "एकला चालो रे"ची भूमिका घेतली आहे. प्रभाग क्रमांक ५ (अ) मध्ये घडलेली राजकीय कलाटणी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते कपिल नाईक यांचे निकटवर्तीय चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी दोन महिन्यांपूर्वी 'तुतारी' (राष्ट्रवादी शरदपवार पक्ष) कडून लढणार असल्याची घोषणा केली होती आणि त्यांनी प्रचारही सुरू केला होता. मात्र नामांकन प्रक्रियेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उ.बा.ठा यांची आघाडी जाहीर झाली. या दरम्यान नेम्मानिवार यांना 'तुतारी' ऐवजी 'मशाल' (शिवसेना उ.बा.ठा) चिन्हावर निवडणूक लढण्यास सांगण्यात आले, आणि त्यांनी त्यास होकारही दिला.

### भाजपासमोर मोठे आव्हान – 'बंडोबा' शांत कसे करणार?

भाजपकडून अनेक कार्यकर्ते उमेदवारीच्या तयारीत होते. पण ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सोबत युती झाल्याने अनेकांना उमेदवारी मिळाली नाही. आता या असंतुष्ट कार्यकर्त्यांना शांत करणे ही भाजपसमोरची मोठी परीक्षा ठरणार आहे. प्रभाग क्रमांक ४ (अ) या अनुसूचित जाती सर्वसाधारण राखीव जागेवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI)चे विवेक ओंकार यांनी नामांकन दाखल केले आहे. त्यांनी महायुतीने उमेदवारी न दिल्याचा आरोप करत निषेधाची भूमिका घेतली आहे. त्यांना शांत करण्यासाठी महायुतीचे प्रयत्न सुरू असून त्याचा निकाल काय लागतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. किनवट नगरपरिषद निवडणुकीत यंदा आघाडी, युती, तुटणे-जोडणे, नाराजी आणि नाट्यमय वळणांचे राजकीय दृश्य पाहायला मिळत आहे. प्रभाग क्रमांक ७, ५ आणि ४ मधील घडामोडींमुळे संपूर्ण शहरात चर्चांना ऊत आला असून निवडणुकीतील रंगत दिवसेंदिवस वाढत आहे.

# महिला नायब तहसीलदार 'एसीबी'च्या जाळ्यात

**तामसा :** (समर्थ गांवकरी)

■ तामसा परिसरातील वारकवाडी येथील राशन दुकानदार काढून लाच स्वीकार

प्रतिनिधी हदगांव येथील तहसील कार्यालयात पुरवठा विभागात कार्यरत असलेली लाचखोर नायबतहसीलदार सुमन संभाजी कऱ्हाळे त्यांच्यासाठी लाचेची रक्कम स्वीकारणारा कंत्राटी डेटा ऑपरेटर गोविंद आप्पाराव जाधव हे दोघे २२ नोव्हेंबर रोजी सापळ्यात अडकले आहेत. वारकवाडी येथील राशन दुकानदाराकडे १० टक्के मागण्यावरून सदरील प्रकार समोर आला. दरम्यान पुरवठा विभागांतर्गत पुरविल्या जाणाऱ्या राशन कार्डची केवायसी करणे, नवीन नावे समाविष्ट करणे यासह विविध कारणांसाठी नागरिकांची आर्थिक पिळवणूक केली जात होती. भरीस भर हदगाव तहसील कार्यालयात पैसे घेताना रंगेहाथ पकडले राशन दुकानाच्या नफ्यातील १० टक्के रक्कम दरमहा आणून देण्याची उघड मागणी नायब तहसीलदार सुमन कऱ्हाळे यांनी केली होती.

# विज्ञान महोत्सवातून शास्त्रज्ञ घडतील : अरविंद कुमावत

**अकोले :** (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील जि.प.प्राथमिक केंद्रशाळा लहित खुर्द येथे विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.त्यानिमित्ताने शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमाबाबत कौतुक केले.

शाळा स्तरावर एवढे मोठे प्रदर्शन प्रथमच होत असल्याची भावना व्यक्त केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन राज्य विज्ञान मंडळाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय आरोटे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून अकोले तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, केंद्रप्रमुख वाल्मिक बडे, प्राचार्य उल्हास घोडे,




सरपंच अनिता गोडसे,तालुका विज्ञान संघटनेचे अध्यक्ष शाम मालुंजकर, साधनव्यक्ती राहुल देशमुख, आदी उपस्थित होते.

यावेळी विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तके व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कावेरी कडाळे हिला इन्स्पायर अवॉर्ड प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी दत्तात्रय आरोटे यांनी आपल्या व्याख्यानातून सहज सोप्या भाषेत विद्यार्थ्यांशी हितगुज साधत विविध विज्ञानातील प्रयोग करून दाखवले.

विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी बनविलेली विविध उपकरणांची मान्यवरांनी पाहणी करत माहिती घेतली. पालक,विद्यार्थी,शिक्षक यांच्या समन्वयातूनच असे सुंदर कार्यक्रम यशस्वी होऊ शकतात अशी भावना केंद्रप्रमुख वाल्मिक बडे यांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वैभव गोडसे,उपाध्यक्ष सुहास गोडसे,मुख्याध्यापिका पुष्पा नवले,पदवीधर शिक्षक,रंगनाथ भांडकोळी,संतोष दिवे,विठ्ठल सावळे,संदीप बर्वे,नलिनी साळवे,यांनी प्रयत्न केले.प्रदर्शन पाहण्यासाठी परिसरातील विविध शाळेतील मुलांनी गर्दी केली होती.

# रहस्य, एक्शन आणि भावनांचा संगम; 'आफ्टर ओएलसी'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

दुनियेच्या आड दडलेलं एक गूढ लवकरच उलगडणार. हो. 'आफ्टर ओएलसी' चित्रपटाचा ट्रेलर पाहून असंच वाटू लागलंय. बरेच दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'आफ्टर ओएलसी' चित्रपटाचा ट्रेलर समोर आला आहे. अगदी थाटामाटात 'आफ्टर ओएलसी' चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा चित्रपटातील कलाकार आणि इतर टीमच्या उपस्थितीत पार पडला. चित्रपटाचा ट्रेलर सुरू होताच वातावरणात एक अज्ञात तणाव पसरतो. मैत्री, विश्वासघात, आणि लपलेल्या रहस्यांच्या या



गुंत्यातून बाहेर पडताना हा चित्रपट कोणतं रहस्य मागे सोडणार याची उत्कंठा वाढवणारा आणि रहस्यमय थराराने, एक्शन पॅक्ड सीन्सने भरलेला हा सिनेमा आहे असं ट्रेलरवरून स्पष्ट होतंय. कलाकारांचा दमदार अभिनय, दिग्दर्शकाचे उत्तम दिग्दर्शन, शूट करण्यात डीओपीने कसलीही न सोडलेली कमतरता, जबरदस्त आणि रोमँटिक टच असलेल्या संगीताची जादू या सगळ्या गोष्टींनी ट्रेलरमधूनच चित्रपटाची उत्सुकता वाढवली आहे. हा चित्रपट कन्नड आणि मराठी या दोन्ही सिनेसृष्टीला जोडणारा धागा आहे. कारण यांत निर्माते ते अगदी कलाकार हे कन्नड आणि मराठी या दोन्ही सिनेसृष्टीतील दिग्गज आहेत. आणि प्रेक्षकांसाठी हा संगम पर्वणीच म्हणायला हवी. ट्रेलरनंतर येत्या २८ नोव्हेंबरला हा सिनेमा मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे दिग्दर्शक सदागारा 'आफ्टर ओएलसी' चित्रपटात अभिनेता कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके यांच्यासह चित्रपटात प्रसाद खांडेकर, अश्विनी चवरे, शलाका पवार, रुक्मिणी सुतार ही कलाकारांची फौज पाहायला मिळत आहे.

# 'जि. प'.च्या वरिष्ठ लिपिक विमलबाई भुरे यांचे निधन

**नांदेड:** (समर्थ गांवकरी)

नांदेड जि. प.च्या वरिष्ठ लिपिक विमलबाई मदनराव भुरे थडीसावळीकर (वय-५६ वर्षे, रा. हडको, नांदेड) यांचे प्रकृती अस्वास्थ्यामुळे २२ नोव्हेंबर रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी २३ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता नांदेडच्या 'सिडको' परिसरातील 'वैकुंठधाम' स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना व नातवंडे



असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते कामेश भुरे, नितीन भुरे तसेच चेतन भुरे थडीसावळीकर यांच्या 'त्या' मातोश्री होत.

# "डेटा योजनांचा जंगलराज! फक्त बोलणाऱ्यांचा आवाज कोण ऐकणार?"

■ "ग्रामीण भारताची हाक: आम्हाला इंटरनेट नको, फक्त बोलू द्या!"

■ "टेलिकॉम कंपन्यांचा अन्याय! 'व्हॉईस-ओन्ली' योजना गायब, लोक त्रस्त!"

■ "वृद्ध आणि शेतकरी वंचित! 'फक्त कॉलिंग' योजना कधी मिळणार?"

(समर्थ गांवकरी)

**लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून!**

भारत हा जगातील सर्वात मोठा टेलिकॉम बाजार. दर महिन्याला "अनलिमिटेड डेटा", "5G स्पीड", "हाय-स्पीड डाउनलोड" अशी आकर्षक योजना येतात. पण या चमकदार योजनांच्या गर्दीत एक साधा, मूलभूत प्रश्न कायम अनुत्तरितच राहतो — ज्यांना फक्त बोलणे महत्त्वाचे आहे त्यांचे काय?

आजही भारतात लाखो लोक मोबाइल फोन इंटरनेटसाठी नव्हे तर फक्त बोलण्यासाठी वापरतात. या नागरिकांसाठी 'डेटा-केंद्रित योजना' नव्हे तर परवडणाऱ्या व्हॉईस-ओन्ली रिचार्जची गरज अधिक आहे.

भारताचे मोठे लोकसंख्याशास्त्र ग्रामीण भागात राहते. अनेक शेतकरी, रोजंदारीवर काम करणारे मजूर, महिला आणि वयोवृद्ध पालक हे फोनचा वापर फक्त: नातेवाईकांना विचारपूस करण्यासाठी. शेतातील कामाबाबत माहिती घेण्यासाठी. मुलांशी/नातवंडांशी बोलण्यासाठी. सरकारी अधिकारी किंवा डॉक्टर यांच्याशी संपर्क करण्यासाठी. इंटरनेट हे त्यांच्या दैनंदिन वापराचा भाग नाही. मग त्यांना न वापरणाऱ्या डेटासाठी पैसे का भरावे? देशभरातील कोट्यवधी ज्येष्ठ नागरिकांची ही व्यथा आहे.

त्यांना सोशल मीडिया चालवायचा नाही... व्हिडीओ पाहायचे नाहीत... फक्त त्यांना त्यांच्या प्रिय व्यक्तींचा आवाज ऐकायचा आहे.




पण आज बाजारात मिळणाऱ्या योजनांमध्ये डेटा जबरदस्तीने "बंडल" केलेला असतो.

४ जीबी, १२ जीबी किंवा "अनलिमिटेड डेटा" — जे ते कधीच वापरणार नाहीत.

ही परिस्थिती फक्त अनावश्यक खर्चच नव्हे तर अन्याय देखील आहे. टेलिकॉम कंपन्या आज बहुसंख्य योजनांमध्ये डेटा-केंद्रित ऑफरच देतात. कारण... डेटा प्लॅनमध्ये नफा जास्त.

ग्राहकाला अधिक महागडे रिचार्ज करवणे सोयीस्कर.

डेटा बंडलद्वारे दीर्घकाळ ग्राहक टिकून राहतात. पण प्रश्न असा की:

या प्रयोगांमध्ये "फक्त बोलणारे" ग्राहक कुठे हरवले? मोबाईल फोनचा मूळ उद्देश संवाद होता — वापर नव्हे! मोबाईल फोनची सुरुवात झाली संवादासाठी, आवाजासाठी.

वेळ जशी बदलली तसा त्याचा वापर मनोरंजन आणि डेटा खपताकडे झुकला. परंतु अजूनही एक मोठा वर्ग आहे ज्याला फक्त आवाजाच्या संवादाचीच आवश्यकता आहे. भारताच्या डिजिटल क्रांतीने झेप घेतली खरी,

पण त्यात अनेक लोक मागे पडले — कारण त्यांना डिजिटल नव्हे तर आवाजाची गरज होती.

डेटा नाही, फक्त स्पष्ट कॉल अशी योजना किती महत्त्वाची? कल्पना करा,

टेलिकॉम कंपन्यांनी कमी किमतीचे, शुद्ध व्हॉईस-ओन्ली प्लॅन्स सुरू केले तर... ग्रामीण भागातील वृद्ध पालकांना परवडणारी योजना मिळेल.

रोजंदारीच्या कामातून मिळणाऱ्या पैशांचे योग्य नियोजन करता येईल.

डेटा न वापरण्याऱ्या लोकांचा मासिक खर्च कमी होईल.

सामाजिक समावेशन वाढेल, कारण संवाद सर्वांसाठी उपलब्ध होईल.

टेलिकॉम क्रांती पुन्हा आपल्या मूळ ध्येयाला स्पर्श करेल. भारताला गरज आहे — "व्हॉईस-ओन्ली रिव्हॉल्यूशन" ची! इंटरनेट महत्त्वाचे आहे, यात शंका नाही.

पण सर्वांना इंटरनेटची गरज नसते, आणि जे त्याचा वापर करत नाहीत त्यांना जबरदस्तीने डेटा प्लॅन विकणे योग्य नाही. भारताला आज गरज आहे— सरकारने 'व्हॉईस-ओन्ली' प्लॅन अनिवार्य करावेत.

टेलिकॉम कंपन्यांनी वेगळे व्हॉईस रिचार्ज बाजारात आणावेत.

डेटा बंडल न करता फक्त "अनलिमिटेड कॉलिंग" पर्याय उपलब्ध करावा. ही पॉलिसी लागू झाल्यास लाखो लोकांना दिलासा मिळेल. कारण संवादासाठी ५जी लागत नाही... फक्त आपल्या माणसांचा आवाज लागतो टेलिकॉम क्रांतीने आता तिच्या पायाभरणीवर परत येण्याची वेळ आली आहे.

आजही अनेकांच्या आयुष्यात मोबाइल फोनचा अर्थ, खरे बोलणे, खरा संवाद, एवढाच आहे.

भारताने "डेटा-केंद्रित" मॉडेल पलीकडे जाऊन आता 'व्हॉईस-फर्स्ट' भारत घडवण्याची वेळ आली आहे.

फक्त एका साध्या गोष्टीसाठी: दुसऱ्या टोकावरून येणाऱ्या आपल्या व्यक्तीच्या आवाजासाठी.

# निरोगी, सुदृढ आणि आरोग्य केंद्रित समाज निर्मितीसाठी आरोग्य दूत उपक्रम

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

किशोरवया पासूनच आरोग्याची काळजी व जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य दूत हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. निरोगी, सुदृढ आणि आरोग्य-केंद्रित समाज निर्मितीसाठी हा उपक्रम प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले. जिल्हा परिषदेच्या सभागृहात आज मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, सीएम फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी निलकुमार ऐतवडे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, माता-मुल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, सहाय्यक संचालक कुष्ठरोग नियंत्रण अधिकारी डॉ. शेख बालन, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतिश कोरपूरवा आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे त्या म्हणाल्या, आरोग्य दूत उपक्रमात इयत्ता सहावी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे.



प्रत्येक गावातून एका विद्यार्थ्याची निवड करण्यात आली आहे. आरोग्याची काळजी, प्राथमिक उपचार, आजार होण्याआधी प्रतिबंधात्मक उपाय, वाढता ताणतणाव, संतुलित व सकस आहार आदी विषयांचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या उपक्रमात आरोग्य विभागाबरोबरच कृषी, पशुसंवर्धन तसेच पाणी व स्वच्छता विभागाचाही सहभाग राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे प्रशिक्षित मुलं-मुली आरोग्यदूत म्हणून आपल्या गावात व समाजात जनजागृती करून निरोगी कुटुंब आणि आरोग्यमय आयुष्य घडविण्यास हातभार लावतील, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केला.

आरोग्य दूत हा उपक्रम नांदेड जिल्ह्याच्या आरोग्यसेवेत दूरगामी व सकारात्मक बदल घडविणारा ठरेल, असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेनुका दराडे यांनी तर आभार प्रदर्शन वैशाली बेरलीकर यांनी केले.



ठाणे : ठाण्यात रिपब्लिकन सेनेचा ११ वा वर्धापनदिन अनेक मान्यवरांच्या मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ठाणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, जांभळी नाका येथे पार पडला. सदर वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला रिपब्लिकन सैन्याचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. आनंदराज आंबेडकर उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. रामभाऊ तायडे (महाराष्ट्र राज्य नेते) यांनी कार्यक्रमाची पूर्ण आखणी केली होती तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रसंगी रिपब्लिकन सैन्याने येणाऱ्या आगामी निवडणुकीत मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर एकत्रित निवडणुकीला समोर जाण्याचे ठरवले असून प्रसंगी अनेक मान्यवर पाहुणे उपस्थित होते, तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमाला उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### शिक्षण व आरोग्य क्षेत्र एकत्र येणार

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासह शैक्षणिक व संशोधनात्मक देवाणघेवाण मजबूत करण्यासाठी एक ऐतिहासिक सामंजस्य करार संपन्न झाला आहे. शिक्षण व आरोग्य क्षेत्राचे हे अभिनव एकत्रीकरण दोन्ही संस्थांच्या विद्यार्थी, संशोधक आणि अध्यापकवर्गासाठी नव्या संधींचे दार उघडणारे ठरणार आहे. या कराराचा प्रमुख उद्देश शैक्षणिक बहुविधता, व्यावहारिक आरोग्यसेवा आणि तांत्रिक प्रगतीला गती देणे हा आहे. करारांतर्गत खालील प्रमुख क्षेत्रांत सहकार्य होणार आहे: दोन्ही संस्थांमधील वैज्ञानिक संबंध व शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करणे संयुक्त ऑनलाइन इ-सामग्री आणि अभ्यास साहित्य विकसित करणे विद्यार्थ्यांसाठी ऑन-दी-जॉब ट्रेनिंग (OJT), अप्रेंटिसशिप व इंटर्नशिप संधी उपलब्ध करणे समान विषयक्षेत्रातील अभ्यासक्रम विकासाला चालना परिसंवाद, कार्यशाळा आणि शैक्षणिक बैठकांमध्ये संयुक्त सहभाग विविध विषयांवरील संयुक्त संशोधन प्रकल्प राबविणे अभ्यासक्रमामध्ये बहुविषयक पद्धतीचा समावेश या सहकार्याचा एक विशेष पैलू म्हणजे एसआर टी एम यू च्या ललित कला विभागाचे आरोग्यशास्त्राशी होणारे एकत्रीकरण, ज्यातून मानसिक व शारीरिक आरोग्य संवर्धनाचा नवीन शैक्षणिक दृष्टिकोन विकसित होणार आहे. दोन्ही संस्थांनी शिक्षक व संशोधकांमध्ये सातत्यपूर्ण संवाद आणि नियमित बैठका घेऊन या कराराची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे आश्वासन दिले आहे.या वेळी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ मनोहर चासकर कुलसचिव डॉ डी डी पवार प्रा. एम. के. पाटील – डीन, सायन्स अँड टेक्नॉलॉजी, प्रा. एस. जे. वाढेर – डीआयआयएल, प्रा. जी. कृष्ण चैतन्य – संचालक, सीआयसीएमआरआय डॉ. बी. एस. रेड्डी – संचालक, आयक्यूएसी डॉ. अशोक कदम – जनसंपर्क अधिकारी यांची उपस्थिती होती तर डॉ शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, डॉ. शितल राठोड, डॉ उमेश अथ्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. या कराराची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात प्रा. जी. कृष्ण चैतन्य, प्रा. एस. जे. वाढेर आणि प्रा. टी. ए. कदम यांचे विशेष योगदान राहिले.



### विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढविणार : डॉ. राजेंद्र वानखेडे

- देशात नरेंद्र,महाराष्ट्र देवेंद्र व हिमायतनगरात राजेंद्र चा बोलबाला; भाजपाचा प्रचार शुभारंभ

हिमायतनगर (स. गांवकरी) : आगामी होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ आज दिनांक २२ नोव्हेंबर रोजी श्री परमेश्वर मंदिर येथून करण्यात आला या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी भाजपा नेते डॉ.अंकुश देवसरकर,गिरीश जाधव, डॉ. प्रसाद डोंगरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री परमेश्वर महाराजांची महापूजा व आरती करून अनेक मान्यवरांच्या हस्ते नारळ श्रीफळ फोडून या नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार शुभारंभ करण्यात आला प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या भाजपाच्या पदयात्रेला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला रॅलीच्या मार्गावर विविध मंदिरासह अनेक ठिकाणी श्रीफळ फोडण्यात आले जागोजागी भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेले डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांचे मतदारांनी स्वागत करून त्यांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

### बरबडा येथे ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा येथील श्री येताळेश्वर मंदिरामध्ये श्री ज्ञानेश्वरी पारायण, राम कृष्ण हरी जप व अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची शृंखला दि २१ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आली आहे. सलग ३० वर्षांची परंपरा असलेल्या या सप्ताहामध्ये दररोज विविध किर्तनकारांचे प्रवचन, भजन, हरिपाठ तसेच रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन. त्यानंतर सकाळी ७ ते ८ रामकृष्ण हरी जप आणि सकाळी १० ते १२ गाथा भजन, संध्याकाळी ५ ते ६ हरिपाठ तर रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन यांचा समावेश आहे. या सप्ताहासाठी खालील मान्यवर कीर्तनकार ह.भ.प. श्रीधर महाराज कासराळीकर,ह.भ.प. किशन महाराज बरबडेकर,ह.भ.प. बालाजी महाराज गुडेवार नांदेड,ह.भ.प. गंगाधर महाराज हंबर्डे दरेगावकर,ह.भ.प. कु. वेदिका आलेवार बरबडेकर,ह.भ.प. डॉ. दत्ता महाराज वळशींगे वळसंगवाडीकर ह.भ.प. गोपीचंद शास्त्री सारसेकर यांची कीर्तनसेवा आयोजित केली आहे. भजनी मंडळाचे गायक ह.भ.प. श्रीधर पाचाळ, बबलू पाचाळ व धोंडीबा चिवटेवाड यांचेही योगदान लाभणार आहे. कार्यक्रमाचे मृदंगाचार्य ह.भ.प. दामोदर भारती असून भक्तिपर कार्यक्रमांच्या माध्यमातून श्रद्धाळूंना अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव मिळणार आहे.

# दबाव टाकून राष्ट्रवादीच्या महिला उमेदवाराला डांबून ठेवले

**संतप्त जमावाकडून हातापाई, उमेदवार महिलेची पोलीसात धाव**

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली नगर परिषद निवडणुकीसाठी प्रचार रणधुमाळी चालू असून. काहीची प्रतिष्ठापणाला लागली आहे. उमेदवारी माघार घेण्यासाठी आर्थिक बल व दबाव तंत्रचा वापर करून एका राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या महिला उमेदवाराला व त्यांच्या पतीला चक्क डांबून ठेवल्याचा प्रकार घडला आहे. वेळीच पोलीस प्रशासनाच्या मदतीने त्यांची सुटका कारण्यात आली. तद्रंतर उमेदवार महिलेने बिलोली पोलीस धाव घेऊन संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

बिलोली नगर परिषद नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी १० नोव्हेंबरपासून ते १७ नोव्हेंबर पर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले यानंतर नमानिर्देशन पत्राची छाननी प्रक्रिया पार पडल्यानंतर स्वतः हुन उमेदवारी माघार घेण्याची अंतिम तारीख २१ नोव्हेंबर होती. या दिवशी शहर विकास आघाडीच्या नेत्याकडून प्रभाग क्रमांक २ मधील राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाच्या उमेदवाराला उमेदवारी माघार घेण्यासाठी आर्थिक बलाचा वापर करण्यात आल्याचा गंभीर प्रकार घडला आहे.

स्वितर वृत्त: बिलोली शहरातील प्रभाग क्रमांक २ मधून नगरसेवक पदासाठी राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून सौ. विजयालक्ष्मी बालाजी हरणे ह्या निवडणूक रिंगणात आहेत. तसेच याचं प्रभागात माजी नगराध्यक्ष व शहर विकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संतोष कुलकर्णी यांची पत्नी माजी नगराध्यक्षा सौ. मैथिली संतोष कुलकर्णी यांनीही शहर विकास आघाडीकडून निवडणूक लढवीत आहेत. कुलकर्णी आपण स्वतः नगराध्यक्ष पदासाठीतर आपल्या पत्नीला प्रभाग २ मधून नगरसेवक पदासाठी उभे केले आहेत.यात पत्नीचा विजयाचा मार्ग मोकळा जावा म्हणून आपल्या पत्नीचे प्रतिस्पर्धी सौ. विजयालक्ष्मी हरणे व त्यांचे पती बालाजी हरणे यांच्यावर गेल्या चार दिवसापासून आर्थिक बल व दबाव तंत्रचा वापर केल्या जात होता. शेवटी हरणे यांची थाटर भूमिका पाहून २१ नोव्हेंबर रोजी संतोष कुलकर्णी यांनी हरणे दांपत्यला त्यांच्या घरातून जोर जबरदस्तीने एका खजगी वाहनाने उचलून नेऊन एका व्यक्तीच्या घरात डांबून ठेवण्यात आले होते. हा प्रकार राष्ट्रवादी कांग्रेसपक्षाचे पॅनल प्रमुख तथा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इंद्रजीत यादवराव तुडमे यांना कळताच तुडमे यांनी ही बाब पोलीस प्रशासनाला कळविली. पोलीस प्रशासनांनी त्याठीकाणी तात्काळ धाव घेऊन हरणे दांपत्याची सुटका केली. यानंतर नगर परिषद समोर दोन गटात हातापाई झाली.



यादरम्यान इंद्रजित तुडमे यांच्या पायाला तर संतोष कुलकर्णी यांच्या हाताला दुखापत झाल्याने बिलोली उपविभागीय रुग्णालय येथे प्रथम उपोचार करून नांदेडला जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सदर घटना ही संतोष कुलकर्णी यांच्यामुळेच घडली असल्याची फिर्याद हरणे पती, पत्नीने बिलोली पोलीस ठाण्यात दिली आहे.

# कंधार नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस–वंचित आघाडीत पेच

- प्रभाग ५-अ मध्ये दोन्ही पक्षांचे उमेदवार रिंगणात
- ‘मैत्रीपूर्ण लढत’चा काँग्रेसचा दावा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार नगरपालिका निवडणूक २०२५ साठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी या दोन्ही पक्षांनी अधिकृतपणे युती केली असली तरी प्रत्यक्षात प्रभाग क्रमांक ५-अ मध्ये युतीत मोठा तणाव निर्माण झाला आहे. कारण दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशीही आपले नामनिर्देशन मागे घेतले नाही, त्यामुळे या प्रभागात दोन्ही युती पक्षांमध्ये थेट लढत अनिवार्य झाली आहे. परंतु प्रभाग ५-अ मध्ये काँग्रेसकडून मोहम्मद हमीद सुलेमान यांनीही उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे वंचितचे सय्यद मोहसिन मोईन आणि काँग्रेसचे हमीद सुलेमान — हे दोघेही नामांकन मागे घेण्याच्या अंतिम क्षणापर्यंत रिंगणातून बाहेर पडले नाहीत. यामुळे काँग्रेस–वंचित युतीत समन्वयाचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. स्थानिक राजकीय वर्तुळातही हा मुद्दा चर्चेत असून युती टिकून राहील की स्थानिक पातळीवरील भिन्नता युतीला तडा देईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नियमभंग करणाऱ्यावर कारवाईची सूचना

- शासकीय आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षक–कर्मचारी मुख्यालयी राहणे गरजेचे : सहायक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्रा यांचे आदेश पारित

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत सर्व शासकीय आणि निम शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचे कडक निर्देश प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्रा (भा.प्र.से.) यांनी दिले आहेत. शासनाचे ठोस आदेश असूनही अनेक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे जिल्ह्याच्या किंवा आपल्या सोयीच्या ठिकाणावरून नेहमीच अपडाऊन करत आहेत त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम पडत आहे. याच बाबीमुळे प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांसंबंधी अनेक प्रकरणे घडली गेली पण यावर पूर्णतः बदल झालेला दिसून आला नाही. आदिवासी विकास विभागाने शासन परिपत्रक क्र. शाशाआ- २०१५/प्र. क्र. २७८/का. १३ दि. २४ ऑगस्ट २०२१ तसेच कार्यालयीन पत्राव्दारे याबाबत आधीपासूनच स्पष्ट नियम लागू आहेत. मात्र वास्तविक पाहता हे सर्व कर्मचारी या आदेशास केराची टोपली दाखवत अनेक शिक्षक व कर्मचारी मुख्यालयी न राहत असल्याचे आढळून आले आहे. वारंवार शासनाने या प्रकरणी आदेश जारी केले आहेत परंतु त्या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. या पूर्वी पण प्रकल्प कार्यालयानेच प्रकारचे आदेश काढले होते होते पण त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र झाली नसल्याचे सिद्ध झाले आहे मग दर तीन महिने आणि सहामाही तपासनीस जाणारे प्रकल्प कार्यालयाचे त्या त्या शाळेचे पालक अधिकारी कोणती तपासणी करतात....? हे पाहणे तितकेच गरजेचे असल्याचेही मत तक्रारकर्ते यांनी केले आहे. मुख्यालय न सोडणे बंधनकारक – आश्रमशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुख्यालयीच राहणे आवश्यक. हे शासनाचे धोरण असून कोणत्याही परिस्थितीत त्याचे पालन करणे अनिवार्य आहे नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. मुख्यालय सोडणाऱ्यांची माहिती संबंधित मुख्याध्यापक यांनी त्वरित प्रकल्प कार्यालयास देण्याचे आदेश आहेत.

# मृत्यूच्या दाढेतून बचावलेल्या चिमुकल्याची उपमुख्यमंत्र्यानी घेतली भेट

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दैव बलवत्तर म्हणून सुखरूप वाचलेल्या दोन वर्षाच्या हमदान मोहम्मद या दोन वर्षांच्या चिमुकल्याची काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील ज्यूपिटर रुग्णालयात जाऊन भेट घेतली. ठाणे पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या ध्यानसाधना महाविद्यालयाजवळ वडिलांना पाहून आजीचा हात सोडून धावत सुटलेला हमदान नाल्यातील पाण्याचा उपसा करण्यासाठी मेनहॉलवर लावलेल्या पाईपवर पाय पडल्याने थेट २५ फूट खोल गटारात जाऊन पडला. स्थानिक नागरिकांनी याबाबत आरडाओरडा करून त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. यावेळी तत्काळ शिवसेनेचे माजी नगरसेवक विकास रेपाळे आणि माजी नगरसेविका नम्रता भोसले जाधव यांना तिथे पाचारण केले. त्यांनी तत्काळ आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना बोलवून अथक प्रयत्न करून हमदानला बाहेर काढले. मात्र नाका तोंडात गटाराचे दूषित पाणी गेल्यामुळे तसेच गटारात त्याचा श्वास गुदमरल्यामुळे तो अत्यवस्थ झाला होता. त्यावेळी तत्काळ त्याला ठाण्यातील सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र त्याची तब्येत वेगाने ढासळत असल्याचे पाहून तत्काळ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढील उपचारासाठी ठाण्यातील ज्यूपिटर रुग्णालयात दाखल करायला सांगितले. तसेच रुग्णालयातील डॉक्टरांना फोन करून त्याला वाचवण्यासाठी सर्वार्थाने प्रयत्न करावे यासाठी विनंती केली.



# मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्व.सौरभ चौरे प्रतिष्ठान, मायाभाई फ्रेंड सर्कल,व मित्र परिवार सुरभि हॉस्पिटल व जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.सौरभ चौरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन मंगळवार दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या कालावधीत सातपुते तालीम जवळ, नालेगाव येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सुरभी हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर हृदयरोग तज्ज्ञ डॉ.गणेश मैड,हृदयरोग तज्ज्ञ डॉ.अमित भराडीया, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विलास व्यवहारे, स्त्रीआरोग्य तज्ज्ञ डॉ.सुलभा पवार,मूत्रविकार तज्ज्ञ डॉ.प्रशांत सरवदे आदी तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत हे शिबिर संपन्न होणार आहे.



# ठाण्याच्या क्रिकेटच्या ‘विकासा’साठी एमसीए सर्वोतोपरी सहाय्य करणार - अजिंक्य नाईक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भविष्यात ठाणे हे देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटपटू घडवणारी फॅक्टरी ठरणार आहे. त्या कामात जी काही मदत स्पोर्टिंग क्लब कमिटीला लागेल ती एमसीएकडून दिली जाईल, असे ठोस आश्वासन मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी दिलं. स्पोर्टींग क्लब कमिटीच्या नव्याने बांधण्यात आलेल्या ड्रेसिंग रूम, इनडोअर क्रिकेट अॅकॅडमीचे उद्घाटन आणि १४ वर्षांखालील शताब्दी चषक क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण अजिंक्य नाईक आणि विविध मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी अजिंक्य नाईक बोलत होते.

एमसीए सचिव डॉ. उन्मेश खानविलकर, कार्यकारिणी सदस्य विघ्नेश कदम, संदिप विचारे, प्रमोद यादव, भरत किणी, कौशिक गोडबोले माजी सचिव अभय हडप, स्पोर्टींग क्लब कमिटीचे अध्यक्ष विलास जोशी, खजिनदार जितेंद्र मेहता, सहसचिव श्रवण तावडे, सहसचिव सतीश नाचणे श्रीधर मांडले, संतोष जगताप, मनिष बंगेरा, सुनिल कुलकर्णी, अझीम खान, कार्यकारिणी सदस्य प्रशांत गावंड, अतुल फणसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्पोर्टींग क्लब कमिटीचे सेक्रेटरी आणि एमसीए कार्यकारिणी सदस्य विकास रेपाळे यांच्या नेतृत्वाखाली स्पोर्टींग क्लबच्या सुरु असलेल्या ‘विकासा’च्या गतीचे अजिंक्य नाईक यांनी आपल्या भाषणात कौतुक केले.




अजिंक्य नाईक म्हणाले, आमच्या मागील कमिटीने एमसीएमध्ये ३ वर्षांत ३० वर्षांचे काम केले आहे. विकास रेपाळे यांच्या नेतृत्वाखालील स्पोर्टींग क्लबची नवीन कमिटीही विकासाची गती पकडत आहे. क्रिकेटर घडविण्याचे काम मैदान क्लब करत असतात. त्याचसाठी पायाभूत सुविधांसाठी लागणारी सगळी मदत एमसीए देण्यासाठी तयार आहे.

गेल्या अनेक वर्षांत ठाण्यातून क्रिकेटर घडत आहेत. मागील सहा वर्षात ठाण्यातील क्रिकेटला चांगला रंग येत आहे. येणाऱ्या काळात ठाणे हे क्रिकेटर घडविण्याची फॅक्ट्री होणार असल्याचे अजिंक्य नाईक म्हणाले.

आपल्या पालकांचा, कोचचा नेहमी आदर करा. हे डिजीटल युग असले तरी मोबाईल, प्ले स्टेशन, आयपॅड, सोशल मिडिया पासून लांब राहून खेळाच्या मैदानात आपला वेळ घालविण्याचा सल्ला अजिंक्य नाईक यांनी उपस्थित दिला.

स्पोर्टींग क्लब कमिटी आयोजित १४ वर्षांखालील शताब्दी चषक क्रिकेट स्पर्धेत सलग तीन वर्ष युनियन क्रिकेट अॅकॅडमीने विजेतेपद मिळाले आहे. तर युनायटेड क्रिकेट कल्ब असोसिएशन उपविजेता संघ ठरला आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी, उपविजयी संघांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

# कोकण विभाग अप्पर आयुक्तांचा डोहोळे ग्रामपंचायतीला दौरा

- ग्रामपंचायतीची मुद्देनिहाय तपासणी, विविध योजनांची पाहणी आणि नागरिकांच्या समस्या जाणून मार्गदर्शन



**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता स्वच्छता अभियान २०२४-२५ अंतर्गत विभागस्तरीय तपासणीसाठी कोकण विभागाचे अप्पर आयुक्त (विकास) डॉ. माणिक दिवे यांनी २१ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे भेट दिली. ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या आगमनानंतर उत्साहात स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक करताना ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती दिली. दौऱ्यात त्यांनी ग्रामपंचायतीतील विविध सुविधांची आणि उपक्रमांची मुद्देनिहाय तपासणी केली. कार्यालय परिसर, डेमो हाऊस, बायोगॅस युनिट यांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून तपशीलवार माहिती घेतली. तसेच ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी, शाळा, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जनमन योजना या योजनांअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल कामांची पाहणी केली.

या भेटीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीचे कामकाज तपासून योग्य मार्गदर्शन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, आशा कर्मचारी व ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी तालुक्याचे सहाय्यक गटविकास अधिकारी सुदाम इंगळे, विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे, जिल्हा स्वच्छ भारत मिशन कर्मचारी, ग्रामपंचायत सरपंच सुमन वाघे, उपसरपंच सचिन घोडविंदे, वरिष्ठ लिपिक एकनाथ जाधव तसेच सर्व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



जुन्नर तालुका : बाल दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी कलागुणांना संधी देणेकामी राज्य स्तरीय कथा कथन स्पर्धा गुरुशाला यांनी Echos Of Imagination 'माझी शाळा, माझा स्वाभिमान 'या उपक्रमातर्गत ही स्पर्धा आयोजित केली होती.या राज्यस्तरीय स्पर्धेत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा सोनावळे ता:- जुन्नर जि:- पुणे या शाळेचा इयत्ता ९वी चा विद्यार्थी कु. ऋषिकेश लक्ष्मण कडाळी याच्या "लोभाची पेटी" या कथेची राज्य स्तरावर २० मध्ये व प्रकल्प स्तरावर एकमेव निवड झाली.

## थोडक्यात बातम्या...



### घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर; दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** घरगुती गॅस सिलेंडरचा अवैधरित्या व्यावसायिक आस्थापनांमध्ये होणारा वापर थांबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, घरगुती वापरासाठी असलेल्या अनुदानित एलपीजीचा हॉटेल, ढाबे यांसारख्या व्यावसायिक ठिकाणी अवैध वापर होत असल्याने सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे आणि शासनाच्या निधीचे मोठे नुकसानही होते आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलेंडरच्या काळाबाजारावर तात्काळ ठोस कारवाई करण्यात यावी. अवैध रिफिलिंग आढळल्यास संबंधित गॅस एजन्सीवर कारवाई करून तिचे परवाने रद्द करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. घरगुती गॅसच्या अवैध व्यापारात सहभागी किंवा गैरव्यवहार करणाऱ्या गॅस एजन्सींना देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र तातडीने रद्द करावे. तसेच पेट्रोलियम अधिनियमांतर्गत एजन्सीची साठवणूक आणि विक्रीची परवानगीही तत्काळ रद्द करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. ग्राहकांनी गॅस सिलेंडर घेताना वजन काट्यावर तपासून घ्यावे तसेच लिकेज डिटेक्टरद्वारे गॅस गळतीची खात्री करून घ्यावी. अवैध रिफिलिंगमुळे गॅस गळतीची आणि मोठ्या अपघातांची शक्यता असते. त्यामुळे आपले गॅस सिलेंडर इतरांना देऊ नयेत आणि घरगुती सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी अजिबात वापरू नयेत. घरगुती गॅसचा अवैधरित्या वापर होत असल्याची माहिती मिळाल्यास ती संबंधित कंपनीच्या सेल्स अधिकारी किंवा नोडल अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

### जुन्नर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार माघार; २२ नगरसेवकांची माघार

**शिवनेरी (स. गांवकरी) :** जुन्नर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी छाननी मध्ये १२ नगराध्यक्ष पदासाठी निवड यापैकी ३ अपक्षांनी माघार घेतली आहे . जुन्नर नगर परिषद २० जागेसाठी छाननी मध्ये ८० नगरसेवक उमेदवार पात्र यापैकी १८ अपक्ष , उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना १ , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार १ , काँग्रेस आय पार्टी २ असे २२ उमेदवारांनी शुक्रवार दि . २१ रोजी माघार घेतली आहे . अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी चरण कोल्हे यांनी माहिती सांगितली . यामुळे नगराध्यक्ष पदासाठी ९ उमेदवार रिंगणामध्ये आहेत . २० नगरसेवक पद जागेसाठी ५८ उमेदवार रिंगणामध्ये आहेत . बुधवार दिनांक २६ रोजी चिन्ह वाटप होणार आहे.



### स्वा. म. म. तालुकाध्यक्षपदी कोंडीबा सुर्यवंशी, युवा तालुकाध्यक्षपदी काकडे

**अर्धापूर (स. गांवकरी) :** स्वाभिमानी मराठा महासंघाच्या अर्धापूर तालुकाध्यक्ष पदी कोंडीबा सुर्यवंशी तर युवा तालुकाध्यक्ष पदी विठ्ठल काकडे यांची निवड करण्यात आली असल्याचे पत्र पाठवून कळविले आहे. स्वाभिमानी मराठा महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. कृषिराज टकले यांनी सक्रिय कार्यकर्ते यांच्या कार्याची दखल घेऊन स्वाभिमानी मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्ष पदी कोंडीबा सुर्यवंशी यांची तर युवा तालुकाध्यक्ष पदी विठ्ठल काकडे यांची निवड केल्याबद्दल भाजप जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, पत्रकार सखाराम क्षीरसागर, पत्रकार गंगाधर सोनटक्के, भाजयुमोचे माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे,आनंद वैद्य,कुश भांगे,कोंडीबा हाके,व्यंकटी कणगीरे यांनी सत्कार करून अभिनंदन केले व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

### मवेशी येथे प्रकल्पस्तरीय आश्रमशाळा क्रीडा स्पर्धांचे आयोजन..!

**अकोले (स. गांवकरी) :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजुर अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या 21शासकीय व 17 अनुदानित आश्रम शाळेतील केंद्रस्तरीय स्पर्धेतून निवड झालेल्या 489 मुले तर 534 मुली असा एकुण 1023 आश्रम शाळा विद्यार्थ्यांच्या प्रकल्पस्तरीय क्रीडास्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकल्प स्तरीय क्रीडासमितीच्या अध्यक्ष तथा राजुर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीम.देवकन्या बोकडे यांनी दिली. शैक्षणिक संकुल मवेशी ता. अकोले येथे दि.25 ते 27 नोव्हेंबर अखेर संपन्न होणाऱ्या क्रीडास्पर्धेत कबड्डी,खो-खो,हॉलीबॉल, हॅन्डबॉल,तसेच वयक्तीक क्रीडाप्रकारात लांबउडी, उंचउडी,धावणे,चालणे,गोळाफेक,भालाफेक, थाळीफेक या क्रीडाप्रकारात वय वर्ष 14,17 व 19 वर्ष वयोगटात सदर स्पर्धा संपन्न होणार असुन सदर प्रकल्प स्तरीय क्रीडास्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडासमिती, स्वागतसमिती, आरोग्यसमितीसह विविध प्रकारच्या समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

## आवादाच्या सौरऊर्जा प्रकल्पावरून जवळा ग्रामसभेत खडाजंगी

- ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याकडून सत्तेचा गैरवापर करत कागदावर बोगस ग्रामसभा, बोगस ठराव,
- दोषीवर गुन्हे दाखल करण्याची ग्रामस्थांची ग्रामसभेत मागणी.
- जवळा गावच्या इतिहासात पहिल्यांदाच पोलीस बंदोबस्त लावत ग्रामसभा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



जवळा ग्रामपंचायत सदस्यांना व ग्रामस्थाना विश्वासात न घेता सत्तेचा गैरवापर करत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यानी व अधीकाऱ्यांनी बोगस ग्रामसभा व बोगस ठराव करत आवादा कंपनीला कागद पत्रे पुरवून गावची गायरान जमीन कंपनीच्या घशात घातली असल्याचा आरोप गावातील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यावर जवळा ग्रामस्थांनी भर ग्रामसभेत करत दोषीवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी हात वर करून केली.

जवळा ता पारनेर येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प व जवळे गावातील कचरा डेपो या विषयावरती विशेष ग्रामसभा गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस बंदोबस्तात पार पडली विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात जवळे ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच गैरहजर राहिल्याने आयोजित ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच सौ अनिता राजाराम लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली

यावेळी माजी सरपंच शिवाजीराव सालके यांनी या प्रकल्पातमोठी आर्थिक तडजोड झालीअसून एक तर चुकीच्या पद्धतीने जागा दिली व जी दिली ती वेगळी व प्रकल्प वेगळ्या जागेवर उभा केला आहे. त्यामुळं भविष्यात गावची मोठी हानी होणार असल्याचे सांगितले

ग्रा सदस्य किसनरावं रासकर प्रभाकर अलभर. नवनाथ सालके पा यांनी सदस्यांना ग्रामस्थांना न विचारात घेता

कंपनीने जास्त जागेवर अतिक्रमण करत आपला हक्क गाजवायला सुरवात केली आहे तेथील अधिकारी ग्रामस्थांशी बोलताना उद्धट पणे बोलतात . जवळे येथील गायरान जमिनीवर सुमारे 80 एकरामध्ये मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प चे काम आवादा या कंपनीमार्फत सुरू आहे सौर प्रकल्प पासूनच काही अंतरावरती जवळे ग्रामपंचायत ने गावातील गोळा करण्यात आलेल कचरा डेपो प्रकल्पाच्या जवळच असल्याने भविष्यात त्या प्रकल्पावरती त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात म्हणून सदर डेपो इतरत्र हलवण्यात यावी अशी मागणी कंपनी मार्फत होते परंतु ग्रामस्थांनी त्या मागणीला विरोध दर्शवला आहे या विषयावर ग्रामसभेत कचराकुंडी आहे त्याच ठिकाणी ठेवणे किंवा इतरत्र हलवणे याबाबत ठोस असा निर्णय झालेला नाही यावेळी उपस्थित मागणी १) कचरा डेपो इतरत्र हालू नये २) अनेक वर्षापासून संबंधित गायरान जागेत आदिवासी ठाकर समाज वडार वस्ती आधी समाजातील समशानभूमी तेथे असल्याने ती त्या ठिकाणी ठेवावी ३) सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यानंतर त्यापासून गावाला काय फायदा मिळणार याबाबत लेखी संबंधित कंपनीकडून घ्यावी ४) ग्राम दैवत व धर्मनाथ बीज उत्सवानिमित्त आयोजित बैलगाडा स्पर्धा साठी बैलघाट यासाठी जागा मिळावी अशा विविध मागण्या यावेळी ग्रामस्थांनी केल्या त्याबाबत तलाठी भुजबळ यांनी सांगितले की संबंधित मागण्या ची प्रत तहसीलदार व वरिष्ठांकडे देणार असून त्याबाबत जो काही योग्य निर्णय होईल त्या कारवाई करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

## डॉ. दीपक नाईक यांचा प्रत्यक्ष गाव भेटीवर भर

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण हदगाव तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी गावोगावी गाव भेटी वर भर देत जनसंपर्क मोहीम उघड केली असून मतदारांची मने जिंकण्यासाठी सर्वच जण कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे. तामसा जिल्हा परिषद गटातून भाजपाचे इच्छुक उमेदवार डॉ. दीपक नाईक यांनी मोठ्या प्रमाणात तयारीला लागले असून अक्षरशः त्यांनी वाडी - तांडे आणि प्रमुख गावांत जाऊन गाव भेटी वर जोर दिला असून. प्रत्येक कुटुंबाशी संवाद साधत त्यांच्या आडी अडचणी जाणून घेण्यावर त्यांनी विशेष मोठया प्रमाणात भर दिला आहे. या दौऱ्यादरम्यान डॉ. नाईक यांच्या सोबत तरुण कार्यकर्त्यांची एक सशक्त फळी उभी राहिल्याचे स्पष्ट दिसत असून, विशेषतःसुशिक्षित, तरुण वर्ग,व्यापारी उद्योजक बरोबर उच्च शिक्षित डॉ. संदीप कारंजकर, मेडिकल व्यवसायिक महेश मठपती, तालुका उपाध्यक्ष शशिकांत बंडावार, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उत्साहाने जनसंपर्कात सहभागी होत आहेत.

## तरुणाईची मते वळविण्यासाठी उमेदवारांचा लागणार कस

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबरला मतदान होणार आहे. उमेदवारांना प्रचारासाठी अवघे काही दिवस राहिले आहेत. त्यामुळे कमी दिवसांत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांचा कस लागणार हे निश्चित आहे.

कंधार नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत असून विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. यावेळी युवा मतदारांची वाढती संख्या बघता सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांना मते वळविण्यासाठी घाम गाळावा लागणार असल्याचे



चित्र आहे. विविध पक्षाचे उमेदवार आपल्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह नगरसेवक डोअर टू डोअर जाऊन मतदारांना नवी दिशा अशा दाखवत आपली भूमिका स्पष्ट करीत आहेत.

गेल्या चार पाच वर्षांत देशाच्या राजकारणात बरीच उलथापालथ झालेली असताना तरुणांचा वाढता संताप वेळोवेळी दिसून आला. दिल्लीतील युवतीवर झालेला अत्याचार, टू जी, कोळसा, आदर्श, सिंचन, कॉमनवेल्थ घोटाळ्यामुळे तरुणाईचा राजकारणावर विश्वास राहिला नाही. आजचा तरुण जागृत असून तो विचार करणारा आहे. फेसबुक, सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकजण तरुणांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत असले तरी तरुणाई कुठल्या दिशेला जाईल याचा अंदाज बांधणे आता राजकीय विश्लेषकांना सुद्धा कठीण झाले आहे. तरुण मतदारांना आपल्याकडे वळविण्यात या उमेदवारांचा चांगलाच कस लागणार आहे. मागील काही महिन्यात कंधारात मोठ्याप्रमाणात नोंदणी करीत तरुणांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्षाकडे तरुणाईसाठी स्वतंत्र कक्ष असले तरी त्यातील अनेक तरुण नेत्यांच्या आपसी वादामुळे आणि गटातटाच्या राजकारणामुळे दुखावली आहेत त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांना आपला विजय मिळवण्यासाठी पक्षप्रमुख आणि उमेदवारांना तारेवरची कसरत करावी लागणार हे मात्र निश्चित आहे.

## “सुरुवातही माझी पूर्णताही माझीच!”

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

नगर–मनमाड महामार्गाच्या सुरू असलेल्या कामाचा खासदार नीलेश लंके व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करत आढावा घेतला. काही भागातील काम पूर्णत्वास गेले असून उर्वरित कामाला जोरदार वेग आला आहे.

“अतिशय कमी वेळात हा मार्ग नागरिकांसाठी पूर्णपणे खुला होणार आहे,” अशी माहिती खासदार नीलेश लंके यांनी यावेळी दिली. महामार्गावरील अनेक किमी अंतरातील कामे पूर्ण झाली असून शिल्लक भागात प्रचंड वेगाने काम सुरु आहे. वारंवार अडथळे, प्रशासकीय प्रक्रियांचे चक्र, कंत्राटी विलंब या सगळ्यांवर मात करत शेवटी हा मार्ग मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



- नगर–मनमाड महामार्ग कामाला वेग
- पाहणीदरम्यान खासदार लंके यांचा विरोधकांवर टोला

पाहणीदरम्यान आपल्या भूमिकेवर बोलताना खासदार लंके यांनी विरोधकांना चिमटे काढले. “काहींनी तर ‘हे काम होऊच शकत नाही’ अशा वल्गना करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तर काही जण आज काम मार्गी लागल्यानंतर श्रेय घेण्यासाठी मैदानात उतरत आहेत,” असा टोला त्यांनी लगावला.

## कांदा व्यापाऱ्याची १ कोटी ६१ लाखांची फसवणूक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कांदा व्यापाराच्या व्यवहारात तब्बल १ कोटी ६१ लाख ५७३ रूपये रकमेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात तिघा परप्रांतीय व्यक्तीविरूध्द गुरूवारी (२० नोव्हेंबर) रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यापारी विलास जर्नादन दरंदले (वय ४८, रा. बुरूडगाव रस्ता, वाकोडी, ता. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

हनिफ बागवान, मोहम्मद शफी, मोहम्मद शमी (पूर्ण नावे माहिती नाही, सर्व रा. ख्वाजा कादिर कॉलनी, नुरबाग, बीलालाबाद, कुलबर्गी, कर्नाटक) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. संशयित आरोपींकडून विश्वास संपादन करून दीर्घकाळ व्यवहार केल्यानंतर जून २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान ही फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे.

# महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा एक महत्वाचा बदल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सध्या राज्यात सगळीकडे गुलाबी थंडी पडत आहे. धुळे नंदुरबार जळगाव नाशिक सहित उत्तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये हाडे गोठवणारी थंडीचा अनुभव नागरिकांना येतोय. या बोचरी थंडीमुळे सगळीकडे कमाल आणि किमान तापमानात मोठ्या प्रमाणात घट आली आहे.

काल राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये थोडेसे ढगाळ वाहमान होते आणि यामुळे थंडीची तीव्रता कमी झाली आहे पण तरीही अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल आणि किमान तापमान कमीच राहिले. दरम्यान आज पासून राज्यातील हवामानात एक मोठा चेंज पाहायला मिळू शकतो.

मिळालेल्या माहितीनुसार दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रामध्ये आज पासून वादळी पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. या भागात पुढील दोन-तीन दिवस वादळी पाऊस राहणार असा अंदाज आयएमडी कडून नुकताच वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान खात्याने ऐन हिवाळ्यात राज्यातील



### ‘या’ तारखेपासून पुन्हा एकदा वादळी पावसाला सुरुवात होणार

काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे. दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्राचा दक्षिणेकडील भाग पुन्हा एकदा पावसाने व्यापला जाणार आहे.

२२ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर दरम्यानच्या तीन दिवसांमध्ये राज्यात पुन्हा एकदा पाऊस होणार आहे. कोकणातील दक्षिणेकडील जिल्हे आणि मध्य महाराष्ट्रातील दक्षिणेकडील जिल्हे पुन्हा पावसाने व्यापले जाणार आहेत.

कुलाबा वेधशाळेने हा अंदाज वर्तवला असून आज आपण २२ नोव्हेंबर रोजी राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये काय स्थिती राहणार याचा आढावा घेणार आहोत.

मुंबई शहर आणि उपनगरात मुंबईतील कमाल तापमान 33° सेल्सिअस आणि किमान तापमान 21°c राहू शकते. त्याचवेळी कोकणातील दक्षिणेकडील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आज हलका पाऊस पडेल असा अंदाज आहे. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील दक्षिणेकडील सातारा सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यातही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. येथे पण हलका पाऊस पडू शकतो. त्याचवेळी पुणे आणि सोलापूर हे दोन्ही जिल्हे आज कोरडे राहणार आहेत. दुसरीकडे उत्तर महाराष्ट्रात जी कडाक्याची थंडी पडत होती त्यात थोडीशी घट येऊ शकते. येथील थंडीची तीव्रता आज कमी होणार असा अंदाज आहे.

महाराष्ट्राच्या दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसामुळे उत्तर महाराष्ट्रातील थंडीवर परिणाम होणार आहे. मराठवाड्यात आणि विदर्भात सुद्धा थंडीची तीव्रता कमी होणार आहे. विदर्भात तर काही ठिकाणी ढगाळ हवामान राहणार आहे. पण या भागात कुठेच पाऊस पडणार नाही. येथील हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याची शक्यता आहे.

# शासकीय रेखाकला परीक्षा 2025 परीक्षांचे आयोजन



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

दिनांक 18 नोव्हेंबर ते 21 नोव्हेंबर 2025 या कालावधीत महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथे शासकीय रेखाकला परीक्षा 2025 अत्यंत उत्कृष्ट नियोजनात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या. तालुक्यातील विविध शाळांमधून आलेल्या 1730 विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या परीक्षेत सहभाग घेतला.

परीक्षा केंद्र महादजी शिंदे विद्यालयातील प्रशासकीय व शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. वर्गव्यवस्था, आसनव्यवस्था, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सोय, मार्गदर्शन यांसह परीक्षेच्या वातावरणातील शांतता यावर विशेष भर देण्यात आला होता.

विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा केंद्र संचालक श्री. भुजबळ डी. डी. साहेब यांच्या सहकार्याने, केंद्रचालक कलाशिक्षक श्री. शरद शिरसाट सर (उपाध्यक्ष – अहिल्यानगर जिल्हा कलाध्यापक संघ), ज्येष्ठ कला शिक्षक श्री. उल्हारे के. टी. सर, तसेच श्री. जाधव बी. एच. सर (गुरुकुल प्रमुख) यांनी परीक्षेच्या सर्व जबाबदाऱ्या अत्यंत निष्ठेने पार पाडल्या. या तिघांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेचे कामकाज सुरळीत आणि यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल तालुक्यातील सर्व कलाध्यापक व सहभागी शाळांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले.

या प्रसंगी श्री. मिठ्ठू तात्याबा मदने सर, कला शिक्षक (डॉ. राजेंद्र प्रसाद विद्यालय पारगाव सुद्रिक), हे जानेवारी 2026 मध्ये सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांचा सर्व कला शिक्षकांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या दीर्घ व कर्तव्यनिष्ठ सेवेला उजाळा देत तालुक्यातील कला शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी कलाशिक्षक श्री. कपिल उल्हारे सर व श्री. सचिन शेलार सर यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी परीक्षेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत विद्यालयाच्या व्यवस्थापनाचे व शिक्षकांचे कौतुक केले. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांनी दाखवलेली शिस्त, वेळपालन व कलाप्रेम हे विशेष उल्लेखनीय होते, असेही त्यांनी नमूद केले.



बिलोली तालुक्यातील कोंडलापूर, नागापूर, सुलतानपूर गट ग्रामपंचायत अंतर्गत मौ. सुलतानपूर येथे सरपंच कुंकनोर यांच्या प्रयत्नाने खासदार निधीसह इतर निधीच्या माध्यमातून बिलोली, कुंडलवाडी प्रमुख रस्त्यापासून ते श्री साईबाबा मंदिरापर्यंत सीसी रस्त्याचे उत्कृष्ट दर्जाचे काम पुर्ण केले आहे.यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या भाविक भक्तांच्या अडचणी दूर झाल्या आहेत. तालुक्यातील मौ. सुलतानपूर येथील जयरामजी अंबेकर विद्यालया शेजारी माळटेकडीवर काही वर्षाखाली श्री सत्य साईबाबा मंदिराची स्थापना करण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### व्हाईस चेअरमन पदी मयूर गोरखे यांची बिनविरोध निवड झाली

■ ११ प्रभागांमध्ये उमेदवारांची अंतिम यादी जाहीर

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : जिल्हा बँकेचे संचालक व माजी आमदार राहुल जगताप यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या श्रीगोंदे तालुका खादी ग्रामोद्योग संघाच्या व्हा चेअरमनपदी मयुर गोरखे यांची बिनविरोध निवड झाली. श्रीगोंदे तालुका खादी ग्रामोद्योग संघाच्या व्हा चेअरमन बबन श्रीराम होते त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने पक्षश्रेष्ठीच्या आदेशाने त्यांनी राजीनामा दिला होता. रिक्त झालेल्या व्हा चेअरमन पदी आज झालेल्या निवडी मध्ये माजी आमदार राहुल जगताप यांनी मयूर गोरखे यांची निवड करण्याबाबत सर्व संचालकांना सूचना केल्या त्यानुसार मयूर गोरखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड यशस्वी करण्यासाठी श्रीगोंदे खादी ग्रामोद्योग चे नेते माजी चेअरमन अंकुश शिंदे, चेअरमन बापूसाहेब गायकवाड आणि महत्त्वाची भूमिका पार पडली. मयूर गोरखे हे राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा यांचे समर्थक असून लोणी व्यंकनाथ गावचे ग्रामपंचायत सदस्य आहेत. तर गोरखे यांच्या सूचक म्हणून ज्येष्ठ संचालक वसंतराव सकट तर अनुमोदक चेअरमन बापूसाहेब गायकवाड यांनी दिले. गोरखे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांनीच निवड निवडणूक निर्णय अधिकारी गणेश मुंडे यांनी जाहिर केली . निवड जाहीर होताच माजी आमदार राहुल जगताप, राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा, मनोहर पोटे, यांनी स्वागत केले. या निवडणुकी वेळी संचालक वसंतराव सकट,रमेश कळमकर, नानासाहेब ससाणे,धनंजय लोखंडे,दिलीप तोरडमल,सुनील काळे, रेवती घाडगे, मीरा शिंदे हे उपस्थित होते.

### श्रीगोंदा नगरपालिका निवडणूक माघारप्रक्रियेनंतर चौरंगी लढत ठरली

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीत माघार घेण्याच्या अंतिम दिवशी (२१ नोव्हेंबर २०२५) अनेकांनी आपले अर्ज मागे घेतले असून, आता नगराध्यक्षपदासाठी चार प्रमुख उमेदवारांमध्ये चौरंगी लढत निश्चित झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली आहे. यानंतर श्रीगोंदा शहरात निवडणुकीचे वातावरण तापले असून संपूर्ण तालुक्याचे लक्ष या चुरशीच्या लढतीकडे लागले आहे.

### नगराध्यक्ष पदासाठी अघोरी विद्येचा आधार घेणाऱ्या उमेदवाराला धक्का



शेवगांव (स. गांवकरी) : दिनांक 23 नोव्हेंबर 2025 वार रविवार ~ या बाबत सविस्तर वृत्त असे कि शेवगांव नगरपरिषदेचे वातावरण ऐन हिवाळ्यात चांगलेच गरम झाले असून साम दाम दंड भेद नीती वापरून विजय आपलाच कसा होईल व शेवगांव शहर माझ्याच कस ताब्यात राहील यासाठी काहींनी आपले नेते पाण्यात ठेवले तर काहींनी देव पाण्यात ठेवले तर विजय मिळविण्यासाठी शेवगांव मध्ये नगराध्यक्षपदासाठी आपलीच निवड व्हावी म्हणुन एका उमेदवाराने पाचारण केले अघोरी विद्या जाणणाऱ्या बाबाला पाचारण करून केली शहर प्रदक्षिणा ??? आणि शहर मंतरून टाकले शेवगांव नगरपरिषद निवडणुकीत आपलाच विजय निश्चित व्हावा यासाठी कोण काय करेल याचा नेम नाही काहींनी पक्ष बदलले काहींनी अपक्ष भरले तर काहींच्या घरी महाराज अवतरले त्यांनी अवघ्या शहराचाच चारचाकीने महाराज गाडीत घालून वेढा मारला व शहरातील मतदारच वश करून मलाच नगराध्यक्ष होऊ दे अशी अघोरी मागणी देवाकडे केली. अशी जोरदार चर्चा शेवगांव शहरात सुरु असून तो शहराची पूजा मांडणारा कोण ??? मला दोन हाना पण नगराध्यक्ष म्हणा अश्या वृत्तीचा कोण ??? "पूछता है सर्वसामान्य शेवगांवकर"

### डुंबरवाडी टोल नाका बंद करण्याचे दिलेले आश्वासनांचे पाडले विसर

जुन्नर (स. गांवकरी) : निवडणुका आल्या की आश्वासनांचा पाऊस पडतो. असेच एक आश्वासन जुन्नरच्या आजी-माजी आमदारांनी दिले होते. ते म्हणजे डुंबरवाडी येथील अनाधिकृत टोल नाका बंद करणार निवडणुका होऊन वर्षपूर्ती झाली तरी टोल नाका सुरूच आहे. मग हा टोल नाका अनाधिकृतच आहे. तर तालुक्याच्या लोकप्रतिनिधी तो टोल नाका बंद का केला होता. आणि तो पुन्हा सुरू झाला. जनतेच्या डोळ्यात धुळ फेकण्याचा प्रयत्न सुरू आहे की काय असे सामान्य नागरिकांच्या मनात पडला आहे. आणि माजी आमदारांनी या प्रश्नाकडे डोकावूनही पाहिले नाही. मग जुन्नरच्या जनतेने आता येणाऱ्या निवडणुकीत कोणावर विश्वास ठेवावा. जुन्नर तालुक्यातील टोल नाका व बिबट्याचे हल्ले हे मुख्य प्रश्न असतानाही त्या प्रश्नाकडे तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तालुक्यातील राजकारण टोल नाका व बिबट्याच्या भोवती फिरते पण हे दोन्ही प्रश्न प्रलंबीतच आहे. जुन्नर तालुक्यातील नागरिकांना राजकीय पुढाऱ्यांवरील विश्वासार्हता कमी होताना दिसत आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्यातील सामान्य नागरिकांमधून एकच आवाज येतो की डुंबरवाडी टोलनाका बंद करा. आता किती जुन्नरकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहणार आहात. जर जिल्हा परिषदे पंचायत समिती निवडणुकीच्या अगोदर टोल नाका बंद झाला नाही.

# अहिल्यानगरमध्ये दुभाजकांची रंगरंगोटी सुरू केली असून शहर स्वच्छता आणि सौंदर्यीकरणाला वेग



महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण, हिरवाई वाढवणे, रस्त्यांवरील प्रकाश योजना सुधारणा आणि स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेची गुणवत्ता वाढवण्याची कामेही सुरू आहेत. शहरातील विविध भागात सुरू असलेल्या या कामांमुळे अहिल्यानगरचा विकास आणि सौंदर्यीकरण दोन्ही ही अधिक प्रभावीपणे पुढे जात आहे. महानगरपालिकेच्या या उपक्रमांमुळे शहराच्या स्वच्छतेत आणि देखाव्यात मोठी सुधारणा दिसून येत असून, नागरिकांनीही सहकार्य केल्यास अहिल्यानगर हे स्वच्छ, नीटनेटके आणि आदर्श शहर बनण्याची शक्यता अधिक बळकट होत आहे.

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहराला अधिक आधुनिक, स्वच्छ आणि आकर्षक बनवण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम आणि सौंदर्यीकरणाची कामे हाती घेण्यात आली असून, त्याला आता गती मिळत आहे.

शहरातील प्रमुख कॉंक्रिट रस्ते पूर्ण होताच त्या रस्त्यांवरील दुभाजकांची रंगरंगोटी करण्याचे काम सुरु झाले आहे. यामुळे शहराचा एकूणच चेहरामोहरा बदलत असून नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत दररोज रस्त्यांवरील कचरा, झाडांच्या फांद्या, दुभाजक जवळील माती, फुटपाथवरील गवत यांची सफाई सातत्याने करण्यात येत असून, त्याचबरोबर शहरातील मुख्य मार्गांवर दुभाजकांची साफसफाई आणि रंगकाम चालू आहे. यामुळे शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर स्वच्छ, देखणा आणि नीटनेटका पायाभूत बदल दिसून येत आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे सरकारमार्फत सुरू असलेल्या रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामांना वेग आला आहे. अनेक रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण पूर्ण होताच त्या रस्त्यांवरील दुभाजकांचे सुशोभीकरण आणि रंगरंगोटीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. यामुळे प्रवासी नागरिकांना स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित रस्त्यांचा वापर करता येत आहे.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, अहिल्यानगर शहराला स्वच्छ आणि सुंदर शहर बनवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

प्रत्येक नागरिकाने आपला घरगुती कचरा फक्त घंटागाडीतच टाकावा. नव्याने रंगवलेल्या दुभाजकांवर गुटखा पिचकारी मारणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. शहर विद्रूपीकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना नागरिकांनीही समज देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# पेट फेड पुणे २०२५चा प्रारंभ !

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पेट फेड – भारतातील सर्वात मोठा पाळीव प्राणी महोत्सव आणि लिम्का वर्ल्ड रेकॉर्ड धारक 'बिगेस्ट डॉग कार्निव्हल' – याच्या ११व्या संस्करणाची रंगतदार सुरुवात आज पुण्यातील डेक्कन कॉलेज ग्राउंड येथे झाली. Royal Canin यांच्या प्रस्तुतत्वाखाली, Drools, Bowlers आणि Zepto यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात ११०० हून अधिक पाळीव प्राणी आणि अंदाजे ६५०० पाळीव प्राण्यांचे पालक व प्राणीप्रेमी सहभागी झाले, ज्यामुळे पहिला दिवस उत्साह, आनंद आणि समुदायभावनेने भरून गेला. सकाळपासूनच मास्टरक्लास अरेना, प्ले झोन, ॲजिलिटी रिंग, किटी प्ले पेन, कॅटपलूजा, दत्तक शिबिरे आणि १०० पेक्षा अधिक भारतीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्सच्या स्टॉल्सला मोठी गर्दी झाली. Walk & Wags, Fetch & Fumble, Trick Trail, Bug Buster, Wheel of Woofs आणि Temptation Alley यांसारख्या स्पर्धांना विशेष प्रतिसाद मिळाला.




# देवळा तालुक्याच्या पूर्व भागाला सिंचनाचे वरदान

■ चणकापूर उजवा कालवा रुंदीकरण-अस्तरीकरणासाठी ६५ कोटींचा निधी, १६ हजार हेक्टर क्षेत्राला लाभ



**देवळा : (समर्थ गांवकरी)**

देवळा तालुक्याच्या पूर्व भागातील शेतीसिंचनाचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने मोठी कामगिरी झाली आहे. चणकापूर उजवा कालवा अंतर्गत रामेश्वर धरण ते चिंचवे येथे २६ किमी अंतरावर रुंदीकरण आणि अस्तरीकरणाच्या महत्त्वाकांक्षी कामासाठी तब्बल ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून संबंधित निविदाही प्रसिद्ध झाली आहे. कामांना लवकरच सुरुवात होणार असून यामुळे सुमारे १६ हजार हेक्टर शेतीक्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याची माहिती आमदार डॉ. राहुल आहेर यांनी दिली.

आमदार डॉ. आहेर यांनी सांगितले की, हे काम पुढील एक वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. कालव्याची वहनक्षमता वाढवण्यासाठी एकूण १८ विमोचक (गेट) बसविण्यात येणार असून त्यामुळे परिसरातील मोठे-छोटे पाझर तलाव भरून त्याचा लाभ थेट शेतीला मिळणार आहे.

सध्या रामेश्वर–झाडी या वाढीव कालव्याची वहनक्षमता ८७ क्युसेक एवढी असून प्रस्तावित काम पूर्ण झाल्यावर ती २६५ क्युसेक होणार आहे. तर झाडी येथील पुच्छ क्षमता १३.८० क्युसेकवरून १०८ क्युसेक इतकी वाढणार आहे.

पूर्वी या कालव्याला फक्त पूरपाण्याची मान्यता होती. मात्र आता हा कालवा नारपार योजनेमध्ये समाविष्ट झाल्याने तो आठमाही होणार आहे. यामुळे ११,५०० हेक्टर क्षेत्राला शाश्वत सिंचन उपलब्ध होईल. पिण्याच्या पाण्याच्या योजनांनाही याचा थेट लाभ होणार असल्याने हा प्रकल्प दुष्काळी भागासाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरणार आहे.

यापुढील टप्प्यात चणकापूर–रामेश्वर उजव्या कालव्याच्या ३८ किमी विस्तारीकरणासाठी अतिरिक्त निधी प्रस्तावित असून त्यामुळे कालव्याची वहनक्षमता १८४ क्युसेकवरून ४२७ क्युसेकपर्यंत वाढविण्याची योजना आहे. तसेच चिंचवे–झाडी दरम्यान साखळी क्रमांक २७ ते ३६ पर्यंतच्या कामांचे सर्वेक्षण सुरू आहे.

# देवदैठणच्या जान्हवी वाघमारेची राष्ट्रीय स्तरावर निवड

■ तिहेरी उडीत करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील जान्हवी मल्हारी वाघमारे हया शेतकरी कन्येची शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्याधाम प्रशाला शिरुर येथे बारावी विज्ञान शाखेत जान्हवी शिकत असून नुकत्याच डेरवण ( रत्नागिरी ) येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत १९ वर्ष वयोगटात ती पुणे विभागाचे प्रतिनिधीत्व करत होती . या राज्य स्पर्धेत तिने ११.३० मीटर तिहेरी उडी मारत द्वितीय क्रमांकासह रौप्य पदक पटकावले तर ५ .०९ मीटर लांब उडी मारत तृतीय क्रमांकासह कांस्य पदक पटकावत दुहेरी यश पटकावले .या तिच्या कामगिरीमुळे तिची शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे .आर्थिक स्थिती बेताची असलेल्या शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या जान्हवीला लहानपणासून खेळाची आवड निर्माण झाली होती .आई वडीलांचा भक्कम पाठिंबा , सरावातील सातत्य , जिद्द , चिकाटी व मेहनत घेण्याची तयारी आणि क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांचे लाभलेल्या बहुमोल मार्गदर्शनामुळे ही ग्रामीण भागातील खेळाडू जान्हवी दि .२६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान हरियाणा राज्यात होणाऱ्या राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे . गेली चार वर्षे सलग राज्यस्पर्धेपर्यंत पोहचून देखील यश हुलकावनी देत होते यावेळी मात्र ती राष्ट्रीय स्तरावर पोहचली आहे . तिच्या यशाने देवदैठण गावच्या तसेच शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला गेला आहे . या खेळाडूला संदीप घावटे , सचिन रासकर यांचे मार्गदर्शन लाभले .

तिच्या यशाबद्दल अध्यक्ष अनिलजी बोरा , सचिव नंदकुमार निकम सर ,शिरूर शाळा समितीचे अध्यक्ष धरमचंदजी फुलफगर , शिरुरचे प्राचार्य गुरुदत्त पाचर्णे , चंदुलाल चोरडीया ,देवदैठणचे प्राचार्य विशाल डोके ,पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी जान्हवीचे अभिनंदन करुन राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या .

जान्हवी इ .५ वीला असताना तिची मोठी बहीण वैष्णवी माझ्याकडे सराव करत होती . त्यावेळी तिच्यासोबत जान्हवी मैदानावर येत होती . पूरक व्यायाम ,धावणे ,लांबउडीचा सराव सुरु केला .खेळाची आवड निर्माण झाल्यानंतर व मनापासून कष्ट घेतल्यानंतर खेळाडू काय साध्य करु शकतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे जान्हवी . दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दैनंदिन सराव करत होती . राष्ट्रीय पातळी गाठायची हे मी पाहिलेल स्वप्न आज तिने सत्यात उतरले. **- संदीप घावटे, क्रीडा शिक्षक**

# जुन्नरचा डुंबरवाडी टोलनाका वादाच्या भोवऱ्यात! स्थानिक कर्मचाऱ्यांकडून अरेरावी

## मनमानी टोल आकारणी आणि मारहाणीच्या तक्रारी; टोलनाका हलवण्याची मागणी!

**ओतूर/जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील डुंबरवाडी टोलनाका पुन्हा एकदा गंभीर वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांकडून स्थानिकांना वारंवार अरेरावीची भाषा वापरणे, दमबाजी करणे, मनमानी पद्धतीने आणि नियमबाह्य टोल आकारणी करणे तसेच जाब विचारणाऱ्यांना मारहाण करणे यासारखे गंभीर धक्कादायक प्रकार सातत्याने घडत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे संतप्त स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी हा वादग्रस्त टोलनाका त्वरित इतरत्र हलवण्याची किंवा कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी लावून धरली आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी केलेल्या तक्रारींनुसार, डुंबरवाडी टोलनाक्यावर खालीलप्रमाणे गंभीर गैरप्रकार सुरू आहेत:

स्थानिकांना अरेरावी आणि दमबाजी: टोल कर्मचाऱ्यांकडून स्थानिकांशी अत्यंत मुजोरपणे वागले जाते. स्थानिकांसाठीच्या सवलती नाकारल्या जातात आणि उलट त्यांना धमकावले जाते.

वैयक्तिक स्कॅनरवर टोल वसुली: फास्टॅग (Fastag) असूनही, वैयक्तिक स्कॅनर वापरून टोल घेतला जात असल्याचा आरोप आहे, ज्यामुळे टोल रकमेत गैरव्यवहार होण्याची भीती व्यक्त होत आहे.

एकाच वाहनाकडून दिवसातून दोन ते तीन वेळा टोल आकारणी केली जात असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. याबद्दल विचारणा केल्यास कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. अनेकदा वाहन मालकाचे वाहन घरी उभे असतानाही फास्टॅग खात्यातून पैसे कापले गेल्याचे प्रकार समोर आले आहेत.

टोल आकारणीतील गैरप्रकार किंवा कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाबद्दल कोणी जाब विचारल्यास, त्यांना टोलनाक्यावरील काही गावगुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून मारहाण केली जाते. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. व्यवस्थापकाचे नाव विचारले असता, इतर कर्मचारीच 'मीच व्यवस्थापक आहे' असे धमकावणीच्या स्वरात सांगतात, ज्यामुळे तक्रार करायला जागाच शिल्लक राहात नाही.

प्रवाशांची सुरक्षितता आणि टोल आकारणीतील पारदर्शकता धोक्यात आणणाऱ्या या डुंबरवाडी टोलनाक्यावर जिल्हा प्रशासनाने आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) त्वरित लक्ष घालून या वादग्रस्त टोलनाक्याची सखोल चौकशी करावी, तसेच हा टोलनाका कायमस्वरूपी बंद करावा किंवा नियमानुसार अन्यत्र हलवावा, अशी जोरदार मागणी जुन्नर तालुक्यातून होत आहे.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

डुंबरवाडी टोलनाक्यावर सुरू असलेल्या या 'दादागिरी' आणि गैरकारभाराविरोधात स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसारख्या संघटनांनी तर या टोलनाक्याविरोधात यापूर्वीच आंदोलनाचा इशारा दिला आहे. वाहनचालक आणि नागरिकांचे म्हणणे आहे की, जर टोल व्यवस्थापनाने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा केली नाही आणि गैरप्रकार थांबले नाहीत, तर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल.

# इमरान खान यांच्या बहिणींशी गैरवर्तन!

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान यांच्यावर पाकिस्तानात शंभरापेक्षा जास्त केसेस सुरू आहेत आणि ऑगस्ट २०२३ पासून ते जेलमध्ये आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्यांना १४ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सरकारी गिफ्ट (तोशाखाना केस) विकण्याचे आणि सरकारी गुप्त माहिती लीक करण्यासारखे अनेक आरोप त्यांच्यावर आहेत. आपली पत्नी बुशरा बिबीचा आणि आपला पाकिस्तान सरकार मुद्दाम छळ करत असल्याचा आरोप त्यांनी वारंवार केला आहे. आता इमरान खान यांच्या बहिणींनाही मारहाण आणि त्यांच्याशी गैरवर्तन केल्याचं समोर आले आहे. ही घटना त्यावेळी घडली, जेव्हा इमरान यांच्या बहिणी इमरान खान यांना भेटायला अडियाला जेलमध्ये गेल्या होत्या; पण त्यांना भेटू दिले नाही. इमरान खान यांच्या बहिणींचं म्हणणं आहे, इमरान खान यांना त्यांच्या परिवाराला भेटण्याचा अधिकार न्यायालयानं दिला आहे, पण सरकार त्यात कायम अडथळा आणतं आणि त्यांना भेटू दिलं जात नाही. त्यांच्यावर कायम अन्याय आणि दडपशाही केली जाते. इमरान यांच्या 'पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ' (पीटीआय) या पक्षानं पोस्ट केलेल्या एका व्हिडीओमध्ये इमरान खान यांच्या बहिणी अलिमा, नोरीन आणि उज्मा जेलच्या बाहेर बसलेल्या दिसतात. अलिमा आणि उज्मा नोरीनला सांभाळताना दिसतात, ज्या फारच घाबरलेल्या दिसतात. अलिमा सांगतात, आम्ही

## संपादकीय



शांतपणे जेलबाहेर बसलेलो होतो, पण पोलिसांनी आम्हाला रस्त्यावर ओढत नेलं. दुसऱ्या व्हिडिओमध्ये नोरीन सांगतात, काहीही कारण नसताना महिला पोलिसांनी त्यांचे केस पकडून त्यांना खाली पाडलं. मारहाण केली. आम्ही कोणताही गुन्हा केलेला नसताना, न्यायालयाच्या निर्देशांनुसार इमरान यांची फक्त भेट मागत असतानाही कायम असा प्रकार का होतो ते कळत नाही. आम्हाला भावाला तर भेटू दिलं नाहीच, पण पोलिसांनी गैरवर्तन करत जबरदस्तीनं आम्हाला ताब्यात घेतलं. पीटीआय पक्षानं आरोप केलाय की फक्त खान यांच्या बहिणींनाच नव्हे, तर खैबर प्रांताच्या मंत्री मीना खान अफरीदी, खासदार शाहिद खट्टक आणि इतर अनेक महिला कार्यकर्त्यांनाही पोलिसांनी



मारहाण केली. इमरान खान यांच्या बहिणींशी गैरवर्तन करण्याचा हा पहिलाच प्रसंग नाही. याआधी सप्टेंबर २०२५मध्ये अडियाला जेलच्या बाहेर माध्यमांशी बोलताना अलिमावर अंडी फेकण्यात आली होती.

एप्रिल २०२५मध्ये अलिमा, नोरीन आणि उज्मा यांना जेलमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना अटक करण्यात आली होती. अलिमा खान या इमरान खान यांच्या चॅरिटेबल संस्थांशी जोडल्या आहेत. डॉ. उज्मा खान या प्रख्यात सर्जन आहेत. नोरीन नियाजी यांच्याबद्दल मात्र सार्वजनिक क्षेत्रात फार कमी माहिती उपलब्ध आहे. अल-कादिर ट्रस्टच्या माध्यमातून पाकिस्तान सरकारची अब्जावधी रुपयांची जमीन अत्यंत कमी किमतीत विकल्याचाही आरोप इमरान खान यांच्यावर आहे.

या प्रकरणात ९ मे २००३ रोजी इमरान खान यांना अटक करण्यात आली. त्यानंतर पाकिस्तानभर सैन्याच्या अनेक ठिकाणांवर हल्ले झाले होते. इमरान खान यांचं म्हणणं आहे, सगळ्याच खोट्या केसेसमध्ये मला अडकवण्यात आलेलं आहे आणि माझ्या कुटुंबीयांनाही कायम त्रास दिला जात आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | 4 | | 2 | | |
| 1 | 8 | 6 | | 2 | 9 | | | 4 |
| | | | 8 | | 3 | | | 7 |
| | | | 2 | 5 | | 8 | | 3 |
| | 6 | | | 7 | | | 2 | |
| 8 | | 1 | | 3 | 4 | | | |
| 7 | | | 4 | | 5 | | | |
| 5 | | | 1 | 6 | | 9 | 3 | 2 |
| | | 9 | | 8 | 2 | | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 6 | 3 | 1 | 7 | 8 | 5 | 2 | 9 |
| 7 | 9 | 1 | 5 | 6 | 2 | 8 | 4 | 3 |
| 8 | 2 | 5 | 3 | 4 | 9 | 7 | 1 | 6 |
| 6 | 1 | 7 | 4 | 8 | 5 | 9 | 3 | 2 |
| 2 | 5 | 4 | 9 | 3 | 7 | 6 | 8 | 1 |
| 3 | 8 | 9 | 2 | 1 | 6 | 4 | 7 | 5 |
| 9 | 4 | 8 | 6 | 2 | 1 | 3 | 5 | 7 |
| 5 | 7 | 2 | 8 | 9 | 3 | 1 | 6 | 4 |
| 1 | 3 | 6 | 7 | 5 | 4 | 2 | 9 | 8 |

**पंचांग**
२४ नोव्हेंबर २०२५
सोमवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:चतुर्थी २१:२२:२६

नक्षत्र:पूर्वाषाढा
२१:५३:२४
योग:शूल १२:३६:२०
करण:वणिज ०८:२६:०७
करण:विष्टि २१:२२:२६
सूर्य:वृश्चिक

## उपदेशाचे डोस

### दानाचे मोल

राज्यात ओला दुष्काळ पडला होता. राजा प्रतापरावांनी साऱ्या शेतकऱ्यांचा सारा माफ केल्याचे जाहीर केले. अन्नही मोफत दिले जाईल, अशी दवंडी दिली. त्यांना वाटले की, आता सगळे खूश होऊन जातील, आपली स्तुती करतील. ती स्तुती ऐकावी म्हणून धान्य घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या रांगेत जाऊन ते उभे राहिले. त्यांच्या पाठीमागे दोन शेतकरी येऊन उभे राहिले. ते शेतकरी आपापसांत कुजबुजत होते. आपले महाराज शूर आहेत. दानशूरसुद्धा आहेत पण त्यांना व्यवहार समजत नाही.

दुसरा शेतकरी दबल्या आवाजात म्हणाला, का रे ? फुकटचं धान्य खाऊन वर मस्तीला आलास का ? राजांना नाव ठेवतोस ? पहिला शेतकरी म्हणाला, अगदी बरोबर बोललास. गेले महिनाभर मला काही काम न करता असे फुकटंच खाण्याची सवय लागली आहे. मस्ती आल्याशिवाय कशी राहील ? यापेक्षा महाराजांनी आपल्याकडून श्रमदानाची कामे करुन घ्यायला हवी होती. काम मगच दाम हे धोरण त्यांनी राबवायला हवे होते. राजा प्रतापरावांनी हा सल्ला मानला. त्यामुळे दानाचा दुरुपयोग टळला.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८५९ - चार्लस् डार्विन यांचा त्या काळात खूप खळबळ माजवणारा ओरिजिन ऑफ स्पेसीज् हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.
- २००७ - हॅरी पोटरच्या कथेने चर्चेत आलेली लेखिका जे.के. रॉलिंगला एका अमेरिकी मासिकाकडून इंटरनेट ऑफ दि इयर हा पुरस्कार देण्यात आला.

### राष्ट्रीय

- १९५६ - २५०० व्या बुद्धजयंतीच्या समारोहासाठी दिल्लीत दलाई लामा, पंचेन लामा व सिक्कीमच्या महाराजांसह अनेक देशी-परदेशी बौद्ध महाजनांचे आगमन.

### जन्म

- १८७६ - हिडियो नागुची, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ. पिवळ्या तापाच्या लसीची स्वत-वरच चाचणी करताना पिवळ्या तापाने त्याचा बळी घेतला.
- १९२४ - रसिपुरम् कृष्णस्वामी (आर.के.) लक्ष्मण, ख्यातनाम व्यंगचित्रकार.
- १९३७ - केशव मेश्राम, कवी.
- १९५५ - इयान बोथम, इंग्लंडचा माजी अष्टपैलू खेळाडू.

### निधन

- २००४ - आर्थर हेली, जगप्रसिद्ध अमेरिकन लेखक.
- २००६ - डेरेक डिसूझा, माजी भारतीय फुटबॉल पटू व प्रशिक्षक.
- २००६ - एलेक्जेंडर लितविनेको, रशियाचा माजी हेर.
- २००६ - विली पेप, मुष्टियोद्धा, माजी विश्व फेदरवेट चॅम्पियन
- २००७ - रवी मेनन, मलायम चित्रपटाचे प्रसिद्ध कन्नड अभिनेता.
- २००८ - पीटर थानगाराज, भारताचे माजी महान फुटबॉलपटू.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४४



### आडवे शब्द

१. गाण्याची, गप्पांची बैठक
३. खाटीक
५. सगळा हवाला रामावर!
६अ. ज्वर
८. सिंह
९. बगीचा
१०. गवताची बारीक काडी
११. पाताळ
१३. सन्मान, मान ----
१५. वार्ताहार
१७. फळांचे पेय
१९. निरुपाय झालेला
२१. उत्सवाचे दिवस
२३. बंदी, मज्जाव
२४. शरीर, काया, तनु
२५. छोटी लढाई
२८. ध्वनी
३०. मागणेकरी
३१. टक्कर
३३. तमाशा
३५. निराश
३७. सहाय्य
३८. मर्कट
३९. सामोपचार, वेदांपैकी एक
४०. खोडसाळपणे त्रास देणे
४१. मिठीत
४३. कशा प्रकारचा?
४६. हिंदीतील कुंडी मराठी नाट्यपदात- 'प्रभु अजि ---, मनी तोषला'
४८. एकटा, पाश नसलेला
४९. पळ काढणे
५१. पर्वत
५२. हिंदी-इंग्रजी मिळून मराठीत कटाप!
५३. निष्णांत, पारंगत
५६. पोत्याचे कापड
५८. फूल, पुष्प
५९. जुगाराचा एक प्रकार
६०. न कर्त्याचा वार
६२. तपश्चर्या
६४. तारुण्य
६५. दागदागिने
६६. त्वचेवर उन्हाने चढणारा थर
६७. स्वप्न (हिंदी)
६८. सदन, निवासस्थान
७०. कापडाचे धागे आडवे विरत जाणे
७२. व्यवस्था, एकूण काम
७५. आळशी, मठ्ठ
७६. एकदम
७७. वाईट गोष्टीला प्रोत्साहन
७८. केस
७९. चांदणी

### उभे शब्द

१. शहरांपासून लुप्त होत चाललेली सपाट, विस्तीर्ण जमीन
२. पटकन, चटकन
३. युक्ती
४. शोभणारा
५. संताप
६. आवेगात
६अ. साठ मिनिटे
७. क्षणभर
९. च्या बद्दल
१०. चरण्याची जागा
१२. जिव्हा
१४. मरेपर्यंत
१५. मूल
१६. सेवक
१८. चंदन जोडल्यास एक भाजी
२०. मूठ भरून
२२. व्रताच्या उद्यापनाची सामग्री
२३. जलविद्युत निर्मितीबरोबर भूकंपाशी जोडलेले नाव
२६. मधुमक्षिका
२७. तीव्र चवीचा (चहा)
२८. आजपर्यंत
२९. एकत्र येणे, गोळा होणे
३२. टाळ्यांचा आवाज
३४. येरझारा, जाणे-येणे
३६. ढीग
४१. भांडण, खोडी
४२. पाचने गुणल्यास
४४. स्वच्छ
४५. बोलण्यातील अनावश्यक भाग
४७. अंत:करण
४८. सरसकट
५०. मऊ
५४. चारही बाजूस पाणी असलेली जमीन
५५. प्रवेशकार घेण्याची जागा
५७. हिंदीतील स्वयंपाकघर
५८. झाडाला लोंबकळण्याचा एक खेळ
६०. बाण
६१. डावा
६३. वजनदार 'गजगामिनी'ची चाल
६९. बाळसेदार, फुगीर गालांचा
७१. सहापट
७३. छिद्र झाकणारे बारीक शिवणकाम
७४. भ्रम
७४अ. छप्पर

### शब्दकोडे क्र. ४२ चे उत्तर

**आडवे उत्तर :** १.साष्टांग नमस्कार विनंती विशेष ९.हेवा ११.जलद १२.दीर १३.वारस १४.दादरा १६.नमुना १८.सटवाई २०.रडी २१.बाका २२.अलवार २३.कटकट २५.वरूण २७.गदा २८.तेरडा २९.बाळदमा ३१.माज ३२.सवाशे ३३.तिकडी ३४.भेद ३५.लवकर ३७.वचक ३८.भूत ४०.नड ४१.करवंटी ४३.डाका ४५.सैरावैरा ४९.महाल ५०.वाल ५१.रजनीनाथ ५४.नीरस ५५.कसर ५७.कलाय ५८.खरूज ५९.सरकार ६१.ठाणे ६२.खास ६३.वाम ६४.नाट लावणे ६६.पाऊस ६७.महाराज ६९.कसा ७१.रत ७२.कमळ ७४.दारोदार ७५.नटखट ७७.पारवा ७८.दार ८०.थोर ८१.लीनता ८२.सावकाश

**उभे उत्तर :** १.साक्षीदार २.गजरा ३.नल ४.मदनबाण ५.रचना ६.नंदीबैल ७.तीर ९.हेर १०.वासकट १३.वाईट १५.दडी १७.मुका १८.सरतेशेवटी १९.वाकडातिकडा २२.अदा २४.कवडी २५.वद २६. रूमाल २७.गरज २९.बाभूळ ३०.रद ३१.माकड ३२.समर ३६.वनराज ३८.मजलदरमजल ३९.तारा ४२.वंदनीय ४४.कामकाज ४५.सैलदर ४६.वैर ४७.सोना ४८.खसखस ५०.वाकस ५२.नीर ५३.थकणे ५६.रकाना ६०.रटरट ६१.ठाणेकर ६२.खासदार ६३.पारा ६५.लाथ ६६.पाळ ६७.मदालसा ६८.हार ६९.कनक ७०.साट ७३.मवाली ७६.खवा ७७.पार ७८.दाता ७९.धोका

# राहुल बाकरे आणि विनित फडणीस 50 लाखाचे बक्षीस देत सन्मान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इन्फोसिसची सामाजिक कार्य सीएसआर शाखा असलेल्या इन्फोसिस फाउंडेशनने आज आरोहण सोशल इनोव्हेशन अवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीच्या विजेत्यांची घोषणा केली. यंदा शिक्षण, आरोग्यसेवा आणि पर्यावरणीय शाश्वतता या तीन क्षेत्रांमध्ये अपवादात्मक नवसंशोधनांचा गौरव करण्यात आला - तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि करुणेद्वारे सामाजिक प्रेरणा देण्याच्या इन्फोसिस फाउंडेशनच्या ध्येयाशी जुळणारी ही तीन क्षेत्रे आहेत. या वेळी २००० हून अधिक प्रवेशिकांमधून विजेत्यांची निवड करण्यात आली




आरोहण सोशल इनोव्हेशन एवॉर्ड्स २०२५ चे विजेत्यांना त्यांच्या प्रभावी नवसंशोधनासाठी प्रत्येकी ५० लाख रूपये देण्यात आलेशिक्षण– बेंगळुरू येथील राजेश ए राव, रवींद्र एस राव आणि दीपा एल बी राजीव यांनी 'कनेक्टिंग द डॉट्स' हा एक परस्परसंवादी शिक्षण कार्यक्रम विकसित केला आहे. त्यातून सरकारी शाळांमधील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दररोज लाईव्ह वर्ग, लॅब किट, शिष्यवृत्ती आणि प्रभावी शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षणाद्वारे स्टेम आणि स्पोकन इंग्लिश शिकवले जाईल. आरोग्यसेवा - नवी दिल्ली येथील चितरंजन सिंह आणि रॉबिन सिंह यांनी 'क्लुइक्स सीओ१२' विकसित केला आहे. तो पोर्टेबल एआय- आणि आयओटी-सक्षम पाणी-गुणवत्ता विश्लेषक असून त्यातून रिअल-टाइम, जीपीएस-टॅग केलेले अहवाल तयार करतो. ते ३० मिनिटांत पाण्यामुळे होणारे रोग ओळखण्यासाठी १४ प्रमुख पॅरामीटर्सची चाचणी करते. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण दोन्ही वर्गांत विश्वसनीय जल चाचणी परवडणारी, सुलभ आणि शाश्वत बनते. पर्यावरणीय शाश्वतता - पुण्यातील राहुल सुरेश बाकरे आणि विनित मोरेश्वर फडणीस यांनी 'बोरचार्जर' विकसित केले. हे जगातील पहिले रोबोटिक कृत्रिम बोअरवेल-रिचार्ज तंत्र असून ते दरवर्षी ४ ते ८० लाख लिटर पावसाचे पाणी विद्यमान बोअरवेलमध्ये साठवू शकते – त्यामुळे सिंचन, शेती उत्पादन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि प्रमाण सुधारते – राहणीमान अधिक शाश्वत बनवते.



सिन्नर : नांदुर शिंगोटे गटातुन छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर यांनी उमेदवारी करावी. यासाठी आज रविवारी (दि २३) बाराबुलतेदार समाज बांधवांनी दोडी बु म्हाळोबा देवस्थान येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नांदुर ,दोडी, वावी ,पांगरी येथील नागरिक महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत डॉ विलास पांगारकर यांनी उमेदवारी करावी यासाठी सर्वांनी एकमत दर्शवले. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली.

## थोडक्यात बातम्या...



### प्रशांतभाऊ काळे यांनी घेतली पिडीत कुटूंबाची सांत्वनपर भेट

मालेगाव (स. गांवकरी) : तालुक्यातील डोंगराळे येथील चार वर्षीय बालिकेवरील अत्याचार व खुनाची घटना ही वेदनादायी व धक्कादायक आहे. या दु:खात पिडीत कुटूंबाच्या पाठीशी असून आरोपीस कठोरात कठोर शिक्षा होण्यासाठी खटला जलद न्यायालयात चालविण्यात यावा. यासाठी टायगर ग्रुप उपाध्यक्ष भैय्यासाहेब बंडगर, नाशिक जिल्हाध्यक्ष प्रशांतभाऊ काळे यांनी पिडीत कुटूंबाची सांत्वनपर भेट घेत चर्चा केली. आरोपीस कठोरात कठोर शिक्षा व्हावी. या संदर्भात राज्यांचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यात येईल. कुटुंबीयांच्या नेहमी आम्ही पाठीशी उभे राहू. या घटनेचा तीव्र निषेध करून अशा प्रकारच्या घटना घडू नये अशा नराधमांना त्वरित शिक्षा व्हावी. कुटुंबीयाला त्वरित न्याय द्यावा दयावा . लवकरात लवकर कारवाई करावी अन्यथा टायगर ग्रुप च्या वतीने महाराष्ट्रभर आंदोलन छेडन्याचा इशारा भैय्यासाहेब बंडगर व प्रशांत भाऊ काळे यांनी दिला. यावेळी टायगर ग्रुप चे मालेगाव तालुका अध्यक्ष सचिन गायकवाड , गणेश कडू, सचिन गवळी, स्वप्निल पांडे , मनोज गांगुर्डे, आकाश वाघ , रघु पाटील, साई काळोगे, स्वप्निल अहिरे, ज्ञानेश्वर जाधव, राधे चौधरी , सागर पवार, सागर दामोदर आदी टायगर ग्रुपचे पदाधीकारी उपस्थित होते.

### एंजल वनने गुंतवणूकदारांना गुंतवणूक योजनांबाबत केले सतर्क

पुणे (स. गांवकरी) : एंजल वन लिमिटेड या फिनटेक क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने गुंतवणूकदारांना एंजल वनच्या नावाचा गैरवापर करून आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगत फसवणूक करणाऱ्या सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क केले आहे. कंपनीला व्हॉट्सअॅप व टेलिग्राम अशा सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्म तयार करण्यात आलेले अनेक अनधिकृत ग्रुप्स निदर्शनास आले आहेत, जे एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव व लोगोचा, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचा व प्रतिष्ठेचा बेकायदेशीर व फसवणूक करणाऱ्या पद्धतीने गैरवापर करत आहेत. एंजल वन ने ओळखले आहे की फसवणूक करणारे हे ग्रुप्स बेकायदेशीर कृती करत आहेत, जसे आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सुरक्षिततेसंबंधित सल्ला किंवा शिफारशी देणे, तसेच सेबीच्या मान्यतेशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावे व कामगिरीबाबत अनधिकृत दावे करणे. आम्ही सांगू इच्छितो की, सिक्युरिटीज बाजारपेठेत गुंतवणूकीबाबत अनधिकृत सल्ला देणे किंवा परताव्यांची हमी देणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. आम्ही गुंतवणूकदारांना आमच्या कंपनीकडून असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही संवादाची सत्यता बारकाईने पडताळून पाहण्याचे आवाहन करतो. सखोल संशोधन करत आणि अधिकृत स्रोतांकडून मिळालेल्या माहितीनुसार कायदेशीर गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्यावा. एंजल वन लिमिटेडचा कोणतेही बनावट अॅप्लीकेशन्स, वेब लिंक्स किंवा खाजगी व्हॉट्सअॅप/टेलिग्राम ग्रुप्ससोबत प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा संबंध नाही आणि फसवणूक करणारे अॅप्लीकेशन्स किंवा वेब लिंक्ससोबत व्यवहार केल्याने होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानासाठी किंवा परिणामांसाठी जबाबदार नाही, असे एंजल वन ने सांगितले. एंजल वनने स्पष्टपणे सांगितले की कंपनी अनधिकृत सोशल मीडिया ग्रुप्समध्ये ग्राहकांना सामील करत नाही.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांची विश्रामगृहाबाबत तीव्र शब्दात नाराजी

## स्वच्छतेची दखल घेण्याचे आदेश : सहा महिन्यांपासूनची घाण रात्रीतून स्वच्छ झाली

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथील विश्रामगृहाच्या स्वच्छतेबाबत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करत त्याची दखल घेण्याचे आदेश दिले. आता आपली धडगत नाही, असे गृहीत धरून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेने विश्रामगृह व परिसराची युद्ध पातळीवर पूर्णपणे स्वच्छता करत संपूर्ण परिसर चकाचक केला. गेल्या सुमारे सहा महिन्यांपासून ची घाण रात्रीतून स्वच्छ झाली.

उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी सकाळी अचानक दौंड वरून पाथर्डी मार्गे परतुर कडे जाताना फ्रेश होण्यासाठी शासकीय विश्रामगृहावर थांबले.



आवाराची अस्वच्छता, परिसरातील कचरा, झाडांची दुरावस्था बघून त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. जबाबदार अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याचे सुतोवाच करत याबाबतची जबाबदारी आमदार शिवाजी गर्जे यांच्यावर सोपवली. "आता आपली धडगत नाही,... प्रसंगी घरची वाट धरावी लागेल... वेळ मारून नेणारे उत्तर देता येणार नाही..." अशी पूर्ण कल्पना असलेल्या बांधकाम विभागाच्या प्रशासनाने एखाद्या साधुसंताच्या आश्रमासारखे वातावरण बनवले. अजितदादा म्हणजे शिस्त व निर्णयाबद्दल ठाम म्हणून ओळख असलेले नेतृत्व आहे. राष्ट्रीय महामार्गावरील मुख्य शासकीय विश्रामगृह असूनही येथे निवास व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. पूर्ण वेळ चौकीदार नाही. कार्यालयातीलच कर्मचाऱ्याला काम पाहायला सांगितले जाते. गेल्या काही दिवसांपासून येथील झाडांची व परिसराची अत्यंत दुरावस्था होऊन मोकाट जनावरे आवारात वावरतात. नीटनेटके फर्निचर नाही. वाढीव विश्रामगृह व अन्य सुविधांचा प्रस्ताव केवळ कागदावरच आहे. मोहटादेवी, मढी, भगवानगड अशा स्थानांना भेट देण्यासाठी अनेक महत्त्वाच्या व्यक्ती सतत तालुक्यात असतात. वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकारी सुद्धा येथे थांबतात. व्हीआयपी सूट सुद्धा नावालाच असून स्वच्छतेचे साहित्य तेथे अभावाने आढळते. येणारी व्यक्ती पॉश गाडीतून व्हरांड्यात उतरून लगेच व्हीआयपी सूटमध्ये जात असल्याने परिसर पाहून निमुटपणे निघून जातात. स्वच्छतागृहाच्या मागील बाजूसही मोठा कचरा सतत असतो. त्याचीही दुर्गंधी असते. दोन्ही दालनामध्ये डस्टबिन नाही. यापूर्वीच्या चौकीदाराला स्वच्छता व देखभाली बाबत आंध्र प्रदेशच्या आमदाराने गौरविले होते. आता मात्र परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. परिसरामध्ये रात्रीच्या वेळी अंधार असतो. योगायोगाने उपमुख्यमंत्री अजित दादांचा दौरा झाल्याने बांधकाम विभागाचे दुर्लक्ष लोकप्रतिनिधी पुढे आले. अजित दादांसारख्या नेत्याने अधून मधून विश्रामगृहाला भेट देऊन पाहणी केल्यास त्याची दुरावस्था संपू शकेल. अशी नागरिकांची अपेक्षा आहे. येत्या दोन महिन्यांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही दौरा कधीही लागू शकतो. त्यापूर्वी विस्तारित विश्रामगृहाचा आराखडा सादर होऊन सध्याच्या विश्रामगृहाचे रुपडे बदलले तरी दादांचा संताप सार्थकी लागला असे म्हणावे लागेल.

# भव्य दत्त जयंती सोहळा श्री क्षेत्र नारायणपूर

**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

परमपूज्य श्री श्री श्री नारायण महाराज (अण्णा )यांचे आशीर्वादाने व परमपूज्य टेंबे स्वामींच्या अधिपत्याखाली क्षेत्र नारायणपूर येथे तीन दिवसाचा भव्य दिव्य दत्त जन्म व जयंती सोहळा मंगळवार दिनांक 2/ 12/ 2025 ते गुरुवार दिनांक 4 /12/ 2025 या कालावधीत थाटामाटात संपन्न होणार आहे. भाविकांनी या आनंद सोहळ्यामध्ये सहभागी होऊन आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा असे नम्र आवाहन दत्त सेवेकरी नारायणपूर मंडळ करत आहे. मंगळवार दिनांक 2 /12 /2025 रोजी प.पू. महाराजांच्या दुपारी बारा



वाजून पाच मिनिटांनी येणाऱ्या ज्योतीचे स्वागत होईल. सायंकाळी चार ते सहा या वेळेत 200 कोटी शिवदत्त नाम यज्ञ व अखंड प्रज्वलित अग्निकुंड यांचा 25 वा वर्धापन दिन सर्वांना रांगेत, शिस्तबद्ध बसवून, होम हवन करून, शिवदत्त सहस्रनामावली घेऊन, भाविकांच्या दीपांचे पूजन होऊन, यज्ञकुंडाला आरती अर्पण करून, दीप पूजन करून नंतर दीप यज्ञात टाकले जाईल.

# मारहाण झाल्याचे कुलकर्णी यांचे पत्रकार परिषदेत खुलासा

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

माझ्या विरोधातील प्रतिस्पर्धी उमेदवाराला आपला पराजय दिसुन येत असल्याने माझ्यावर जीवघेणा हल्ल्याचा पुर्ववैमस्यातुन पुर्वनियोजीत कट रचुन विरोधी पक्षाने गंभीर जखमी करण्याच्या उद्देशाने मला मारहाण केली,त्यांना त्यांचा पराजय दिसत असल्याने यातुनच त्यांनी मला मारहाण केली आहे,परंतु ही निवडणुक जनतेने हातात घेतली असुन विरोधकांची दादागिरी जनता मतपेटीतुन दाखवुन देईल असा विश्वास मराठवाडा जनहित पार्टी प्रणित बिलोली शहरविकास आघाडीचे उमेदवार संतोष कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.गेल्या १५ वर्षापासुन बिलोली नगरपरिषदेवर



एकहाती सत्ता गाजवलेल्या अन् विकासाच्या दृष्टीने एकपाऊल पुढे असणाऱ्या माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांचा सुरु असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा वाढता जणाधार पाहुन विरोधकांच्या पायाखालची वाळु घसरली आहे. निवडणुकीत पराभव होण्याच्या धसक्याने जबर मारहाण केली आहे व समाज माध्यमावर माझ्या यांच्याविरोधात चुकीचे चित्र निर्माण करुन त्यांना बदनाम करण्याचा डाव रचण्यात आल्याचे आरोप कुलकर्णी यांनी केला असुन संबंधित उमेदवार महिलेचा मी कधी तोंड ही पाहीले नाही,केवळ रजकीय सुडबुध्दीने माझा वाढता जणाधार पाहुन माझी बदनामी करण्याच्या उद्देशाने विरोधक खोटी अफवा पसरवित आहेत असे यावेळी कुलकर्णी यांनी पत्रकारांना सांगितले.मी सभेची परवानगी घेण्यासाठी नगरपरिषदेत जात असताना मला अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याच्या तुडमे, अंकुशकर व त्यांच्या साथीदाराने मारहाण केली,तेव्हा पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांनी मला त्यांच्या पासुन सुटका करुन नगरपरिषदेत बसविले,सर्वच घटना सिसिटिव्ही फुटेजमध्ये कैद असुन माझ्यासोबत अनुप अंकुशकर नसते तर या तुडमे बंधुनी माझा जीव घेतला असता असेही कुलकर्णी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत म्हटले आहे.यावेळी या पत्रकार परिषदेला जनहित पार्टीचे उमेदवार अनुप अंकुशकर,अर्जुन खंडेराय,मौवेद मौलाना यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# भाभीजी घर पर हैं – कॉमेडी व्यक्तिरेखा आता बिग स्क्रीन बोनान्झासाठी सज्ज!

- 'भाभीजी घर पर हैं – फन ऑन द रन' चित्रपट 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटर्समध्ये प्रदर्शित होत आहे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




दहा वर्षांहून अधिक काळापासून झी एंटरटेनमेंटची 'भाभीजी घर पर हैं' ही भारतातील सर्वात लोकप्रिय कॉमेडी मालिका राहिली आहे. या मालिकेने आपल्या लोकप्रिय पात्रांमुळे प्रेक्षकांची मने जिंकली: विभूतीजींचे आकर्षण, तिवारीजींचा ड्रामा, अंगूरी भाभीचे "सही पकडे हैं!", अनीता भाभींची आत्मविश्वासपूर्ण मोहकता आणि हप्पू सिंग व सक्सेना यांचे "आय लाइक इट!" ही अविस्मरणीय धमालीने पिढ्यान् पिढ्या प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. देशातील सर्वात दीर्घकाळ चालणाऱ्या आणि सर्वाधिक आवडत्या टीव्ही शो पैकी एक म्हणून, या मालिकेचे प्रेक्षकांसोबतचं नाते वर्षागणिक अधिकधिक घट्ट होत गेले आहे. भारतीय इतिहासात पहिल्यांदाच, अजूनही सुरू असलेला एक शो मोठ्या पडद्यावर झेप घेत आहे. झी सिनेमा आणि झी स्टुडिओज 'भाभीजी घर पर हैं – फन ऑन द रन' हा चित्रपट 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटर्समध्ये घेऊन येत आहेत.

हा चित्रपट या लोकप्रिय व्यक्तिरेखांना मोठ्या पडद्यावर एका धमाल, खळखळून हसवणाऱ्या साहसी प्रवासावर घेऊन जाईल. यामुळे लाखो लोकांच्या आवडीचे हे कॉमेडीचे विश्व अधिक विस्तारेल. या कलाकारांसोबत हिंदी हार्टलँडमधील तीन अत्यंत लोकप्रिय कलाकार — रवि किशन, मुकेश तिवारी आणि निराहुआ हे देखील सहभागी होत असून, त्यांच्या तुफानी ऊर्जा आणि सहज विनोदामुळे हे कॉमेडी अॅडव्हेंचर प्रेक्षकांना एका नव्या उंचीवर नेण्याचे वचन देते. तेव्हा तयार व्हा धमाल, कॉमेडी आणि खळखळून हसवणाऱ्या गोंधळासाठी — 'भाभीजी घर पर हैं – फन ऑन द रन' सोबत, झी सिनेमा आणि एडिट II निर्मित, मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होत आहे 6 फेब्रुवारी 2026 रोजी.

# ड्रोनाचार्य एरियल इनोवेशन्सची अर्धवार्षिक प्रदर्शनाची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ड्रोनाचार्य एरियल इनोवेशन्स लिमिटेड, बीएसई एसएमई वरील भारताच्या प्रथम सूचीबध्द ड्रोन स्टार्टअपने 30सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या अर्धवर्षाच्या आपल्या स्टँडअलोन आर्थिक परिणामांची घोषणा केली, ज्यामध्ये तिच्या डिफेन्स, प्रशिक्षण आणि ड्रोन सेवा पोर्टफोलिओमध्ये दीर्घकालीन व्यवसाय गतिशीलता आढळली आहे. H1 FY2025–26साठी कार्यांमधला स्टँडअलोन महसूल ₹ 957.93 लाख एवढा होता आणि एकूण महसूल 1078.18 लाख होता. 30सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या झालेल्या अर्धवर्षासाठी EBITDA ₹ 462.20 लाख असून, करोत्तर निव्वळ नफा ₹194.27 लाख घोषित केला गेला, यावरुन कंपनीच्या कार्यात्मक सर्वोत्कृष्ठतेवर आणि मार्जिन सुधारणेवर असलेला निरंतर भर प्रतिबिंबीत होतो. ड्रोनाचार्य येत्या त्रैमासिकांसाठी खासकरुन शासकीय आणि सुरक्षेशी निगडीत प्रोजेक्ट्ससाठी भारतातील सर्वात जलदगतीने प्रगती करणारी फुल-स्टॅक ड्रोन तंत्रज्ञान संस्थांपैकी एक म्हणून गतिशीलता निर्माण निरंतर सुरु ठेवत आहे.

# अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे रेशन दुकानावर निकृष्ट धान्य!

- पत्रकार संजय गायकर यांनी उघड केला प्रकार; ग्रामस्थ संतप्त!
- गरीबांसोबत अन्याय! गावात संतापाची लाट

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावातील सरकारमान्य रेशनिंग दुकान "श्रीकृष्ण सह दूध व्यावसायिक संस्था मर्या. ब्राम्हणवाडा" यांच्या संचलनात असलेल्या स्वस्त धान्य दुकानावर निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप केल्याचा धडक आरोप समोर आला आहे.

दि. २२ नोव्हेंबर रोजी गावात धान्यवाटप सुरू झाले. मात्र लाभार्थ्यांना मिळालेले धान्य किडलेले, जाळे लागलेले, अळी लागलेले असल्याची गंभीर





तक्रार ग्रामस्थांनी दैनिक समर्थ गांवकरीचे पत्रकार संजय गायकर यांच्याकडे केली. तक्रार मिळताच पत्रकारांनी तातडीने दुकानात धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.

तेथे ६०-७० कट्ट्यांतील संपूर्ण धान्यच निकृष्ट दर्जाचे असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आढळून आले. याबाबत कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी "हे धान्य फुकटचे असल्याने असेच येते" असे धक्कादायक उत्तर दिले.

पत्रकारांनी अकोले तालुक्याचे पुरवठा अधिकारी संदीप निळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट केले की—दुकानदाराने गोदामातून धान्य घेताना गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. निकृष्ट धान्य स्विकारण्याचा अधिकार दुकानदाराचा आहे.

मात्र या दुकानदाराने सर्व नियम डावलत निकृष्ट धान्य स्वीकारले आणि तेच ग्रामस्थांना देण्याचा प्रयत्न केला. तक्रारीनंतर सरपंच संतोष भांगरे, सदस्य रवींद्र हांडे, शिवाजी आरोटे, लहुजी शक्ती सेना अध्यक्ष नवनाथ पवार यांनी दुकानात येऊन पुरवठा अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

मात्र पुरवठा अधिकारी यांनी "संपूर्ण धान्य बदलून देणे शक्य नाही, चांगले धान्य मिक्स करून द्या" अशी सूचना केली.

यावर ग्रामपंचायत सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली—

"हे धान्य संपूर्ण निकृष्ट दर्जाचे आहे, जनावरेसुद्धा खाणार नाहीत... मग हे लोकांना कसे द्यायचे?" पासणीदरम्यान दुकानात सर्वात महत्त्वाचा दरपत्रक, स्टॉकची माहिती, उरलेल्या साठ्याचा तपशील बोर्ड कुठेच लावलेला दिसला नाही.

दुकानदाराला विचारल्यावर त्याने "आम्ही व्हॉट्सअपवर मेसेज केले आहेत" अशी प्रतिक्रिया दिली.

ही बाब स्वतःच अत्यंत गंभीर नियमभंग ठरते. ज्यांच्यासाठी शासनाने "लाडक्या बहिणींना" आणि गरीब हितग्राहकांना धान्य मंजूर केले जाते, त्यांनाच किडलेले धान्य देणे कितपत रास्त आहे?

गावात या घटनेने संताप उसळला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

स्वस्त धान्य दुकानाचे प्रमुख नियम:

१. परवाना अनिवार्य: परवाना दुकानात दृश्यमान ठिकाणी लावणे बंधनकारक.
२. e-POS मशीनद्वारेच धान्य वितरण: OTP/अंगठा प्रमाणीकरण आवश्यक.
३. निश्चित वेळेत दुकान उघडे ठेवणे बंधनकारक.
४. दरपत्रक व स्टॉक माहिती लावणे आवश्यक.
५. निकृष्ट दर्जाचे, कमी वजनाचे धान्य देणे निषिद्ध.
६. प्रत्येक व्यवहारानंतर प्रिंटेड पावती देणे बंधनकारक.
७. तक्रार निवारण फलक लावणे अनिवार्य ग्रामपंचायत, तहसीलदार, पुरवठा विभागाकडे तक्रार करण्याचा अधिकार.
८. परवाना हस्तांतरणाची योग्य नोंदणी आवश्यक.
९. साठ्यातील धान्यावर Quality Check आवश्यक. निकृष्ट धान्य त्वरित नाकारले पाहिजे.
१०. जास्तीचे पैसे घेणे किंवा धमकी देणे गुन्हा आहे.

ब्राम्हणवाडा येथील या प्रकाराने स्वस्त धान्य दुकानातील गैरव्यवहार, निष्काळजीपणा आणि प्रशासनाच्या देखरेखीतील त्रुटी उघड झाल्या आहेत.

# निसर्गोपचार ही माणूस व निसर्ग यांच्यातील समतोल साधणारी जीवनशैली

- राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेतर्फे आयोजित तीन दिवसीय नैसर्गिक खाद्य महोत्सवाचा समारोप

पुणे : (समर्थ गांवकरी)

"निसर्गोपचार ही केवळ उपचारपद्धती नाही, तर निसर्ग आणि माणूस यांच्यात समतोल साधणारी जीवनशैली आहे. निरोगी, आत्मनिर्भर आणि अध्यात्मिक अधिष्ठान असलेला सदृढ समाज घडण्यासाठी महात्मा गांधी यांनी दिलेला निसर्गोपचाराचा हा वैचारिक वारसा आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेतर्फे (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी-एनआयएन) आठव्या निसर्गोपचार दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय नैसर्गिक खाद्य महोत्सवाच्या समारोपावेळी राज्यपाल बोलत होते. येवलेवाडी येथील निसर्ग ग्राम परिसरात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय आयुषमंत्री (स्वतंत्र कार्यभार)



तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची प्रमुख अतिथी होती. प्रसंगी केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या सहसचिव डॉ. कविता जैन, पुणे विभागाच्या पोस्टमास्तर जनरल सुचिता जोशी, 'एनआयएन'चे प्रभारी संचालक अमरेंद्र सिंह व्यासपीठावर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेचे अध्यक्ष अनंत बिरादार उपस्थित होते. राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेच्या वतीने प्रकाशित पुस्तकाचे, संस्थेवरील विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन झाले. तसेच १५६ व्या गांधी जयंतीनिमित्त घेतलेल्या आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वैद्यकीय प्रश्नमंजुषा, वक्तृत्व-निबंध, संशोधन पेपर सादरीकरण, फिजकल्टोपॅथी, रील्स आदी स्पर्धांमधील विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. कार्यक्रमात दादाजी डॉ. दिनशा के. मेहता पुरस्कार (उत्कृष्ट तज्ज्ञ) व डॉ. एस. एन. मूर्ती पुरस्कार (उत्कृष्ट पी.जी. विद्यार्थी) पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्राध्यापक डॉ. सत्यनाथ, ओमप्रकाश शुक्ला, मंदार देशपांडे, सौरभ साकल्ले यांच्यासह अन्य पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी महोत्सवाचे यशस्वी संयोजन केले.

महात्मा गांधी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेत येऊन आनंद झाला असल्याचा राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केला. ते म्हणाले, "महात्मा गांधी यांनी नैसर्गिक जीवन व आरोग्याची सांगड घालत आत्मनिर्भरतेचा संदेश दिला. निसर्गोपचार दिवसाच्या निमित्ताने होत असलेला हा महोत्सव त्यांच्या या विचारांचा जागर आहे. निसर्गोपचारावर विश्वास ठेवून गांधीजींनी आयुष्यभर त्याचे पालन केले. मानवता जपणारा हा विचार आचरणात आणण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. यानिमित्ताने आपण निसर्गोपचार, चांगले आरोग्य याबाबत जागरूकता निर्माण करू, संशोधनाला प्रोत्साहन देऊ आणि प्रत्येक व्यक्तीला निसर्गाच्या ज्ञानाच्या माध्यमातून निरोगी व आनंदी जीवनाकडे प्रेरित करू, असा संकल्प करूया."

"निसर्गाशी एकरूप होत संतुलित आहार, योग्य व्यायाम, सकारात्मक चिंतन व चांगली जीवनशैली अंगिकारली, तर शरीरातील रोगांना बरे करण्याची ऊर्जा शरीरातच तयार होते. आज जगभर जीवनशैलीजन्य आजार आणि तणावाचे प्रमाण वाढत असून, अनेक लोक औषधांवर अवलंबून झाले आहेत. अशावेळी निसर्गोपचार आपल्याला चांगल्या आरोग्याकडे नेणारा सोपा मार्ग आहे.

## थोडक्यात बातम्या...



### ८ फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने खळबळ; सर्पमित्रांकडून सुरक्षित बचाव

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील वाहुळी येथे तब्बल ८ ते ९ फूट लांबीचा आणि अंदाजे १५ ते १६ किलो वजनाचा अजगर आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. रात्री नऊच्या सुमारास हायवेच्या कडेला मोठा सर्प दिसल्याची माहिती मिळताच स्थानिकांनी सर्पमित्रांना पाचारण केले. तत्काळ धाव घेऊन सर्पमित्र आकाश जाधव यांनी ही घटना पडघ्यातील सर्पमित्र सूरज गायसमुद्रे व रवी दांडगे यांना कळवली. माहिती मिळताच सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले. निरीक्षणात हा सर्प अजगर प्रजातीचा असल्याचे स्पष्ट झाले. सर्पमित्रांनी कोणतीही हानी न पोहोचवता अत्यंत संवेदनशीलतेने आणि दक्षतेने अजगराला सुरक्षितरीत्या पकडले. आपल्या भक्ष्याच्या शोधात हा अजगर रस्त्याच्या कडेला फिरत असावा,असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यानंतर सर्पमित्र सूरज गायसमुद्रे, रवी दांडगे , मयुर बजागे यांनी पडघा वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या अजगराला सुरक्षित जंगलात सुखरूप सोडून दिले. या कार्यात वडपा वनपाल दर्शन मुरकुटे आणि वनरक्षक मोनिका बेलदार यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. बिनविषारी अजगराला सुरक्षितरित्या नैसर्गिक अधिवासात परत सोडल्याने गावकऱ्यांनी दिलासा व्यक्त केला असून सर्पमित्रांच्या पर्यावरणपूरक आणि संवेदनशील कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. पर्यावरणप्रेमी हे कार्य वन्यजीव संवर्धनाचा उत्कृष्ट आदर्श असल्याचे सांगत सर्पमित्रांचे अभिनंदन करत आहेत.

### पावडरने सोन उजळून देतो असे सांगून पाच लाख साठ हजाराची फसवणूक

शिवनेरी (स. गांवकरी) : शिरोली बुद्रुक येथे पावडरने सोन उजळून देतो असे सांगून पाच लाख साठ हजाराची फसवणूक केल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे .जुन्नर पोलीस स्टेशन यांच्याकडून सातत्याने सांगण्यात येते की , गावात अनोळखी व संशयित व्यक्ती दिसला ताबडतोब सरपंच , ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, व जुन्नर पोलीस स्टेशनला ताबडतोब कळवा असे वारंवार सांगण्यात आले आहे. जुन्नर पोलीस स्टेशन येथे लक्ष्मण शंकर बोऱ्हाडे रा. शिरोली बुद्रुक याने फिर्याद दिली की, पत्नी विमल लक्ष्मण बो-हाडे आम्ही दुपारी १२: १० वा च्या सुमारास घरा जवळ बसलो असताना एक काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर दोन अनोळखी व्यक्ती गेटच्या आतमध्ये आल्यावर मला त्यांनी सांगितले की, 'आम्ही डेटॉल कंपनिकडुन आलो आहे .कंपनीने एक तांब्याची भांडी साफ करण्याची एक पावडर काढली असे सांगून घरातील कोणती वस्तू आला असे सांगितले.

### सदनिकेतील गळती व अन्य दोष ३० दिवसांत काढून देण्याचे महारेराचे आदेश

पुणे (स. गांवकरी) : दोन वर्षांपूर्वीच घेतलेल्या नवीन प्रकल्पातील सदनिकेत गळती आणि अन्य दोष आढळून आल्याने विकासकाविरोधात केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना 'महारेरा'ने ३० दिवसांच्या आत सदनिकेतील ही गळती आणि दोष दुरुस्त करण्याचे, तसेच यासंदर्भात भविष्यात कोणतीही तक्रार येणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत. व्ही. आर. कुलकर्णी असोसिएट्स आणि एस. आर. कुलकर्णी डेव्हलपर्स या बांधकाम कंपनीविरोधात पुण्यातील तळजाई परिसरात 'मेघदूत टॉवर कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी'चे माजी अध्यक्ष व वकील ॲड. अमित शहा यांनी 'महारेरा'कडे तक्रार दाखल केली होती. व्ही. आर. कुलकर्णी असोसिएट्स आणि एस. आर. कुलकर्णी डेव्हलपर्स यांनी पुण्यातील तळजाई परिसरात 'मेघदूत टॉवर कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी' हा प्रकल्प उभारला आहे. या सोसायटीमध्ये ॲड. अमित शहा यांची सदनिका आहे. सदनिका घेतल्यानंतर काही दिवसांतच बांधकामाचा दर्जा दुय्यम असल्याचे, तसेच मोठी गळती, इतर दोष असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी विकासकाकडे तक्रार करत दुरुस्ती करण्याची मागणी केली. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करीत विकासकाने त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे ॲड. अमित शहा यांनी 'महारेरा'कडे धाव घेतली. ॲड. अमित शहा यांनी दुय्यम बांधकाम, गळती, अर्धवट अमेनिटीज आदी गोष्टींचे फोटो 'महारेरा'कडे सादर केले. लिफ्ट, त्यासाठी आवश्यक बॅकअप, ट्रान्सफॉर्मर्स, लिफ्टमधील कॅमेरे, क्लब हाऊस, जिम, स्विमिंग पूल यासह अन्य सदोष गोष्टी निदर्शनास आणून दिल्या आहेत. 'महारेरा'ने या सर्व गोष्टी अधोरेखित केल्या असून, विकासकाला येत्या ३० दिवसांत सदनिकेतील अडचणी सोडवण्यास सांगितले आहे.

### जिल्हा परिषद शाळांच्या शासकीय वेळेत बदल करा : पांडुरंग पवार यांची मागणी

आळेफाटा (स. गांवकरी) : वारंवार होणारे बिबट्याचे हल्ले यामुळे नागरिक भयभीत झाले असून,जिल्हा परिषद शाळांच्या वेळेत बदल करण्याचे आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याकडे माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग पवार यांनी निवेदनाद्वारे केले आहे. पवार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड आदि तालुक्यांमध्ये बिबट्याच्या वावरामुळे व वारंवार होणा-या हल्ल्यामुळे सर्वत्र घबराट व भितीचे वातावरण आहे. विशेष करुन शालेय विदयार्थ्यांना याचा सामना करावा लागतो आहे.

# शेती, संस्कार आणि संघर्षातून घडलेला उद्योग विश्वातील नवा अध्याय!

लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

आरोटे परिवारातील तरुण उद्योजक विकास रंगनाथ आरोटे यांची प्रेरणादायी यशोगाथा !

- दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून विकास आरोटे यांचा सत्कार!

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुका व आंबेगाव तालुक्याच्या भुमीत परंपरा, संस्कार आणि कर्तृत्व यांचा वारसा जपत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या विकास रंगनाथ आरोटे या तरुण उद्योजकाची कहाणी आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण भागातील एका साध्या शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या या तरुणाने नोकरीची इच्छा असूनही व्यवसायच आपला मार्ग बनवला आणि गेल्या 13-14 वर्षांत नाव, प्रतिष्ठा आणि ग्राहकांचा विश्वास या तिन्ही गोष्टी आपल्या कष्टातून कमावल्या.



आरोटे परिवार हा वारकरी संप्रदायाचा वारसा लाभलेला, समाजात आपली ओळख निर्माण करणारा कुटुंब. आजोबा स्व. कामगार पोलीस पाटील रामदास पाटील आरोटे यांच्या वाणीचा 'शब्द म्हणजे शब्द' असा त्या काळात लौकिक होता. बोलण्यात नम्रपणा, वागण्यात कणखरपणा, आणि लोकांची सेवा — हा आदर्श त्यांच्या पुढील पिढ्यांनीही जपला.

वडील रंगनाथ आरोटे शासकीय नोकरी करत होते. मर्यादित पगार, घरातील जबाबदाऱ्या, सामाजिक कार्य यामध्ये संघर्ष असला तरी त्यांनी कधीच ही कडू परिस्थिती आपल्या मुलांवर येऊ दिली नाही.

"संस्कार हे विकत मिळत नाहीत, ते रक्तात असावे लागतात."

हा परिवाराचा मूलमंत्र होता आणि आजही आहे.

विकास आरोटे यांना नोकरी करण्याची इच्छा होती.

मात्र परिस्थिती, घरचा वारसा, आणि समाजात निर्माण झालेली प्रतिष्ठा यामुळे त्यांनी रोजगाराऐवजी व्यवसायाचाच मार्ग पकडला.

घोडेगाव (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे त्यांनी हीरो टू-व्हीलर शोरूम सुरू केले.

गेल्या 13-14 वर्षांत सुमारे 7 ते 8 हजार गाड्या विक्री करत या भागात ग्राहकांचा विश्वास जिंकणारे हे एकमेव ठिकाण बनले.

त्यांच्या शोरूमला आज आंबेगाव व आसपासच्या भागात प्रचंड प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

आजी-आजोबांकडून मिळालेल्या संस्कारांची साक्ष — कुटुंबात नम्रता आणि सेवा: आरोटे कुटुंबातील प्रत्येक सदस्य नम्र, सुसंस्कृत, सहकार्यास तत्पर.

स्व. आनंदराव आरोटे हे कुटुंबातील अत्यंत विनम्र व दयाळू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.

बबलू जगन्नाथ आरोटे यांनी अकोले तालुक्यातील राजूर-कोतुळ येथे व्यवसाय उभा केला, तर विकास आरोटे यांनी पुणे जिल्ह्यातील व्यवसायाला उंचीवर नेले.

"नफा नाही, गुणवत्ता आणि ग्राहकांचे समाधान हीच खरी कमाई,"

असे विकास यांच्या पत्नी नेहमी सांगतात.

आज त्यांचे कुटुंब ग्राहकांना घरच्याप्रमाणे सेवा देत असल्याने ग्राहकांचा अपार विश्वास त्यांना लाभतो.

### आरोटे परिवाराची परंपरा

संस्कार, कर्तृत्व, प्रामाणिकपणा आणि समाजासाठीची जबाबदारी — आजही तेवढ्याच ताकदीने पुढे नेली जात आहे.

आरोटे परिवाराने व्यवसायामध्ये कोणालाही फसवून पैसा कमावला नाही.

"घामाचा दाम" हा त्यांचा व्यवसायमंत्र.

घोडेगावमध्ये हीरो शो-रूम

अकोले तालुक्यात साई इंटरप्राइजेस — कोका-कोला एजन्सी. विविध होलसेल व्यवसाय.

दोन जिल्ह्यांत व्यवसायाचा झेंडा फडकवत असताना, कोणतेही राजकीय पाठबळ, आर्थिक आधार किंवा विशेष सुविधा न घेता त्यांनी फक्त स्वतःच्या कष्टावर विश्वास मिळवला.

आज ग्रामीण भागात कर्ज, गुंतवणूक, भांडवल या मोठ्या अडचणी असल्या तरी विकास यांनी सातत्य, सचोटी आणि आदर्श यांचा आधार घेत व्यवसायात यश मिळवले.

शेतकऱ्याचा सुपुत्र जिद्दीने उभा राहिला तर तो दोन जिल्ह्यांत नव्हे, संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श उभा करू शकतो — याचा जिवंत नमुना म्हणजे विकास आरोटे.

समाजात मानाचा मोठा मुकुट — सत्कार समारंभ

दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयातील सदिच्छा भेटीदरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच जिल्हा प्रसिद्ध प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते विकास आरोटे यांचा घड्याळ, पुष्पगुच्छ, हरिपाठ देऊन सन्मान करण्यात आला.

विकास रंगनाथ आरोटे हे नाव म्हणजे — वारसा जपणारा मुलगा. मेहनती उद्योजक. नम्रपणा जपणारा समाजप्रिय व्यक्तिमत्त्व. ग्राहकांचा विश्वास असलेला उद्योगपती. दोन जिल्ह्यांत ओळख निर्माण करणारा यशस्वी तरुण.

# बस स्टँडजवळील मुतारीची दयनीय अवस्था

## नागरिकांत संताप; अस्वच्छता, दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात



भिवंडी : (समर्थ गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्टँडलगत असलेल्या पुरुषांच्या सार्वजनिक मुतारीची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे पडघा परिसरात नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर वाढली असली तरी अत्यावश्यक सुविधा मात्र पूर्णपणे जोपासल्या जात नसल्याने नागरिकांत नाराजी पसरली आहे. ही मुतारी पडघा बाजारपेठेतील एकमेव सार्वजनिक मुतारी असल्याने दररोज प्रवासी, स्थानिक रहिवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक

> मुतारी ग्रामपंचायत वेळोवेळी स्वच्छ करते. स्वतंत्र कर्मचारी नसल्यामुळे अडचणी येतात; मात्र आता आठवड्यातून दोनदा साफसफाईसाठी व्यक्ती नेमली आहे. नागरिकांनीही पाण्याच्या बाटल्या तिथे टाकू नयेत. उद्या मुतारीची साफसफाई करण्यात येईल.
>
> **- पडघा ग्रामपंचायत अधिकारी, भास्कर घुडे**
>
> सध्या मुतारीची अवस्था अत्यंत दयनीय आहे. ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी यांना यातून सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. दुर्गंधीमुळे रोगराई पसरू शकते, त्यामुळे ग्रामपंचायतीने नियमित साफसफाई करून या समस्येकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे.
>
> **- सामाजिक कार्यकर्ते, अशोक शेरेकर**

आणि दुकानदार यांच्यासह शेकडो लोक ती वापरतात.

मात्र मुतारीची मोडकळीस आलेली अवस्था, दरवाजे नसणे, चारही बाजूंना पसरलेला कचरा, अस्वच्छता आणि सतत जाणवणारी तीव्र दुर्गंधी यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

अनेकांनी पडघा ग्रामपंचायतीला वारंवार तक्रारी केल्या असूनही परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही. "मुतारीत शिरायलाही धाडस होत नाही, प्रवासी तर आत जातानाच माघारी फिरतात," अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून मिळत आहे. या अस्वच्छतेमुळे परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता असल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

पडघा सारख्या महत्त्वाच्या व्यापारी व वाहतूक केंद्रात अशी दुरावस्था राहणे ही गंभीर बाब असल्याने ग्रामपंचायतीकडून तात्काळ कारवाईची नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' महाकाव्य संमेलन २५ रोजी

पुणे : (समर्थ गांवकरी)

विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन या संस्थांच्या वतीने संविधान दिनानिमित्त एक दिवसीय 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' या महाकाव्य संमेलनाचे आयोजन केले आहे. संविधान दिनानिमित्त आयोजित हे काव्यसंमेलन मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात होणार आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी संमेलनाध्यक्षा संगीता झिंजुरके, स्वागताध्यक्ष सीमा गांधी, प्रा. भारती जाधव आणि प्रा. सायली गोसावी उपस्थित होते. प्रा. शंकर आथरे म्हणाले, "संमेलनात दिला जाणारा 'क्रांतीसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' यंदा बंधुता चळवळीत गेल्या ५१ वर्षांपासून योगदान देणाऱ्या मंदाकिनी आणि बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांना जाहीर करण्यात आला आहे. सत्यशोधकी पगडी, प्रबोधनाची लेखणी आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील कन्या महाविद्यालयास 'ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले ज्ञानसाधना पुरस्कार' प्रदान करण्यात येईल. ज्येष्ठ साहित्यिका आणि विचारवंत डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे." संविधान दिनाच्या औचित्याने संमेलनामध्ये 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' प्रदान केले जाणार आहेत. यामध्ये महिमा ठोंबरे (सकाळ), नम्रता फडणीस (लोकमत), सुवर्णा चव्हाण (पुढारी), कल्पना खरे-साठे (केसरी), मेधा पालकर (सामना), प्रीती पाठक (भास्कर), अर्चना मोरे (पुणे मिरर), शिवानी पांढरे (एबीपी माझा), गजाला सय्यद (शबनम न्यूज), वनिता चौधरी (साहित्यलीला पंढरी), सायली नलावडे-कविटकर (सहस्त्रजीत मीडिया) यांना सन्मानित करण्यात येणार असल्याचे संमेलनाध्यक्षा संगीता झिंजुरके यांनी सांगितले.

# एण्ड टीव्हीवर होणार एआय कंट्रोलचा धमाका!

एआय गोंधळांनी भरलेल्या एपिसोड्सचे मनोरंजन घेण्यास सज्ज राहा आणि पहा मालिका हप्पू की उलटन पलटन रात्री 10 वाजता आणि भाबीजी घर पर है रात्री 10.30 वाजता दर सोमवार ते शुक्रवार फक्त एण्ड टीव्हीवर!

मुंबई : (समर्थ गांवकरी)

एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन आणि भाबीजी घर पर हैचे या आठवड्यातील एपिसोड्स कॉमेडी, गोंधळ आणि विलक्षणतेच्या दुप्पट मनोरंजनाचा आनंद देतील, जेथे तंत्रज्ञान, मत्सर आणि अनपेक्षित ट्विस्ट्स तुमच्या आवडत्या कुटुंबांना हादरवून टाकणार आहेत.



मालिका हप्पू की उलटन पलटनमधील एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, हप्पू (योगेश त्रिपाठी) काम, कुटुंब व दैनंदिन जबाबदाऱ्यांमुळे पूर्णपणे थकून गेला आहे आणि घरामध्ये लहान मुले, अम्मा (हिमानी शिवपुरी) आणि मी सुद्धा त्याच्यावर नाखूश आहे. त्याचेवळी त्याचे वैज्ञानिक असलेले काका त्याला कॉल करतात. खूप वर्षांपूर्वी हप्पूने त्यांची प्रयोगशाळा वाचवण्यास मदत केली होती आणि आता, त्या कृत्याप्रती कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून त्यांनी त्याच्यासाठी रोबोट तयार केला आहे आणि त्याला टी नाव दिले आहे. हप्पूला खूप आनंद होतो, त्याला वाटते की आता अखेर तो स्वत: मेहनत न घेता सर्वकाही व्यवस्थापित करू शकतो. दरम्यान, बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) काकांकडे बिमलेशचे रोबोट व्हर्जन बनवण्याची विनंती करतो. पण गोंधळामुळे तिच्या फोटोच्या जागी पानवालाच्या मैत्रिणीच्या फोटोची अदलाबदल होते, ज्यानंतर विनोदी गोंधळ सुरू होतो. टी नकळतपणे रात्रीच्या वेळी आमच्या रूममध्ये येतो, नृत्य करू लागतो व गाणी म्हणू लागतो, जे हप्पू कधीच करत नाही. ते पाहून मला खूप आनंद होतो, पण हप्पू घाबरतो. हप्पू काकांचा अपमान करतो तेव्हा टी मनातून दुखावतो आणि बंड करू लागतो. हप्पू या भावनिक एआय रोबोटला नियंत्रणात आणू शकेल का की टी संपूर्ण कुटुंबावर वर्चस्व निर्माण करेल?

मालिका भाबीजी घर पर हैमधील एपिसोडबाबत रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, मॉडर्न कॉलनीमधील कॅरम स्पर्धेत मी विभुतीजीला (आसिफ शेख) पराभूत करतो आणि अचानक सर्व महिलांसोबत अनिता (विदिशा श्रीवास्तव) परिपूर्ण शॉट्स व जादुई हातसाठी माझे कौतुक करू लागते. यामुळे विभुतीचा स्वाभिमान दुखावतो. दरम्यान, सक्सेना (सानंद वर्मा) एआय चिपचा शोध लावतो. या चिपमध्ये मानवाच्या शारीरिक अवयवांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता असते. विभुतीला याबाबत समजते आणि गुपचूप सक्सेनाला चिप माझ्या हातांमध्ये बसवण्यास सांगतो. रात्रीच्या वेळी मी रिमोट कंट्रोलद्वारे नियंत्रित केल्या जाणाऱ्या पपेटप्रमाणे वागू लागतो, ज्याबाबत मला काहीच समजत नाही. टीएमटी टिल्लूसाठी (सलिम झैदी) विवाहाचा प्रस्ताव आणतात आणि मला मुलीच्या कुटुंबासमोर सभ्यपणे वागण्यास सांगतात तेव्हा खरी समस्या सुरू होते. पण माझ्या हातांचे नियंत्रण विभुतीकडे असते, ज्यामुळे मी विलक्षण, लाजिरवाणे हावभाव करतो.

लवकरच अनिता आणि इतरांना काहीतरी विलक्षण जाणवते. मला प्रेमकडून समजते की सक्सेनाने हे डिवाईस तयार केले आहे, तेव्हा मी सक्सेनाला विलक्षण ऑफर देतो. ज्यानंतर तो विभुतीच्या पायांमध्ये चिप बसवतो.